# वऱ्हाडसमाचार.

Regd. N. No. 4

Berar Samachar.

[ वर्ष ४५ आकोला—सोमवार तारीख ७ माहे आगष्ट सन १९११ इ० अंक ३१ ]

## Notice

Notice under section 150 (I) of the Berar Municipal Law.

The Municipal Committee of Malkapur at their Special Meeting, held on 19-4-11 have proposed to adopt the following rules for the vaccine operations within the limits of the Malkapur Municipality.

Rule 1 — for the performance of vaccination in accordance with the provicson of Act XI11 of 1880 the local area included within the limits of the Malkapur Municipality shall be divided into as many vaccination circles as the Municipal Commissioners may find it desirable to establish.

Rule 2 — The Municipality shall form time to time appoint a place or places in each vaccination circle as a public vaccine station, and shall cause to be affiixed on the outside of every such place, in a conspicuous position, a sign board, on which shall be printed in letter easily legible and in the English, Marāthi and Urdu characters the following inscription :—

Malkapur Municipality
Vaccine Station No :—

Rule 3 — The appointment of duly qualified public vaccinators to perform vaccination as prescribed by Act XI11 of 1880 will rest with the Sanitary Commissioner.

Rule 4 — The appointment, suspension and dismissal of public vaccinators employed in the limits of the Municipality shall rest with the Sanitary Commissioner.

Rule 5 — The public vaccinator shall attend at the public vaccination station on three separate occasions during the vaccination season and his stay must be prolonged for as many days as there may be vaccination work for him to do, or as directed by the Sanitary Commissioner :—

(I) Ten days previous intimation of the day for vaccine operations shal be given in writing by the public vaccinator to the Secretary to the Municipality.

(11) The Secretary shall arrange for the collection of from 30 upto 60 children daily at the vaccination station during the vaccinator's visits between the hours of 8 A. M. to 12 Noon and shall furnish the vaccinator with a list according to ward divisions of the children required to be vaccinated.

(111) The work should be completed by wards, all the children in any given ward to be protected before another ward is commenced.

(IV) The Secretary shall send to the District Superintendent of vaccination the names of parents and guardians who refuse to have their children vaccinated after all conciliatory means have failed and the Superintendent will then proceed as laid down in Sections 17 and 18 of the Vaccination Act.

Rule 6 — Persons licensed by the Local Government to act as private vaccinators shall in no case demand higher fee than one rupee for a single operation, and shall perform their duties under the order and subject to the general control of the Sanitary Commissioner.

Rule 7 — Persons desirous of procuring the vaccination of their children at their own houses may apply for that purpose to the town vaccinator of their circle who shall comply at convenience with the request of the applicant.

Rule 8 — Whenever it is ascertained that a child is unfit for vaccination or is unsusceptible of vaccination a certificate in the form A attached to the rules shall be granted in former case to the parent or guardian of such child by the vaccinator appointed by Government or by the licensed private vaccinator or by the Medical Officer of the District or of the Charitable Dispensary and in the latter case in form B (attached) by the Superintendent of vaccination by whom such child was examined. In like manner whenever it is ascertained that a child has been successfully vaccinated, a certificate shall be granted by the vaccinator appointed by the Government or the private licensed vaccinator or the Medical Officer of the District or Charitable Dispensary to the parent or guardian of such child in the form C attached to these rules.

Rule 9 — The lymph to be used shall be animal lymph either direct from the cow or manufactured into vaccine paste. The Municipality shall arrange to supply calves in sufficient numbers or in the event of paste being selected to be used to contribute towards the cost of manufacture in consultation with the Sanitary Commissioner

Rule 10 — A fee of eight annas shall be payable to the public vaccinator who vaccinates a child at the request of parents or guardians elsewhere than in the place appointed for the purpose.

Rule 11 — The following registers shall be kept up by the Municipal Committee.

(a) A register showing the names of children born within the local area subject to these rules on or after the date of the application of Act X11i of 1880 to such area.

(b) A register showing the names of unprotected children born in the area aforesaid previous to the date of the applicarion of Act X1I1 of 1880 and who were at that date under the age of 14 years if boys and of 8 years if girls.

(c) A register showing the names of the unprotected boys and girls respectively under these ages brought within the local area aforesaid at any time after the application of Act XI11 of 1880 and who had resided there for a month.

(d) A register showing the result of each vaccination or its postponement and the delivery of certificate if any.

Rule 12 — The preparation of register (a) shall be effected from the register of births maintained in Municipal Office; of register (b) from informatien to be collected under the orders of the Secretary Municipal Committee by the Registrar of births or where no Registrar is appointed the Secretary; of register (c) from the information to be collected by the Registrar of births, or where no registrar is appointed the Secretary from the aforesaid Committee; and of register (d) from the register kept up by vaccinators for their respective circles as hereafter prescribed.

Rule 13 — Every public and private vaccinator employed within the local area to which these rules apply shall keep up the following registers, namely :—

Register A see form attached

Register B Showing

(1) Name, sex, age, parentage and cast residence of each child produced bu found unfit for vaccination.

(2) Date of certificate of postponement granted under Section 9 of Act X111 of 1880.

(3) Date on which the child was represented for vaccination and the resul of inspection.

(4) Date of renewal of postponement certificate if any.

(5) Remarks.

N. B. If on the child being again presented for vaccination it is found to be in a fit state for that operation the fact should be recorded in column 3 of Register B and an entry of the fact of vaccination when performed should be made in Register A a reference to such entry being made in the column of remarks of Register B apposite the corresponding entry in the latter.

Rule 14 — Every public or private vaccinator shall prepare weekly and annual returns as per forms attached 1 and 11 and punctually submit them through the Secretary of the Municipality to the District Superintendent of vaccination on the dates prescribed in the forms.

Rule 15 — The result of vaccine operations will be verified by the District Superintendent of vaccination on the provincial vaccination establishment who shall give previous notice to the Secretary of the Municipality of his intention to do so. The Secretary will arrange to get, excepting on Sundays general and class holidays as many — vaccinated children as possible collected at the local Vaccination Station

Form A
Municipal Committee
Vaccination No

Certificate of unfitness for vaccination.

I a public or licensed (as the case may be) vaccinator do hereby certify that in my opinion (Name of child the son (or daughter as the case may be)

of———— resident of———— is in a state unfit for vaccination and and that such unfitness will continue during (the whole or if a part specify the same) the current vaccination season.

Signed

Dated Vaccinator

Form B

Certificate of unsusceptibility of succesful vaccination.

I a Superintendent of vaccination do hereby certify that ———— the son (or) daughter (as the case may be) of resident of———— has been three times unsuccessfully vaccinated and that in my opinion he (or she as the case may be) is unsusceptible of successful vaccination.

(Signed)

Dated Superintendent of vaccination.

Form C

Certificate of successful vaccination.

I public (or licensed as the case may de) vaccinaotr do hereby certify that (name of child) the son (or) daughter as the case may be) of resident of was vaccinated by me on the day of in year and that after due inspection I am satisfied that the vaccination has been successful.

Signed

Date vaccinator

Any inhabitant of Malkapur objecting to the above proposal should submit his objection within thirty days from the date of the publication of the notice to the undersigned.

Khvaja Kutbuddin
Malkapur } Vice Charman
D. 25th July 1911 } Municipal Committee
Malkapur.

No. N. 332

## नोटीस

नोटीस बेशमी हरी वल्लद रावजी माळी रा० पनोरी ता० आकोट यांस:—

कनीराम जिवराम मारवाडी रा० कावस याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आपले मालकीचें शेत स. नं. ३ यांतील तिसरा निशाणी खात्याचा नंबर याचें खातें सोनाई मर्द रावजी इचे नांवें असून सदहू शेत मजला ता० २८।६।११ रोजीं ४५० रुपयांला खरेदी देऊन नोंदून दिलें. खरेदीचा भरणा असा कीं मागील खातेबाकीवरून ३५० रुपये व यादवजी माळी रा० दहिहांडा याचा हवाला रु० १०० एकूण रुपये ४५० व खरिदीखत करून दिल्याप्रमाणें शेत ताब्यांत देण्याचें कबूल केलें होतें व खरिदीचा दस्तऐवज तुमच्या हातानें दाखल केला होता तो हि तुह्मी आणून देण्याचें कबूल केलें होतें. त्याप्रमाणें शेत हि अद्याप ताब्यांत दिलें नाहीं व दस्तऐवजहि आणून दिला नाहीं कारितां या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत शेत पिकासुद्धां ताब्यांत द्यावें व खरिदीचा दस्तऐवज आणून द्यावा त्याप्रमाणें तुह्मी न केल्यास तुमचेवर रितीप्रमाणें दिवाणी दावा करून शेत पिकासुद्धां ताब्यांत घेतलें जाईल नंतर तुह्माला या नोटिसीचा खर्च व दाव्याचा खर्च भरून देणें भाग पडेल ही नोटीस दिली तारीख ५।८।१९११ इसवी.

सही (मारवाडींत)
कनीराम जिवराज द० खु०
नो० नं० ३३३

## थिऑसफीची परिषद

(मा. अं. पु. चा.)

सातव्या वर्षापासून थोडा कठीण अभ्यास सुरूं करावा व अभ्यासाची मांडणी ठीक समजविल्यास मुलास अभ्यास कंटाळवाणा न होऊन उलट त्यास त्यांत मोठा आनंद वाटेल. शक्य असेल तर त्यास दोनतीन वर्षे पुढें ही घरांत ठेऊन अभ्यास करविल्यास हरकत नाहीं. मुलास या सात वर्षांचे अवधींतच लिहिण्यावाचण्यास शिकवावें. प्रथम वाचावयास येऊं लागलें म्हणजे लहान लहान वाक्यें लिहिण्यास सांगावीं म्हणजे अक्षर चांगलें होऊन लिहिण्याचा अभ्यास चांगला होतो. जसजसें त्यास लिहितां येतें तसतसें बुकावर पाहिल्यावांचून जें वाचलें असेल तें लक्षांत ठेऊन लिहिणें कठीण जात नाहीं. नंतर मग सहज फिरावयास गेलें असतां जें कांहीं पाहिलें असेल त्याचें वर्णन, एखाद्या खेळाचें वर्णन, घरांत घडलेल्या विशेष गोष्टी, ज्या गोष्टी त्यास चमत्कारीक वाटल्या असतील अशा गोष्टी त्यास लिहून काढण्यास सांगाव्या. गोष्टीरूपानें इतिहास, नकाशावरून, तसेंच प्रवासवर्णनानें भूगोल, घरांतील हिशोबावरून जमाखर्चाची माहिती दिल्यानें मोठ्या आनंदानें मुलें हे विषय शिकतात. परंतु या सर्व गोष्टी शिकविणारा शिक्षक मुलांवर अत्यंत प्रेम करणारा, शांत वृत्तीचा, कोमल अंतःकरणाचा, मुलांचें हृद्गत जाणणारा, मुलांस कधींही कठोर भाषण न करणारा, कधीं न चिडणारा नेहमीं मुलांचें मन कोमल व मृदु भाषणानें वळविणारा व कधींही त्याजवर सक्ति न करणारा असा असला पाहिजे. लहान अर्भकाचे शरीरापेक्षां आपले मोठ्या धिप्पाड शरीराचा व शक्तीचा फायदा घेऊन त्याजवर आपल्या मर्जीप्रमाणें वागविण्याविषयीं जे लोक सक्ति करतात, मुलावर जुलूम करतात त्या लोकांची क्रिया अत्यंत कमीपणा आणणारी नीचतेची व भित्रेपणाची आहे. शिवाय एक मनुष्यानें दुसऱ्या मनुष्यास कोणत्याही तऱ्हेनें कारणावांचून दुःख देणें हा गुन्हा आहे. ही गोष्ट सर्वसाधारण नीतिसिद्धांताचेही विरुद्ध आहे; कारण ही हिंसा आहे. जे लोक या गोष्टीचा विचार न करितां मुलास वाटेल त्या तऱ्हेच्या शिक्षा करितात ते न समजून परंतु फार मोठा गुन्हा करीत असतात. ते अंधपरंपरेस धरून चालतात व अशाप्रमाणें मुलांचे सहज प्रवृत्तीचा निरोध करून त्यास दूषीत करतात.

मुलास क्रोधानें मारलें असतां त्याचे अंतःकरणास विलक्षण खेद होऊन त्याचे शरिरास इजा होते व त्याचे मनांत कायमची भीति पडते. अशा शिक्षेनें मुलास वाटूं लागतें कीं आपलेपेक्षां अशक्तास मारणें हाच आपले नाखुषी दाखविण्याचा मार्ग आहे व म्हणून आपल्यापेक्षां लहान मुलास तें मारीत सुटतें. त्याच्या दुष्ट आचरणाबद्दल त्यास कांहीं एक न करतां उलट त्याचा क्रोध जास्त जास्त वाढत जातो व अशाप्रमाणें त्याचे अंतःकरणांत दुसऱ्याचा सूड उगविण्याचें बीज रुजलें जातें. आपणास शिक्षा होईल ही भीति असल्यास तें शिक्षेच्या भीतीनें ती छपविण्याकरितां मोठें लबाड होईल.

मुलामध्यें खोटेपणाचा प्रादुर्भाव त्याचे गैरसमजुतीमुळें अथवा भीतीमुळें होत असतो. शिक्षा केल्यानें तें गोंधळून जातें व त्याचे पोटांत भीति उत्पन्न होते. मुलाच्या आंगचे दोष केवळ त्याच्या वडिलांच्या आंगचे गुणानेंच नाहींसे होण्यासारखे असतात. मात्र वडिलांनीं मुलास प्रेमानें वागवून त्याजवर विश्वास ठेविला पाहिजे. मुलाकडून जें कांहीं घडेल तें करण्याविषयीं त्यानें आपली पराकाष्ठा केली असली पाहिजे असें धरून चालावें. तें जें सांगेल तें खरें सांगतें असें मानून त्यास मोठ्या आदरबुद्धीनें वागविलें पाहिजे. त्याजकडून जर कांहीं चूक झाली तर त्यास दूषण न देतां ती त्यास चांगल्या रीतीनें समजून द्यावी. ‘ मला माहीत आहे अशी चूक तूं फिरून खास करणार नाहींस ’ असें त्यास म्हणावें. फिरून तशीच चूक घडल्यास त्याबद्दल आश्चर्य व खेद प्रदर्शित करून फिरून तसें न होण्याबद्दल आशा प्रकट करावी. मुलांचे स्वाभिमानास कधींही दुखवूं नये. जरी कदाचित् तें खोटें बोललें तरी तें सत्यभाषण करूं लागेपावेतों त्याजवर विश्वास ठेवीत जावा. “ मला माहित आहे तुझे हातूनही अजाणता चूक घडत असेल परंतु मी तुजवर विश्वास ठेवतो त्याअर्थी तूं आतां मजबरोबर खोटें भाषण करणार नाहींस ” असें त्यास म्हणावें.

अपूर्ण

वऱ्हाडसमाचार

श्रावण शुद्ध १३ शके १८३३ दुंदुभिनाम संवत्सरे

## ना० आगाखान आणि शिक्षण-प्रसार.

नॅशनल रिव्हु नामक इंग्रजी मासिक पुस्तकांत ना० आगाखान यांचा शिक्षणविषयक लेख प्रसिद्ध झाला आहे तो विचारणीय आहे. फ्रान्सदेशांत औद्योगिक अशांतता आहे; इंग्लंडांत राजकीय द्वंद्वें सुरूं आहेत; पोर्तुगालदेश राजक्रांतीच्या भोंवऱ्यांत सांपडला आहे, ईजिप्तमधील अशांति इंग्रज मुत्सद्यांची परीक्षा पाहत आहे. अशा वेळीं हिंदुस्थाननें एकट्यानें स्वस्थ बसणें अशक्य आहे. येथेंही अशांतता आहे, पण ती थोडीशी राजकीय स्वरूपाची व पुष्कळशी शिक्षणविषयक आहे. येथपर्यंत ना० आगाखानसाहेबांची चिकित्सा बरोबर आहे. हिंदुस्थानाला सध्या झालेल्या रोगांतून त्याची मुक्तता करण्यास शिक्षणासारखा रामबाण उपाय नाहीं. पण हा उपाय सुचवितांना त्यानीं विलायतेंतल्या लोकांना ना० गोखले यांच्या बिलाच्या उपयुक्ततेविषयीं शिफारस केली असती आणि त्याला आपला पूर्ण पाठिंबा आहे असें जाहिर केलें असतें तर त्यांच्या विचारांतला सरळपणा आणि उक्तींतला स्पष्टपणा व्यक्त झाला असता. पण लंडन मॉस्लेम लीगनें ना० अमीरअल्ली यांच्या प्रेरणेमुळें त्या बिलाच्या विरुद्ध आपलें धोरण ठेविलें त्याचा परिणाम घडल्यामुळें म्हणा अगर दुसऱ्या कांहीं कारणांमुळें म्हणा ना० गोखले यांचें बिल ना० आगाखानास नापसंत झालें आहे. नापसंतीचीं कांहीं कारणें व्यक्त व कांहीं अव्यक्त स्वरूपाचीं असावीं असें त्यांच्या लेखावरून दिसतें. व्यक्त कारणांतलीं मुख्य म्हणजे द्रव्यसंबंधी आहेत. सक्तीचें शिक्षण सुरू केलें म्हणजे शाळांची संख्या वाढवावी लागेल. इतक्यांना छानदार इमारती बांधून देण्यास पैसा कोठून आणावा? शिक्षक तरी कसे मिळतील? व त्यांना चांगली बढती मिळण्याची आशा दाखविल्याशिवाय ते या धंद्यांत मनापासून पडणार नाहींत. पण या सगळ्या पैशाच्या अडचणी दूर करावयाच्या म्हणजे सरकारला कर्ज काढावयाला पाहिजे. होय. हें खर्चाचें काम आहे, पण शिक्षणप्रसार करणें हें जर सरकारचें कर्तव्य आहे तर त्यासाठीं हव्या त्या उपायानें पैसा काढला पाहिजे. हवें तर कर्ज काढा, अगर खर्चांत काटकसर करून ज्यास्त उरणारी शिल्लक या कार्याकडे लावा, असें जर विद्याईनें नामदार आगाखान यांनीं सरकारला सांगितलें असतें तर ना० गोखले यांच्या बिलाला आंग्लोइंडियन पत्रकर्त्यांकडून जो विरोध हल्लीं होत आहे तो पुष्कळ अंशानें कमी झाला असता.

## बदनामीचें दुसरें एक प्रकरण.

चित्पावनांच्या बदनामीचें एक प्रकरण मुंबईसरकारनें निकालास लाविलें, तसेंच दुसरें प्रकरण मद्रासकडे अलीकडे उपस्थित झालें होतें. मात्र मद्रासच्या प्रकरणांत जातीचा संबंध नसून व्यक्तीचा होता. तथापि त्याची गंभीरता कमी होती असें नाहीं. मद्रास टाइम्सनें तेथील हायकोर्टचे देशी जज्ज ना० मि० सुंदरम आयर हे आपलें काम बरोबर करीत नाहींत, वेळेवर कोर्टांत येत नाहींत, वगैरे मनःकल्पित गोष्टी प्रसिद्ध केल्या होत्या. हायकोर्ट जज्जासारख्या बड्या न्यायाधिकाऱ्याविषयीं असे आरोप करणें हें धाडसाचें काम होतें. तें धाडस मद्रास टाइम्सनें केल्यामुळें या प्रकरणाकडे लोकांचें लक्ष लागून राहिलें होतें. पण अखेर मद्रास टाइम्सला आपली चूक कळून आली, आणि त्यानें आपलीं विधानें परत घेऊन सपशेल माफी मागितली. यामुळें हायकोर्टला किंवा सरकारला या बाबतींत पडण्याचें कारणच उरलें नाहीं. जगद्वृत्तकर्त्याच्या अंगीं तितका शहाणपणा असतां तर आज जी तंबी सरकारकडून त्याला मिळाली आहे ती खाण्याचा त्याला प्रसंगच आला नसता. सिव्हिल अँड मिलटरी ग्याझेट किंवा मद्रास टाइम्स यांसारखीं वजनदार पत्रें अतिशय उच्च दर्जाच्या देशी अधिकाऱ्यांनासुद्धां कःपदार्थ समजून त्यांच्यावर यथेच्छ तोंडसुख घेण्याइतका शिष्टाचार कसा विसरतात हें देखील एक आश्चर्यच आहे.

## पुनर्विवाहाकडे स्त्रियांची प्रवृत्ति

१८५६ सालीं विधवाविवाहापासून झालेली संतती कायदेशीर वारस ठरविणारा कायदा सरकारनें केल्यापासून तशा विवाहांच्या मार्गांतली एक मोठी अडचण दूर झाली; पण लोकांकडून येणारी अडचण अद्याप कायमच आहे. गेल्यासालीं एकंदर दाक्षिणी ब्राह्मण मंडळींत फक्त ७ विधवाविवाह झाले. पण हीसुद्धां अभिनंदनीयच गोष्ट आहे असें त्या कायद्याच्या वाढदिवसाचे प्रसंगीं पुण्यास भरलेल्या सभेंत सांगण्यांत आलें! या सभेंतलीं बाकीचीं भाषणें अशा प्रसंगीं जशीं व्हावयाचीं तशींच झालीं. पण एक गोष्ट मात्र विशेष ठळक रीतीनें पुढें मांडण्यांत आली आणि पुनर्विवाहाच्या आंकड्यांपेक्षां तीच आह्मांला विशेष महत्त्वाची वाटते. ती गोष्ट पुनर्विवाहप्रतिबंधनिवारकमंडळीच्या असिस्टंट सेक्रेटरीनें स्वतःच्या दहापंधरा वर्षांच्या अनुभवावरून सांगितली असल्यामुळें तिचें महत्त्व विशेष आहे. रा० जोशी म्हणाले कीं पुनर्विवाह जुळविण्याचे प्रसंग मला पुष्कळ येतात. तेव्हां मला नेहमीं असें आढळून येतें कीं अभागी पण तरुणगतभर्तृका नेहमीं पुनर्विवाह करून घेण्यास तयार असतात. त्यांना स्वतःच्या तोंडानें लोकलज्जेस्तव तसें सांगावेंसें वाटत नाहीं येवढेंच काय तें. पण पुनर्विवाह करण्याकडे त्यांच्या मनाची प्रवृत्ति नेहमीं असते. पण वरांचीच तयारी नसते, व घरांतलीं वडील माणसें भित्रीं असल्यामुळें तीं अशा सुधारणाकृत्याला आड जातात व पुनर्विवाह करणें वाईट असें त्या तरुणींच्या मनावर बिंबवूं पाहतात. रा. जोशी यांचा हा अनुभव आमच्या तरुण स्त्रियांच्या नीतिधैर्याविषयीं जितका प्रशंसापर आहे तितकाच तरुण सुशिक्षितांच्या संबंधानें प्रतिकूल असलेला पाहून कोणास ही खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं.

## पार्लमेंटांतला गोंधळ.

विलायतेंत लॉर्डांची सभा बंद करण्याविषयींचें जें बिल अधिकारारूढ असलेल्या लिबरलपक्षानें आणिलें आहे त्या संबंधांत तिकडे लोकांच्या अंगीं आवेशाचा विलक्षण संचार झालेला दिसत आहे. गोष्ट अगदीं निकरावर आली असून भरपार्लमेंटांत मि० ॲस्किथ यांना‘देशद्रोही’, ‘राजाला कोणी मारलें?’ अशा तऱ्हेच्या शिव्याशापांचा भडिमार सोसावा लागला. त्यांना कोणी बोलूं दिलें नाहीं. स्पीकरचासुद्धां अधिकार कोणी जुमानींना अशी स्थिति झाली. हा दंगा करणारांत अर्थात युनियनिस्टपक्षच पुढें होता. आपलें आतां उच्चाटन होणार म्हणून लार्डांनीं कामन्ससभेंतल्या आपल्या गड्यांना चिथावून त्यांच्याकडून हा गोंधळ करविलेला दिसतो. कांहीं ही असलें तरी ज्या ठिकाणीं राष्ट्राच्या हिताहिताच्या गोष्टींचा गंभीरपणें विचार चालावयाचा त्या पार्लमेंट सभेंत असला विचित्र प्रकार घडतो याला काय म्हणावें? सुरतेच्या कांग्रेसमध्यें जहाल मंडळीनें दंगा करून ती मोडली त्यावेळीं हिंदुस्थानचे लोक राज्य करण्यास नालायक याला सुरतेच्या कांग्रेसचा गोंधळ हाच पुरावा होय असें मोठ्या गंभीरपणें सांगणारांनीं परवाच्या कॉमन्ससभेंतल्या मोठ्या गोंधळावरून इंग्रजांच्या राज्यकारभार करण्याच्या सामर्थ्याविषयीं वरील प्रकारचें विधान केलें तर इंग्रजांना कसें काय वाटेल? आजपर्यंत सुरतसारखी गोंधळाची

कांग्रेस एकच झाली, पण पार्लमेंटमध्यें गेल्या पन्नाससाठ वर्षांत तीन वेळां असे मोठाले गोंधळ झाल्याचें इतिहासांत नमूद आहे. असे गोंधळ होणें हें राज्यकारभार करण्याच्या सामर्थ्याचा अभाव दाखवीतें नमून उलट लोक अशा प्रकरणांत किती आस्थेनें आणि आवेशानें पडत आहेत त्याचें हें निदर्शक ह्मटलें पाहिजे.

## याचकांचें राष्ट्र.

हिंदुस्थानदेशांत हिंदूंचीच लोकसंख्या ज्यास्त आहे आणि हिंदुधर्म ह्मणजे ब्राह्मणाधिष्ठित धर्म, अर्थात याचकांचेंच प्रावल्य या देशांत राहावयाचें अशी समजूत कित्येक पाश्चात्य लेखकांनीं करून घेऊन या राष्ट्राला याचकांचें राष्ट्र असें नांव दिलें आहे. आमच्या लोकांनाही हा महत्कष्टानें मिळविलेला किताब हातांतून जाऊं द्यावासा वाटत नसल्यामुळें ते त्याला साजेसेंच आपलें वर्तन ठेवीत आहेत. यंदा राज्यारोहणानिमित्त दिल्लीस भरणाऱ्या दरबाराचे वेळीं बादशहानें आह्मांला कोणती देणगी द्यावी याबद्दलच सारखी चर्चा सुरू आहे. कोणी ह्मणतो सरकारी नोकरांना एकेक महिन्याचा पगार बक्षीस द्यावा, कोणी ह्मणतो पेनशनरांवर विशेष मेहेरबानगी करावी, कोणी ह्मणतो कर माफ करावे, कोणी सुचवितो कीं गोवध बंद पाडावा, आमच्या लोकांना सैन्यांत भरती करावें अशी कोणाची इच्छा, तर कोणी दुष्काळफंडासारखा संकटनिवारणफंड काढण्याची सूचना करण्यास तयार, कोणी सरसकट सर्वांना चांदीचीं पदकें द्यावीं असें ह्मणतो तर कोणी राजकीय कैद्यांना बंधमुक्त करण्याविषयीं शिफारस करतो, कोणी सिव्हिल सर्विसची परीक्षा हिंदुस्थानांत घेण्यास सुरुवात करा असें मागतो तर कोणी बादशहाच्या नांवचें पदार्थसंग्रहालय उघडण्याविषयीं विनंती करतो; सारांश, प्रत्येकजण आपापल्यापरी याचना करीत आहे! विलायतेंत परवा राज्याभिषेक समारंभ झाला, पण वरच्या सारखी एकही याचना कोणीं केली नाहीं आणि हिंदुस्थानांत याचनांचा सुकाळ! सकृद्दर्शनीं हा विरोध दिसतो खरा, पण त्यालाही सबळ कारण आहे. विलायतेंतल्या लोकांना जें हवें असतें तें मिळविण्यास याचना करावी लागत नाहीं; पार्लमेंटांत बहुमत करून तें त्यांना हक्कानें [illegible]ां येतें. येथें हक्कानें कांहींच [illegible] सोय नाहीं. हिंदुस्थानाला या[illegible] ह्मणणारांनीं दोन्ही ठिकाणच्या [illegible]तला हा विरोध लक्षांत घ्यावा अशी आमची सूचना आहे.

## जशी पात्रता, तशा संस्था.

ता० १९ जुलै रोजीं अमदाबाद येथें गु[illegible]साहित्यपरिषदेचें सातवें अधिवेशन झा[illegible] अध्यक्ष तेथील ट्रेनिंग कॉ[illegible]पापक रा० कमळाशंकर प्र[illegible] हे होते. या परिषदेचा [illegible]राठी, बंगाली वगैरे देशी [illegible] उत्तमोत्तम ग्रंथांचीं गुज[illegible] करणें, कोश व व्याकरण [illegible]रणें व ऐतिहासिक ग्रंथांचें प्रकाशन करणें हा आहे. ही सभा आज सात वर्षें अस्तित्वांत असून हिच्या हातून अद्याप ह्मणण्यासारखें कांहींच काम झालें नाहीं अशी टीका एका गुजराथीपत्रकर्त्यानें केली आहे ती वाचून आह्मांला आमच्या महाराष्ट्रसाहित्यपरिषदेचें स्मरण झालें. स्मरण झालें ह्मणण्याचें कारण दीडदोन वर्षांपूर्वी बडोद्यास साहित्यसंमेलन झालें होतें, तेव्हांपासून या परिषदेचें नांवसुद्धां कोठें ऐकूं येत नाहीं. मध्यंतरीं या परिषदेच्या चिटणिसांनीं संमेलनाचा रिपोर्ट तेवढा छापून काढला, व त्याला जोडलेल्या निबंधांच्या रूपानें मराठी वाङ्मयांत सुविचारांची थोडी फार भर घातली. पण मराठी वाङ्मयाच्या उन्नत्यर्थ अवतरलेल्या संस्थेनें येवढ्या अल्पस्वल्प कामागिरीनेंच स्वतःला कृतकृत्य मानून घ्यावें हें कोणाला ही रुचणार नाहा. चिटणिसांना परिषदेच्या कामाची आस्था नाहीं असें ही आमच्यानें ह्मणवत नाहीं. कारण, आह्मांला जी त्यांचेविषयीं माहिती आहे तिजवरून सगळे चिटणीस लेखनव्यवसायांतले व महाराष्ट्रभाषेचे एकनिष्ठ सेवक आहेत. मराठीभाषेसंबंधानें कामें करण्यासारखीं उरलीं नाहींत ह्मणावें तर कामांचा डोंगर त्यांच्यापुढें उभा करतां येईल. मराठी शुद्ध लेखनाचा घोटाळा अद्याप मोडला नाहीं. मराठींत सुलभ पण उच्च प्रतीचें साहित्य तयार व्हावयाचें आहे. नवीन प्रचंड कोश करण्याची कल्पना ही बहुतेक जिरल्यासारखी झाली आहे. भाषेच्या उपपत्तीचा थांग अद्याप लावावयाचा आहे. विशेषतः हें शेवटलें काम डा० भांडारकरासारखे त्रिखंडविश्रुत बहुभाषाभिज्ञ मार्मिक शोधक हयात आहेत तोंपर्यंतच समाधानकारक रीतीनें व शास्त्रीयपद्धतीनें होण्याचा संभव आहे. डाक्तरसाहेबांच्या पश्चात् या विषयाला हात घालण्याची पात्रता ज्याचे ठायीं आहे असा एकही विद्वान महाराष्ट्रांत किंबहुना साऱ्या मुंबई इलाख्यांत नाहीं असें ह्मटलें तर सन्मान्यांचा अनादर केल्याचें पाप पदरीं घेण्याची आह्मांस भीती वाटत नाहीं. सारांश, काम पुष्कळ आहे व त्यांतलें कांहीं तर अत्यंत निकडीचें आहे. असें असतां महाराष्ट्रसाहित्य परिषद स्वस्थ कां बसली आहे? असा प्रश्न साहजिकच उद्भवतो. या प्रश्नाचें उत्तर काय येईल तें येवो, पण गुजराथी साहित्यपरिषदेवर होत असलेली अशाच प्रकारची टीका, आणि कर्नाटका, मद्रासइलाखा, तेलंगण, पंजाब, सिंध, वगैरे प्रांतांतून साहित्यविषयक संस्थांचा पूर्ण अभाव या गोष्टींचा कांहीं तरी निकट संबंध असावा अशी शंका येते. आणि आमच्या लोकांच्या हाडामासांत खिळलेला स्वभावगत दोषच या अनास्थेच्या मुळाशीं आहे किंवा तिचीं अन्य कांहीं कारणें आहेत याचा खोल विचार करण्याचि बुद्धि होते. कित्येक पुरुष कामाची योजना तयार करण्यांत मोठे कुशल असतात, पण तेच कर्तृत्वांत मंद निघतात. तसाच कांहींसा प्रकार आमच्या लोकांचा आहे. महाराष्ट्रसाहित्यपरिषदेचे नवे नियम आह्मी पाहिले आहेत. त्यांत प्रशंसनीय भाग पुष्कळ आहे, पण व्यावहारिक दृष्टि त्यांत कमी दिसते. अशा मोठ्या संस्थेचें काम आपापल्या व्यवसायांत सर्वदा व्यापृत अशा दोघांतिघां सेक्रेटरींवर सोपवून देऊन कधीं होत नसतें. अशा संस्थेला एक लहानसा पगारी सेक्रेटरी किंवा मदतनीस पाहिजे होता. त्याच्या अभावीं ही सगळी शोचनीय स्थिति आली आहे असें आमचें मत आहे. कोणती ही संस्था घ्या, तींत खरें पुरें काम करणारा एखादाच माणूस असतो; आणि तो ही ऑनररी ठेविला ह्मणजे अर्थातच त्याला आपल्या चरितार्थासाठीं दुसरा कांहीं धंदा करून फावल्या वेळांत संस्थेचें काम करावें लागतें. अशा रीतीनें काम कितीसें व कशाप्रकारें होणार तें दिसतेंच आहे. बरें अशा ऑनररी माणसाच्या कामांत दोष पाहण्यासाठीं टपून बसलेले शेकडों टीकाकार असतात; पण त्याला मदत करण्यास मात्र कोणी पुढें होत नाहीं. आपल्या लोकांचा हा स्वभावगत दोषच आमच्या सगळ्या संस्था अल्पायु होण्याच्या मुळाशीं आहेत. महाराष्ट्र साहित्यपरिषद या नियमाला अपवाद असेल असें आह्मांस वाटत नाहीं. पण जर ती अपवाद असेल, तर तिच्या हातून कामगिरी न होण्याला दुसरीं कोणतीं कारणें आहेत त्याचा खुलासा चिटणिसांकडून अवश्य व्हावयास पाहिजे. बंगालची साहित्यपरिषद ही मात्र आमच्या ह्मणण्याला खरोखर अपवाद आहे. तिला सर गुरुदास बॅनरजी, व जास्टिस शारदाचरण मित्र, यांच्यासारखीं विद्वान व वजनदार माणसें, आणि राजेरजवाडे, जमीनदार, प्रोफेसर, वकील, व्यापारी, कारकूनपेशाचे लोक व जुने शास्त्रीपुराणिक वगैरे सर्वांचेंच उत्कृष्ट प्रकारचें साह्य आहे. हें साह्य आमच्या इकडच्या आबालवृद्धांकडून थोडें तरी मिळत आहे काय? किंवा मिळण्याचा संभव आहे काय? या प्रश्नाचें उत्तर महाराष्ट्रसाहित्यपरिषदेच्या चिटणिसांनीं आपल्या पांचसात वर्षांच्या अनुभवावरून द्यावें ह्मणजे या प्रश्नाचा निकाल होईल. देशाची पात्रता जितकी असेल तितक्या मानानेंच संस्था निर्माण झाल्या पाहिजेत. भाताच्या शेतांत गहूं पिकावयाचे नाहींत. साहित्यविषयक प्रेम, संस्था चालल्या पाहिजेत अशी उत्कट इच्छा व त्या चालविण्याचें व्यावहारिक ज्ञान या तिन्ही गोष्टींचा अभाव असल्यावर कोणत्याही देशांत साहित्यपरिषदेसारख्या संस्था चालणें अशक्य आहे. गुजराथचा या बाबतींतला अनुभव आमच्या महाराष्ट्रांतल्या अनुभवाहून निराळा नाहीं यांत आश्चर्य नाहीं.

## कोत्या समजुतीचें प्रदर्शन.

'विविधज्ञानविस्तारा'च्या जुलै महिन्याच्या अंकांत वा. शा. इ. नांवाच्या कोणा लेखकाचे दोन लेख प्रसिद्ध झाले आहेत. पहिला श्रीशंकराचार्य यांनीं केलेल्या 'किं ज्योतिस्तव भानुमानहानि' इ. एका आत्मतत्त्वबोधावर आणि दुसरा विद्वानांचा विनोद या विषयीं आहे. दोन्हींत लेखकाचे कोते विचार जागोजाग प्रत्ययास येतात आणि असे गचाळ लेख विस्तारासारख्या वजनदार मासिकांत कसे प्रसिद्ध झाले याचें आश्चर्य वाटतें. पहिल्या लेखांत लेखक प्राच्य आणि पाश्चात्य अशा दोन्ही तत्त्वज्ञानांचा अभ्यास करणाऱ्या तरुणांवर घसरले आहेत. दोन्ही तत्त्वज्ञानांचा अभ्यास करणें किंवा तरुण असणें या दोहोंपैकीं कोणतें तरी एक किंवा दोन्ही त्यांच्या मतें पाप असावें. ज्याअर्थीं तरुण होणें न होणें हें माणसाच्या हातचें नाहीं त्याअर्थीं दुसरे पापाबद्दल मनुष्य जबाबदार नाहीं हें उघडच आहे. पाहिलें पाप कसें हें कळण्यास एखाद्या पंडिताकडे गेलें पाहिजे. व्यास, कपिल व शंकराचार्य यांच्याशीं रोज कपाळफोड करावयाची व घटभेद व पटच्छेद करण्यांत कृतार्थता मानावयाची, तें सोडून प्लेटो, शोपेनहोर, कान्ट इ. परदेशीय तत्त्वज्ञांचा परिचय करून घेण्याची उठाठेव या तरुणांना कोणी सांगितली आहे? हा उठाठेव ह्मणजे नुसता शब्दप्रपंच, पण भारतीय तत्त्वज्ञानाचे ग्रंथ पाठ करून वेळीं अवेळीं त्यांतील वाक्यांचा हवा तसा उपयोग करणें हा शब्दप्रपंच नव्हे अशी य. लेखकाची समजूत दिसते. ही समजूत मूर्खपणाची नसली तरी अत्यंत अनुदार व कोत्या मनाची निदर्शक आहे यांत शंका नाहीं. आमच्या वेदांत, भारतांत, किंवा पुराणांत पृथ्वीतलें वर्तमान व भावी सगळें ज्ञान भरलें आहे, जिज्ञासूनीं त्यांच्या पलीकडे जाण्याचें कारण नाहीं अशा समजुती, आणि विद्वानांचा विनोद यांत दाखविलेल्यासारख्या हरिदासी नकला करण्याचे दिवस गेले त्यांना परत आणण्याची खटपट करूं पाहणाऱ्या पंडितंमन्य लेखकाच्या लेखाला केराच्या टोपलींतच स्थळ द्यावयाचें सोडून असले लेख वाचण्याचा शीण वाचकांना न देण्याविषयीं विस्ताराचे संपादक यापुढें अधिक खबरदारी घेतील अशी आह्मी आशा करतों.

## तरुणांचा काळ

एका सुप्रसिद्ध लेखकानें ह्मटलें आहे कीं १८वें शतक पुरुषांचें होतें; १९वें स्त्रियांचें होतें, आणि हल्लींचें विसावें शतक तरुणांचें आहे. सध्या तरुणांचें वर्तन हा चर्चेचा मुख्य विषय होऊन बसला आहे ही गोष्ट ध्यानांत घेतली तर वरील उक्तींत पुष्कळ तथ्य आहे असें दिसतें. सध्यां तरुणांना नीतिशिक्षण देण्याविषयींचे प्रयत्न निरनिराळ्या संस्थाकडून होत आहेत. पण ना० न्यायमूर्ति सर नारायणराव चंदावरकर यांनीं सुरतेच्या आपल्या एका भाषणांत ह्मटल्याप्रमाणें मुलांच्या शिक्षणाची सगळी जबाबदारी शिक्षकावर टाकून आपण स्वतः स्वस्थ बसणारे आईबाप आपले दशांत आहेत तों पर्यंत अशा शिक्षणापासून विशेषसें कार्य होण्याचा फारसा संभव नाहीं. पूर्वीच्या काळचे गुरु आपल्या घरीं दहापांच शिष्य ठेवीत व ते अहोरात्र त्या गुरूंच्या देखरेखीखालीं राहत. त्या गुरुविषयींची पूज्यबुद्धि ढळविण्यास बाह्य कारणें ही कांहीं नसत. अशा वेळीं तरुणांना खरें शिक्षण मिळे. पण आतां एकेका वर्गांत तीसचाळीस मुलें आणि तीं पांचचार तास शिक्षकाच्या दृष्टीसमोर असणार, त्यांचीं मनें बहकविणाऱ्या अनेक गोष्टी सिद्ध आहेतच. अशा स्थितींत मुलांच्या नीतिशिक्षणाची

…बावदारी शिक्षकावर कां ह्मणून टाकावी. …घेणारांनीं तरी ती आपले शिरावर …य ह्मणून घ्यावी तें आह्मांस कळत …हीं. आईबाप जसें वळण लावतील तशीं … निघावयाचीं हा नेहमींचा नियम आहे. आपल्यावरील जबाबदारी ओळखून आई-…प घरींदारीं वागूं लागतील व मुलांच्या …र्तनावर बारीक नजर ठेवतील तेव्हांच हें …सावें शतक तरुणांचें आहे हें वाक्य …रें होईल. ते न करतां परभारें शाळेंत …क्षकांकडून मुलांना नीतिशिक्षण द्याव-…ाचें, आणि स्वतः घरीं आपण मुलांच्या …ढें अनीति, अव्यवास्थितपणा, आणि …विचार यांचा कित्ता मांडावयाचा असा …ंपर्यंत आईबापांचा क्रम चालूं राहील …पर्यंत सध्याचा काळ तरुणांचा नाहीं असें ह्मणण्याची पाळी येईल.

## मोरोक्को प्रकरण

युरोपच्या राजकीय वातावरणांत अलीकडे एक लहानसा काळा ढग दिसूं लागला आहे. अद्याप हा तळहातायेवढा आहे. पण हा केव्हां विशाल स्वरूप धारण करील याचा नेम सांगतां येत नाहीं. यावेळीं युरोपांतलीं मोठालीं राष्ट्रें शहाणपणानें वागलीं तर कदाचित् हा ढग वितळून ही जाईल. तसें न झालें व लढाईचा प्रसंग अपरिहार्यच झाला तर त्याबद्दलचा दोष जर्मनीकडे येईल. वास्तविक जर्मनीचा मोरोक्कोशीं कांहीं संबंध नाहीं. फ्रान्सची गोष्ट निराळी आहे तेथें फ्रेंचांनीं हक्क संपादन केले आहेत व त्या हक्कांचें रक्षण करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. पण जर्मनीच तसें कांहीं एक नसतां त्या राष्ट्रानें तेथें ढवळाढवळ करण्याचा यत्न केला तर त्याचा अर्थ इतकाच समजण्यांत येईल कीं जर्मनीला लढाई हवी आहे व फ्रान्स आणि ग्रेट ब्रिटन हीं राष्ट्रें जर्मनीची लढाईची हौस पूर्ण करण्यास मागें पाहणार नाहींत. जर्मनीचें लढाऊ जहाज मोठें आहे खरें; पण इंग्रजांनीं आरमाराच्या जय्यत तयारीविषयीं आणि प्रबळतेविषयीं आजपर्यंत जो लौकिक संपादन केला आहे तो सहज रीतीनें घालविण्यास ग्रेट ब्रिटन कधीं तयार होणार नाहीं.

## नव्या युगाचा उषःकाल.

धर्माला आलेली ग्लानि दूर करून सज्जनांचा प्रतिपाळ व धर्माचें रक्षण करण्यासाठीं युगायुगांचे ठायीं परमेश्वर साधूंच्या किंवा अन्यरूपानें अवतीर्ण होतो ही कल्पना बहुतेक सगळ्या धर्मांतून आहे. सध्याचा काळ निःसंशय धर्मग्लानीचा असल्यामुळें या युगांत कोणी अवतारी पुरुष निर्माण होऊन सर्वांचा उद्धार करील अशी उत्कंठा अर्थातच भाविकांना लागून राहिलेली आहे. सर्व धर्मांच्या अनुयायांत भ्रातृभाव उत्पन्न करून विश्वमैत्री स्थापन करणारा हा अवतारी पुरुष असेल असें सध्या भासत असलेल्या गरजा व विद्यमान परिस्थिति यांवरून कोणाही विचारी माणसांस सहज कळून येईल. ख्रिस्ती लोक ह्मणतात कीं येशू ख्रिस्त पुनः येणार आहे. बौद्ध ह्मणतात मैत्रेय बुद्धाचा अवतार व्हावयाचा आहे. हिंदुलोक कलंकी अवताराकडे डोळे लावून बसले आहेत. भौतिक शास्त्रज्ञ अमूर्त अशा ज्ञानप्रसारावर मंगळीं भिस्त ठेवीत आहेत. प्रत्येकाचें ध्येय वेगळें आहे, पण सर्वांचें लक्ष नव्या युगाच्या उषःकालाकडे लागलें आहे. अशा वेळीं मिसेस आनी बिझांट बाईनें मैत्रेयबुद्धाचा अवतार ह्मणून एखाद्या अतिशय बुद्धिमान, व पवित्र आचरणाच्या मद्रासी तरुणाकडे बोट दाखविलें तर ती गोष्ट येवढी हास्यास्पद कां वाटावी तें कळत नाहीं. ईश्वराची करणी अगाध आहे व भविष्यज्ञान हें त्यानें मानव जातीपासून गुप्त ठेविलें आहे ही गोष्ट जरी खरी असली तरी ज्ञान व पवित्राचरण यांच्या योगानें त्या भविष्याचें अंतर्ज्ञान कांहीं निवडक व्यक्तींना होणें हल्लींच्या काळांत सुद्धां असंभवनीय नाहीं.

## सिगारेटच्या पायीं हानि!

सिगारेट वस्तु ती केवढी! पण तिच्या पायीं हिंदुस्थानांतून गतवर्षीं एकवीस लक्ष सत्तर हजार दोन शेंरुपये परदेशीं गेले! आमच्या देशांत आबालवृद्धांना या सिगारेटनें कसें वेड लाविलें आहे पहा! जहागिरदारापासून तों मजुरापर्यंत सगळ्यांना वेड लावणारें याच्यासारखें व्यसन चहापानाखेरीज दुसरें नाहीं. दुर्दैवाची गोष्ट ही कीं या व्यसनांत शाळेंत जाणारे विद्यार्थी सुद्धां गुरफटले गेले आहेत. या व्यसनानें नुसती द्रव्यहानिच होते असें नाहीं, तर मुलांच्या शरीराची सुद्धां हानि होत आहे. तरीपण या गोष्टीकडे आईबापाचें, विद्याखात्याचें किंवा सरकारचें लक्ष अद्याप जात नाहीं. हैसूर संस्थानानें मुलांना सिगारेट विकणाराला दंड ठेविला आहे तसा कांहीं निर्बंध इकडे नको काय?

## प्राथमिक शिक्षण.

गेल्या बुधवारच्या जाहिरसभेंत खालील दोन प्रासादिक, शुद्ध व सरळ पद्यें झालीं तीं सर्व मुलामुलींनीं मुखोद्गत करण्यासारखीं असल्यामुळें आह्मी खालीं प्रकाशित करीत आहों.

देवा पाव रे पाव रे सत्वर। आह्मा देई वर
देवा पाव रे। ध्रु०
पसरी ज्ञानाचे कर दूर। हत्तम झाडी पार।
देवा पाव रे ॥ १ ॥
आह्मी निद्रेला वश झालों। घोरत शतकें पडलों।
पूर्वार्जित विसरून गेलों। नूतना सहजी मुकलों।
देवा पाव रे ॥ २ ॥
दयार्द्र राजांनीं उठविलें। विद्या प्राशन दिधलें।
तेणें सभाग्य कांहीं झाले। करंट किति तरि उरले।
देवा पाव रे ॥ ३ ॥
गेलीं सुधारलीं राष्ट्रें दूर। आह्मी मागें फार।
त्यांते गांठाया बहुवार। धरितो इच्छा थोर।
देवा पाव रे ॥ ४ ॥
धन्य श्री मिंटो मुरली। वाजतां तयांची मुरली।
नृपति सभेचीं द्वारें खुललीं। सर्वे प्रजेचीं चित्तें
खुललीं। देवा पाव रे ॥ ५ ॥
ठाकले विबुधवर गोपाळ। ह्मणति पातला हा
काळ।
शिकवूं सकल बालिका बाळ। करूं अज्ञान—
दुष्काळ। देवा पाव रे ॥ ६ ॥
उदार बुद्धि हें सरकार। विद्येला सहकार।
उघडो धनिक निज भांडार। दावो तरुण
युवभर। देवा पाव रे ॥ ७ ॥
जरि विद्याधन निजधन ओघा। प्रेमेंच मिळूनी
दापीं।
तरि खचित वाट समजूं सोपी। गांठु भिउ न
कदापी। देवा पाव रे। ॥ ८ ॥
हें कार्य हळु हळु लाभे। परिस्वच्छंखल
मतिचें में।
हें फल शांतिविचार लाभे। ईशप्रसाद लाभे।
देवा पाव रे ॥ ९ ॥

परेश चरण वंदूनी। धरूं सुपंथ हा खरा।
अजाण बालबालिकांस। नेउं ज्ञान मंदिरा ॥ध्रु॥

ज्ञान देई नरास शक्ति
सृष्टी हो तया वश
प्रचंड देह हस्तिला
वळवी शीघ्र अंकुश।
अगाध जलधि नाविका
सुतर जाहला भृश
खगा परिस होय तें
सुगम गगनाहि नरा।
परेश ॥ १ ॥

ज्ञान बीज बद्ध करी
दूतिका नियोजिली
लाविते प्रदीप दीप
चालली रथावली।
दास्य करित अग्निची
शिखा ही सौम्य जहाली
काढिता ही मधु रवा
क्षीण वसु किंनरा।
परेश ॥ २ ॥

ज्ञान देइ दिव्यचक्षु
मित्र चर्म चक्षूचें
दृश्य पूर्वी अदृश्य जें
जवळ होय लांबचें।
विश्वगूढ बिंदुमाजि
पथांत येई दृष्टिचे
कितीक जंतु जीव खाति
कितीक देति आसरा।
परेश ॥ ३ ॥

ज्ञान जोडी वित्त मित्र
करी नवास निर्भय
ज्ञान देई रुचिर मोद
ज्या नसे कदा व्यय।
ज्ञान असें मिळविण्याम
देऊ संधि हा नय
बोध करा सतत झटा
शांति मनीं परी धरा। परेश— ॥ ४ ॥

गेल्या बुधवारीं सायंकाळीं प्राथमिक शिक्षणा संबंधानें प्रचलित असलेल्या बिलाविषयीं लोकमत जागृत करण्यासाठीं जाहिरसभा भरली होती. नामदार गोखले यांनीं हें बिल पुढें आणिलें आहे आणि तें बिल अशा सुंदर स्वरूपाचें आहे कीं त्या बिलाअन्वयें कोठें कायदा होणार नाहीं तें राष्ट्र सुधारणेच्या पहिल्याच पायरीला आलें नाहीं असें इतिहास सांगतो. या बिलाची सर्वत्र चहा होऊन राहिली आहे इतकेंच नाहीं तर लोकमत असा प्रश्न करितें कीं आमच्या ब्रिटिश सरकारांनीं ही कनिष्ठ विद्यादेवी अजून कशी सर्वसाधारण केली नाहीं. या जाहिरसभेंत रा० रा० नटेश आप्पाजी द्राविड यांनीं या बिलाचा सर्व इतिहास फार रसाळ वक्तृत्वानें लोकांपुढें मांडिला आणि सर्वांनीं एकदिलानें अशा बिलाबद्दल अनुमती, सहानुभूती आणि आदरस्वीकार व्यक्त केला हें निराळें सांगण्याचें कारणच दिसत नाहीं.

प्राथमिक शिक्षणाच्या बिलाला पुष्टिदायक असा जाहिर ठराव पसार होतांच रा० रा० आण्णासाहेब महाजनी यांनीं श्रोतृसमाजास उद्देशून बोध केला कीं हा ठराव पसार करणें ह्मणजे प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व आवश्यक करण्याविषयीं सर्वांनीं यज्ञकंकणच बांधलें आहे असें समजावें. प्राथमिक शिक्षणाचा विजय ह्मणजे डोंगरावरच्या देवीचें दर्शनच होय. हा प्रश्न बिकट व फार पैशाचा आहे ह्मणून तो यशस्वी करण्यास मागें सरूं नका. सरकार आपल्या वैभवाप्रमाणें या सुप्रसंगाला थैली ढिली करण्यास कचर खाणार नाहीं तथापि लोकांचें कर्तव्य ह्मणजे मुनिसिपालिट्या व जिल्हा बोर्ड संस्था आपला उदार पद्महस्त पुढें करितील तेव्हां नवीन करांचा बोजा पतकरण्यास सर्वांची तयारी पाहिजे. सध्यां प्रश्न मुलांच्या शिक्षणासंबंधानें आहे पण उमरावतीच्या वनितासमाजानें तर असें जोरानें प्रतिपादित केलें आहे जर मातृपदीं येणाऱ्या मुलींना हें शिक्षण मिळणार नाहीं तर नामदार गोखल्यांचें बिल लंगडें, पंगु व सत्वहिन राहील असें समजावें. आह्मी उमरावतीच्या वनितांचे धन्यवाद गातों आणि त्यांच्या विचाराला पूर्णपणें अनुकूलता प्रदर्शित करितों.

प्राथमिक शिक्षणाचीं योग्य मुलें ६ पासून १० पर्यंत वयाचीं असतात आणि असा अंदाजा आहे कीं लोकसंख्येपैकीं शेंकडा १५ या मानानें विद्याभ्यास करण्याच्या वयाचे लोक असतात आणि या दरशेंकडा १२ पंधरा पैकीं सरासरी १० पासून १२ पर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या वर्गांत जाणारे विद्यार्थी निघतील. या एवढ्या समूहाला विद्यामृत मिळेल इतक्या शाळा व इतकींच साधनें उपलब्ध पाहिजेत आणि त्यानंतर हें शिक्षण सक्तीचें करावयाचें आहे. या संबंधानें इतर प्रांताप्रमाणें आमच्या वऱ्हाडांत ही एक प्राथमिक— शिक्षण— प्रसारक मंडळी निघाली असून तिचा हेतु हा शिक्षणाचा प्रश्न उत्कृष्ट सोडविण्याचा आहे तेव्हां अशा संहतीच्या प्रयत्नाला लवकरच ईश्वर यश देईलच देईल.

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—पाऊस सोन्यासारखा झाल्यामुळें सृष्टीचें रूप सुंदर हिरवेंगार बनलें आहे. कालरा शांत झाला आणि लोक सुखाचे मनोराज्य करीत आहेत. एकंदर पाणी १२।१३ इंच झालें.

रा० रा० गोपाळ सखाराम खेर बी. ए. एल एल. बी० यांस आफि. मुनसफ करून आकोल्याच्या कोर्टावर नेमल्याअन्वयें ते काम करूं लागले.

## सुधासिन्धु

सुख संचारक कंपनी मथुरा यांची तयार केलेलीं व सरकारांत रजिस्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षापासून लोकांत अनुभविलीं आहेत.

## सुधासिन्धु

हे कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिंवळे जलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादींवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.

## दद्रुगज केसरी

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कात मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आणे १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलीं जातात, व कामिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मामालक,
न. १९९ सुख संचारक कंपनी, मथुरा.

सुधासिन्धु सुधा

अशी संधी पुन्हां येणार नाहीं.




**जंटलमन् इमिटेशन रास्कोप सिस्टिम** नांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पताः—खोजा वल्लीभाई इस्माल
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ४

चिरकालचा खरा लाभ कोणता ?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो !
महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

(वार्षिक वर्गणी ट.ख.स रु.१॥) **कलाशिक्षण** (नमुना अंकास ०)॥आ)

नांवाच्या विविध हुन्नर, शास्त्रीय ज्ञान, व्यापार शेतकी, व इतर शेंकडो विषयांची माहिती शिकविणाऱ्यास वर्गणीदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालूं मार्च अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य **हवें शिवाय** ग्राहकांस हिप्नॉटिझम [ Hypnotism] **ऊर्फ अमेरिकन** वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रा-मोहन, आरोगहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु. २५ फीची तूर्त रु. ११ त शिकवूं. पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा. बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या. औषधी. मंत्रतंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो.

व्यवस्थापक— कलाशिक्षण, कार्यालय
नो. नं. ५ बडोदें.

### नोटीस

**विहार आनन्दका सागर रंगीन तसबीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.**

आजी हमसे मंगावो घेकेसे बचो स्त्री पुरुशोके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्र दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रम, शैय्यातैय, कामस्थान सोलासगारें, बतीसोआमूषण, वजनअर्द्धिमग्रान पुत्रस्रीकर्न, नपुंसकचिया, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोकी चिकित्सा औषधे, पशुभाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण मुद्रां विया आदि अनुरुप विषयका भंडार किंमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा
नो० नं० ७७ अलीगड सिटी.


### नोटीस

जयराम आपा गोविंदा आपा लिंगाईत वाणी मलकापूर हल्लीं वस्ती बोदवड ता० भुसावळ यांसः—

विष्णुसा बाळकृष्णसा सावजी दुकान मलकापूर यानकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आमचे मालकीची कसबे मलकापूर येथील हवेली भाड्यानें राहण्यास घेऊन दरमहा दोन २ रुपये प्रमाणें भाडें देण्याचें कबूल करून भाडेंचिठी तारीख १७।६।०७ रोजीं लिहून दिली आहे त्याप्रमाणें भाड्याचे रुपये ही दिले नमून घरही सोडून आमचे ताब्यांत दिलें नाहीं ह्मणून रजिस्टर नोटीस दिली ती तुह्मी न घेतां वापस केली. करितां तुह्मांस या नोटिशीचे द्वारें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पोंचल्या पासून १५ दिवसांचे आंत भाड्याचे रुपये व घर खालीं करून द्यावें. याप्रमाणें न केल्यास या नोटिशीचे पोंचल्या तारखेपासून जागा खालीं करून ताब्यांत देईपर्यंतचें भाडें दरमहा १५ रुपये घेतलें जाईल व दिवाणी कोर्टीत केलेल्या दाव्याचा खर्चही तुमचे कडून घेतला जाईल. कळावें. तारीख २६।७।११ इ०

सही
विष्णुसा बाळकृष्ण सावजी
दस्तुर रामभाऊ.

नो. नं. ३२५

### नोटीस

नोटीस बेशमी— लखु वल्लद रामजी जानोरकार राहणार दावकी ता० व जि० आकोला यांसः—

खालीं सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आपण माझे लग्नाचे नवरे असून लग्न झाल्यास आज अजमासें १५ वर्षें झालीं. मी सज्ञान झाल्यावर आपणाकडे फक्त १ महिनाभर नांदण्यास आलें होतें व नंतर मी आपले भावाकडे आज सहा वर्षेंपर्यंत राहत आहे आपणांस पांचसहा वेळां मला नेण्याबद्दल निरोप पाठविले असतां आपण मला नेलें नाहीं. व माझे इतके दिवस झालेले खर्चाबद्दलही कांहीं तजवीज केली नाहीं. तरी ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत मला दरसाल रुपये ५० प्रमाणें सहा वर्षांचा झालेला खर्च रुपये ३०० देऊन आपले घरीं नांदण्यांस न्यावें. याप्रमाणें न केल्यास ही नोटीस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन व मग माझ्यावर आपला नवरेपणाचा कांहीं हक्क चालणार नाहीं व खर्चाचे रुपये ३०० या नोटिशीचे खर्चासुद्धां कोर्टमार्फत दावा करून वसूल घेऊं. कळावें. ता० ३१ ७-११ इ०

सही
अहिलाबाई मर्द लखु वल्लद रामजी
जानोरकार नि० बांगडी
रा० आडगांव
ता० अकोट.
दस्तुर— दत्तुजा वल्लद बाळकिसनजा रंगारी.

नो० नं० ३२६

### नोटीस

रा० तुकाराम भगवान पाटील रा० देवर्ड ता० अकोट

यांसः—

खालीं सही करणार इचेकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी वि० जुनीयर मुनसफ साहेब अकोला यांचे कोर्टीत दि० मु० नं० ३८० सन १९१० चा केला होता. त्यांत तुम्हास माझे तर्फेनें मुकत्यारपत्र दिलें होतें. परंतु तुह्मी मुकदम्याचें काम कांहींच केलें नाहीं व विरुद्ध पक्षास जाऊन मिळाला आहांत तरी तुमचें मुकत्यारपत्र आज तारखेपासोन रद्द केलें आहे. यापुढें जर तुह्मी सदरहु मुकत्यारपत्राचे आधारें माझे करितां कोणतेहि प्रकारचे कोर्टीतील काम कराल तर तें बातल असे. यापुढें तुह्मास मुकत्यारपत्रांवरून कोणताहि अधिकार राहिला नाहीं कळावें. ता. २७-७-११.

सही
सोताबाई मर्द गंभीरजी नि० बगांडी
नो० नं० ३२७

### नोटीस

नोटीस बेशमी लक्ष्मी मर्द किसनसिंग जात रजपूत राहणार हिंगणें हल्लीं मुक्काम आकोला

हिला:-

मी खालीं सही करणार काशी मर्द सरदारसिंग नोटीस देतें कीं मी तुमच्यावर दिवाणी मुकद्दमा नंबर १० सन १९०८ चा विद्यमान ॲडिशनल डिस्ट्रीक्ट जज कोर्टांत आणिला होता. सदर्हु मुकदम्यावर मे० जुडिशीयल कमिशनर नागपूर यांजकडे तुह्मी दिवाणी अपील नंबर ९३ सन १९०९-चें केलें. त्यावरून राहण्याच्या घरांपैकीं घर किंवा त्याबद्दल दोन रुपये महिना तुह्मास देण्याबद्दल मला हुकुम झाला आहे. सदर्हु अपीलाच्या निकालापासून तुह्मी घराबद्दल केंव्हांहि मागणी केली नाहीं. ह्मणून मी तुह्मास नोटीस देतें कीं खालीं वर्णन केलेलें घर तुह्मी तुमच्या ताब्यांत घ्यावें. मी तुह्मास भाडें देणार नाहीं. तुह्मी तेथें रहावयास न आल्यास भाड्याबद्दल माझ्यावर कांहीं जबाबदारी नाहीं.

मौजे हिंगणें तालुके अकोला येथील घराचें

वर्णनः—

घर १ आडे ३ वर खपरेल पूर्वपश्चीम अंदाज हात १० दाक्षिणोत्तर हात १८ चारी बाजूंनीं दिवाली; दरवाजा पूर्वेस आहे. चतुःसीमा पूर्वेस रस्ता, पश्चिमेस खुली जागा, दाक्षिणेस रंभाजी कुणबी यांचें घर, उत्तरेस कल्याणसिंगचें घर.

कळावें तारीखें २८-७-१९११ इसवी.

सही
काशी मर्द सरदारसिंगें इचे हातची निशाणी
बांगडी.

नो नं ३२८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
**सुचनाः–** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील; यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।१२।०९ } एजंट
नं. १

## यंदाचा पाऊस.

यंदा पावसानें लवकरच कंबर बांधल्यामुळें ओला चारा लवकर मिळूं लागेल यांत शंका नाहीं. तथापि तुमच्या गुरांना आतां पासूनच ओला चारा घालणें अपायकारक आहे. कारण पुढें कदाचित पावसानें ओढून धरल्यास हिरवा चाराही नाहींसा होणार आणि हिरव्याची चट लागल्यामुळें वाळलेला कडबा गुरें खाणार नाहींत. बरें ओली वैरण पहिल्यापासूनच मुबलक मिळाली तरी ती एकदम गुरांना मुक्त केली असतां ती त्यांना पचत नाहीं. याकरतां या वेळींच वाळलेल्या कडब्याचे अगदीं बारिक तुकडे करून त्यावर मिठाच्या पाण्याचा शिडकाव घाल तर तुमचीं गुरें फार गोडीनें वैरण खातील. या कामासाठीं आमचें सुधारलेलें **कडबा कापण्याचें यंत्र** वापरा. कारण आमचें यंत्र शेतकऱ्यांनीं, गवळ्यांनीं व पागा आफिसरांनीं ही पसंत केलें आहे. किंमती बद्दल विचाराल तर फक्त १० रु. ९ आणे पडतात.

**किर्लोस्कर बंधु.**
पोष्ट किर्लोस्करवाडी, औंध
नो. नं २९० (औंध संस्थान जि. सातारा)

## विलक्षण नयन रुक्कुठार.

**विलक्षण नयन रुक्कुठार** – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार–**खुपऱ्यां, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल इ०** जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग.

---

### जाहिरात

**व**र्षफल—प्रत्येक महिन्याचे फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. **खर्च ८=** जन्मकाल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

**पत्ता—** भा० गो० पंडित,
रा- व पो० लेणखेड प. खानदेश.

### जाहिरात.

**टेक्स्ट बुक कमिटींत** पसंत होऊन मे. **डैरेक्टर** सा. ब. **मध्यप्रांत** व वऱ्हाड यांनीं व्ह. आणि अ. व्ह. शाळांतील बक्षिस व लायब्ररया साठीं मंजूर केलेलें प्रसिद्ध धनुर्धारी कृत;-

१ **व्यापारी वाचनपाठ.** किं० ॥.
त्याच प्रमाणें २ **पिराजी पाटील** किं०. ॥।.
३ **उपाशी महाराष्ट्रांस उद्योग** किं०. ।=
४ धर्मावरील मार्मिक निबंध अंक १ ते १४; १०० बुकांस ।=रु० (पुर्वी १॥ किं० होती) १००० अगर ज्यास्त एकदम घेतल्यास .।– व त्याहून ज्यास्त घेतल्यास वरील प्रमाणें देऊं. निदान १०० तरी घेतलीं पाहिजेत.

नंबर १, २ व ३ यांच्या प्रती एकदम १० घेतल्यास अनुक्रमें ॥= व । व ज्यास्त घेतल्यास ॥– व .।. किंमतीस देऊं.

टपाल खर्च निराळा—व्ही. पी. नें मागविल्यास निदान एक त्रितीयांश, तरी किं० आगाऊ आली पाहिजे.

ल. वें. मांजरेकर आणि कंपनी
बेळगांव

**श्री राधावल्लभाजयति**

## वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान, तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल वी० पी० द्वारा ॥ रुपये में भेज देंगे. हमारे हांथ जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हैं, अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ८॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगो लीजीये.

मिलने का पता:—
गोस्वामी राधामोहन शर्म्मा
चित्तीखाना आगरा.

---

*** इकडे लक्ष द्या! ***

## नाग, नरसे व पिठोरी

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या, पिठोरी, पाठोडा, गणपती बुध, बृहस्पती व तुळशीचें लग्न वगैरे चित्रांचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेंकडा १ रुपया. चित्रें हजार घेतल्यास दर शेंकडा ८१४ आणे प्रमाणें देऊं.

बाळकृष्ण अनोबा दलाल,
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार
अकोला.
(पत्रें विठ्ठलमंदीराच्या पत्त्यावर पाठवावीं.)

---

## मुंबई बँकचें सोनें.

**मु**ंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या **सोन्याच्या** चिपा मुंबई बँकच्या **आकोले** व **उमरावती** येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१९.१० } एजंट.
नो० न० २

## खरें सचोटीचं दुकान.

नासिक येथील अस्सल चांदीचीं भांडीं-आमचे दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
आदित्यवारपेठ, नाशिक. नो. नं. ३३६

### नोटीस

नोटीस बेशमी किसन वलद रामजी फुलमाळी अडनांव उमाळें राहणार वरुड पो० तिवसा ता० चांदुर रेल्वे जि० उमरावती यांसः –

नोटीस देणार गणु वलद जनाजी फुलमाळी अडनांव डोळस राहणार दापुरी पो० नेरपिंगळाई ता० मोर्शी जि० उमरावती नोटीस देतो कीं माझी सावत्र बहीण नामें भीमी ही तुमची लग्नाची बायको असून तिला शांतीक येण्यास तीन वर्षें झालीं आहेत. पहिल्यानें तुमचे घरीं सहा महिने ती राहिली परंतु तुह्मी स्वतः वेडे असल्यामुळें तिला नांदविलें नाहीं. तुह्मी आपल्या वेडेपणांत तिला भलत्याच वेळेस मारावें रात्रीं. झोपेंत ओढून विहिरीवर न्यावें. व विहिरींत लोटण्याची खटपट करावी तेव्हां तिनें कल्ला केला म्हणजे शेजारचे लोकांनीं सोडवावें. व संसार कसा करावा याची तर तुह्मी वेडे असल्यामुळें परवाच नाहीं. सबब असा त्रास सोसून तिनें तुमचे येथें सहा महिने काढिले असें असून तुह्माला स्वतः राहण्यास घर वगैरे कांहीं नसून तुह्मी तुमचे मामाचे घरीं राहता. यावरून मी तिला आपले घरीं आणलें. माझे घरीं राहण्यास आज अडीच वर्षें झालीं आहेत इतके मुदतींत तुह्मी वेडे असल्यामुळें नेण्यास मुद्दां आले नाहीं. तरी तुह्मास कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत दरमहा ४ चार रुपयेप्रमाणें अडीच वर्षांचा खाण्याचा खर्च १२० रुपये द्यावा व तिची फारकती द्यावी. असें न केल्यास ही फारकती समजून तिचा दुसरा घरठाव करण्यांत येईल. व खाण्याच्या खर्चाबद्दल कोर्टांत फिर्याद करून घेतला जाईल व कोर्टखर्च तुह्मावर बसेल कळावें ता. १७-७-११ इ.

सही.
गणु वा जनाजी फुलमाळी
अडनांव डोळस राहणार
दापुरी पो० नेरपिंगळाई
ता० मोर्शी जि० उमरावती याचे हातचीं अंस.
नो. नं. ३३०

### चुकीची दुरुस्ती

जाहिर नोटीस वऱ्हाडसमाचार पत्राचे २९ मे १९११ चे तारखेस प्रसिद्ध केली आहे त्यांतील ५ व ६ व्या ओळींत 'कायद्याप्रमाणें दत्तविधान होण्यास अवधि आहे' असें वाक्य आहे. तें चुकीचें [illegible] तेथें 'कायद्याप्रमाणें **सज्ञान** होण्यास [illegible] आहे,' असें समजावें. आकोला. १७।७।११

सही (मारवाडींत)
गौरीशंकर महादेवजी मारवाडी मेसरी अ० पा० करणारा जन्मदेता बाप चुन्नीलाल रूपचंद रा० खानापूर ता० बाळापूर दस्तुर खुद.
नो. नं. ३२२

---

हें पत्र आकोला येथें [illegible] बाळाजी [illegible] यांनी वऱ्हाडसमाचार छापखान्यांत [illegible] यांनी सदा-शिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

## NOTICE.

The following extract from Government of India, Home Department, Resolution No. 2831-42, dated the 8th. December 1899, is published for general information.

NAGPUR:
The 9th August 1911

E. A. deBrett,
Chief Secretary to the Chief Commissioner
Central Provinces.

---

### RESOLUTION.

The Secretary of State for India has brought to the notice of the Government of India that it not infrequently happens that natives of India, — — students or others, who have proceeded to England, desire to obtain passport to enable them to travel to foreign countries in which the possession of a passport is necessary or desirable, and that difficulty often arises from want of evidence to show that the applicant is a British subject and therefore - - entitled to a passport. Appeals for assistance are also frequently addressed to his Lordship by destitute Indians who desire to return to their country and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete the course of education.

2. In order to enable the Secretary of State to deal with such cases satisfactorily, the Governor-General in Council has decided that it is necessary to press upon Indian students and others visiting England the desirability of providing themselves, before their departure from India, with an — — — authoritative certificate of identity, in the form appended to this Resolution, signed by the head of the district ( in a Presidency Town, the — — — Commissioner of Police ) in the case of residents of British India and by the Political Officer in that of residents of Native States. For a student the certificate should be signed by the head of his last school or college and countersigned by the District Officer ( in a Presidency Town, the - - - - - - - Commissioner of Police ) or Political Officer, as the case may be:-

#### FORM OF CERTIFICATE OF IDENTITY.

1. Name of applicant ————————
2. Father's name and caste ————————
3. Residence ————————
4. Age of applicant ————————
5. Nationality of applicant* ————————
6. Social and pecuniary status of father ( or guardian ) ————————
7. Date of probable departure of applicant from India ————————
8. Object of applicant's visit to England ( Europe ) ————————

Signature of District Officer ( in a Presidency Town, the Commissioner of Police ), or Political Officer, or head of school or college.

No N. 342

Date ————————

*i. e., whether a British subject by birth or by naturalization ( or a subject of a Native state ).

†Countersignature of the District or Political Officer should be obtained on — - - certificates signed by heads of schools or colleges.

---

## नोटीस

रा. रा. वासुदेव भट बिन आंबादास भट जोशी रा० कसबे अडगांव ता० आकोट व तानी मर्द महतापसींग यांसः—

खालीं सही करणार, रा. नेहोरी बुजरुख ता० आकोट, याजकडून नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं, आमचें शेत मौजे मजकूर येथील सर्वे नंबर २१ चें तुह्मी साल मजकुरीं बटाईनें वाहण्यास कबूल करून बटाईखत लिहून दिलें परंतु शेत वाहण्यास आलें नाहीं सबब आह्मीं तुह्मास नोटीस देऊन जबाब मागीतला होता त्यानंतर तुह्मी आह्मास ता० १९-६-११ रोजीं भेटले व लागवडीस रु० मागूं लागले. तुमचे दस्तैवजांत आह्मी रु० देण्याचे कबूल केले नसून ही तुमची भलमनसाइ जाणून आह्मी तुह्मास ता० २६ रोजीं अडगांवांतून रु० २०० लागवडाकरितां काढून दिले. तेथें रु० सावकारांनीं माझे नांवें मांडले तुह्मी २।३ दिवसांनीं येऊन रुपयांचा दस्तैवज करून देण्याचें कबुल केलें. पुढें शेताची किस्तकारीही केली नाहीं व रुपयाचा दस्तैवजही करून दिला नाहीं. तुमचे मनांत बेमानकी येऊन आह्मांस उलट नोटिशीचा जबाब शेत सोडल्याबद्दल देऊन त्यांत आमचे रु० १०० घेणें आहेत अशी खोटी नोटीस दिली या करितां विश्वासघात केल्याबद्दल तुमचेवर मी फिर्याद करीत आहे कारण माझी इज्जत तुमचे पेक्षां कमी आहे असें नाहीं व तुमची इतकी इज्जतही नाहीं कीं तुह्मी मला रुपये १०० द्याल. याकरितां नोटीस देतों कीं हल्लीं किस्तकारीचे दिवस असून आह्मी शेतास लागवड लावणें सुरू केलें. तुमचे मनांत रुपये बुडविणें आहे. करितां उलट आह्मास खोटी नोटीस दिली तुमचे जवळ पैसे असते तर आमचे पासून लागवडीस रुपये तुह्मी मागितले नसते. यावरून उघड दिसतें कीं तुमचे मनांत बेमानकी येऊन रुपये बुडवावे असें आहे. तरी ही नोटीस पावल्या दिवसांपासून शेतीस लावलेला लागवडीबद्दल व तुह्मी नेलेले रुपये २०० हे ८ दिवसांत दाखल करावे. नाहीं तर तुमचेवर फौजदारींत फिर्याद केली जाईल व शिवाय लागवड व दिलेले रुपये २०० कोर्टखर्चासुद्धां व नोटिशीचे खर्चासुद्धां भरून घेतले जातील. कळावें. तारीख ४-७-११ इ०

सही
रामराव आनंदराव याचे हातचे
अक्षरांची निशाणी
नो. नं. ३४१ असे.

---

## नोटीस

भिवसन्या वा। भोन्या महार राहणार ( मुक्याचें ) शिरसगांव ता० खामगांव

यांसः—

मी सोनी मर्द भिवसन्या महार रा० सागद ता० बाळापूर जि० आकोला नोटीस देते कीं मी तुह्मी गंधर्वाची स्त्री असून मजला वयांत येण्यास ९ वर्षें झालीं आहेत. व तुमचें माझें गंधर्व होण्यास ४॥। वर्षें झालीं आहेत. मी तुमचे घरीं गंधर्व झाल्यावर १ वर्ष राहिले; परंतु स्त्रीपुरुषाचा जो संयोग त्या कामाला तुह्मी योग्य नसून ह्मणजे तुह्मी नपुंसक असून मला ह्मणता तूं परद्वार कर व माझे नांवावर रहा. परंतु माझे आईबाप इज्जतदार असून त्यांची इज्जत मी कमी करणार नाहीं. बल्जबरीनें तुह्मी मला परद्वार करण्यास लावणार होता ह्मणून मी माझे भावास निरोप पाठवून माझे आईबापाचे घरीं गेले. माझे आईबाप नादार असल्यामुळें मी आज ४ वर्षांपासून दुसऱ्याचें कर्ज काढून निर्वाह करिते. परंतु तुह्मी मी गेले तेव्हांपासून माझे आईबापाचे गांवीं मला नेण्याकारितां एक दिवस सुद्धां आला नाहीं; आतां मी किती दिवस तरी कर्ज काढून खावें? व तुमच्या दोन्ही लक्ष्म्या माझ्या अगोदरच्या, एक लग्नाची व एक गंधर्वाची तुह्मी नपुंसक असल्यामुळें दुसरा नवरा करून गेल्या. मी इज्जतदाराची असल्यामुळें आज ४॥। वर्षांपासून राहिले. माझे भाऊ तुमचे गांवीं फारकती मागण्याकारितां आले असतां तुह्मी त्यांना १०० रुपये मागता व तुमचे गांवचे पाटील २९ रु० मागतो. २९ रु० दिले तर मी माझे महाराप्त फारकती देण्याचें सांगतों. नाहीं तर फारकती देऊं देणार नाहीं असें ह्मणतो. परंतु माझे आईबाप फार दरिद्री असल्यामुळें त्यांच्याजवळ ९ रुपये सुद्धां नाहींत ह्मणून विनंती करण्यांत येते कीं, जर तुह्मी स्त्रीपुरुषाचा जो संयोग त्या कामाला योग्य झाले असाल तर मे० सिविल सर्जन साहेबांचें सर्टिफिकेट घेऊन व माझ्या खावटी वगैरे बद्दल दरमहा ९ रुपयांप्रमाणें ४॥। वर्षांचे २८९ रुपये देऊन नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत मला घेऊन जावें. वर लिहिल्याप्रमाणें कोणतीच तजवीज न झाली तर मी हीच फारकती समजून दुसरा गंधर्वाचा नवरा करीन मग नवरेपणाचा हक्क तुमचा बिलकूल राहणार नाहीं. कळावें ता. ९-८-११ इ.

सही
सोनी मर्द भिवसन्या महारीण
नि० बांगडी
दस्तुर होन्या वा। जिवन्या याचा
आंगठा आज मु० आकोला.

नो. न. ३४०

---

## नोटीस

रा० शंकर दामोधर उमेदवार रा० मूर्तिजापूर

यासः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे सांज्यापूर येथील सर्वे नंबर ३७ एकर २४ गुंठे ८३९ आकार ४४ याचें खातें पार्वतीबाई मर्द नारायणराव हिचे नांवें असून तिनें आपला मालकीचा हिस्सा एकद्वितीयांश हा तुह्मास विकत घेण्याविषयीं सांगीतलें. तुह्मी तिचा हिस्सा घेण्याचें नाकारलें ह्मणून सदरील पार्वती हिनें आपला हिस्सा मजला ता० २१-३-११ रोजीं विकत दिला असून त्याचें खरेदीखत मी करून घेतल्यानंतर तुह्मी सदरील शेतांतील हिस्सा रुपये ९०० शांस मजपासून घेण्याचें कबुल केलें. त्याप्रमाणें तुमचें मानस घेण्याचें असल्यास नोटिसीचे तारखेपासून ८ दिवसांत रक्कम देऊन खरेदीखत करून घ्यावें. याप्रमाणें न केल्यास पुढें तुमची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. हें तुह्मांस कळावें ता० २-८-११. सही

बाजीराव आक्काजी देशमुख द० खु०
नो. नं. ३३९

---

## जाहिरात.

**टेक्स्ट बुक कमिटींत** पसंत होऊन मे. **डैरेक्टर** सा. व. **मध्यप्रांत** व वऱ्हाड यांनीं व्ह. आणि अ. व्ह. शाळांतील बक्षिस व लायब्रऱ्या साठीं मंजूर केलेले प्रसिद्ध **धनुर्धारी** कृत;-

१ **व्यापारी वाचनपाठ.** किं० ॥.
त्याच प्रमाणें २ **पिराजी पाटील** किं०. ॥।
३ **उपाशी महाराष्ट्रास उद्योग** कि०. ।=
४ धर्मावरील मार्मिक निबंध अंक १ ते १४; १०० बुकांस ।=रु० ( पुर्वी १॥ किं० होती ) १००० अगर ज्यास्त एकदम घेतल्यास ।– व त्याहून ज्यास्त घेतल्यास वरील प्रमाणें देऊं. निदान १०० तरी घेतलीं पाहिजेत

नंबर १, २ व ३ यांच्या प्रती एकदम १० घेतल्यास अनुक्रमें ॥= व । व ज्यास्त घेतल्यास ॥– व ।. किंमतीस देऊं.

टपाल खर्च निराळा—व्ही. पी. नें मागविल्यास निदान एक त्रितीयांश तरी किं० आगाऊ आली पाहिजे.

ल. वें. मांजरेकर आणि कंपनी
बेळगांव

---

## Notice.

D. Y. Phatak oil-engine expert for ielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq
Pleader
Amraoti.

No N. 3

## आर्यवनौषधालय मुर्डी.

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांकडील आनररी असिस्टंट सर्जन मार्जी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधे बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिलें आहे. हे अवश्य लक्ष ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखाद औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंभक,
क्षयशोधक, मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जो धातु ती शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरुपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पाहिजे या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उन्हाळे इंद्रियाशिथिलता, कडकी. गर्मीसंबंधीं मुरलेले विकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपाणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय त्रमांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडूरोग मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जूनाट परमा, मुष्ठीमैथूननें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सत्तेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्धि, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतीचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सार्टिफिकीटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपानखर्डे सोबत दिला व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील.

दरः—एकदम ३१ गो० १ रु०, ७१ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १२५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें वडस. साहर, फुल, खुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु० २

३ दंतबळवर्धक पूडः—दंत संबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें बिषः—औषध लावतांच उतरतें मुळ्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्णः—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नहींत. १२ पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधानें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढू नये ह्मणून घातावर मात्रा ठेवून याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं, औषधांत अपाय कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सार्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यतं अगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतुन औषधांच्या अनेक जाहिराती सुरू असुन प्रत्येक जाहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पाहात आहे.

आपला समाज निरुद्योगी आळशी बनल्यामुळें एकदा जो धंदा सुरू केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून वाटेल त्यानें करावें आमच जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिर्ले वगैरे गावांतून तो पुणावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याची तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १९।२० वर्षें अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधीनें कल्याणवर्धी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असले। व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उन्नतावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटाटींत यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्यबंधूंस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरवी, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें ती खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून न त्वरित आरोग्य येईल- नं. १

नो. नं. २४

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**

र

---

## Oriental Govrnment security
## LIFE ASSURANCE COMPANY
## Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Brown, Manager,

HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Exceed $3\frac{3}{4}$ crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act to treating their clients with the utmost liberality.

UNQUESIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowmenpt policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No mān can be sure how long he will live, and although he may ave money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENT WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT, Nagpr

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिव आश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

*Registered No N. 4*

# व्हाडसमाचार.

**Berar Samachar.**

[ वर्षं ४५ आकोला—सोमवार तारीख १४ माहे आगष्ट सन १९११ इ० अंक ३२ ]

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील; यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बॅंकेत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी [illegible] महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं. १

---

## मुंबई बॅंकचें सोनें.

मुंबई बॅंकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बॅंकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बॅंकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बॅंक } G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१० } एजंट.
नो० न० २

---

## खरें सचोटीचें दुकान.

नासिक येथील अस्सल चांदीचीं भांडीं– आमचे दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.**
**आदितवारपेठ, नासिक.** नो. नं. ३३१

---

श्री राधावल्लभाजयाति

## वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान, तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल वी० प० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे हांय जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हैं, अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ०॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगो लीजीये.

मिलने का पत्ताः—
**गोस्वामी राधामोहन शर्म्मा**
**चित्तीखाना आगरा.**

---

* इकडे लक्ष द्या! *

## नाग, नरसे व पिठोरी

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या, पिठोरी, पाठोडा, गणपती बुध, बृहस्पती व तुळशीचें लग्न वगैरे चित्रांचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेंकडा १ रुपया. चित्रें हजार घेतल्यास दर शेंकडा ०१४ आणे प्रमाणें देऊं.

**बाळकृष्ण अनोवा दलाल,**
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार
अकोला.
( पत्रें विठ्ठलमंदीराच्या पत्त्यावर पाठवावीं. )

---

## यंदाचा पाऊस.

यंदा पावसानें लवकरच कंबर बांधल्यामुळें ओला चारा लवकर मिळूं लागेल यांत शंका नाहीं. तथापि तुमच्या गुरांना आतां पासूनच ओला चारा वालणें अपायकारक आहे. कारण पुढें कदाचित पावसानें ओढून धरल्यास हिरवा चाराही महिना होणार आणि हिरव्याची चट लागल्यामुळें वाळलेला कडबा गुरें खाणार नाहींत. वरें ओली वैरण पहिल्यापासूनच मुबलक मिळाली तरी ती एकदम गुरांना सुरू केली असतां ती त्यांना पचत नाहीं. याकरतां या वेळींच वाळलेला कडब्याचे अगदीं बारिक तुकडे करून त्यावर मिठाच्या पाण्याचा शिडकाव घाल तर तुमचीं गुरें फार गोडीनें वैरण खातील. या कामासाठीं आमचें सुधारलेलें **कडबा कापण्याचें यंत्र** वापरा. कारण आमचें यंत्र शेतकऱ्यांनीं, गवळ्यांनीं व पागा आफिसरांनीं ही पसंत केलें आहे. किंमती बद्दल विचाराल तर फक्त १० रु. ९ आणे पडतात.

**किर्लोस्कर बंधु.**
**पोष्ट किर्लोस्करवाडी, औंध**
नो. नं २९० ( औंध संस्थान. जि. सातारा

---

### नोटीस

रा० नारायणराव गणपतराव देशमुख रा० मोर्तिजापुर यासः–

खालीं सही करणार याजकडुन नोटीस देण्यांत येते कीं देशमुख बांधव आणि बंधुजन दुकान मूर्तिजापूर या दुकानांत. ज्याचे शेर असतील त्यांचे पैसे तुह्मी ता० १०-१०-०९ रोजीं सर्व हिस्सेदार यांचे रुपये परत देण्याचें कबूल करून दुकानची मालकी तुह्मी आपले कडे करून घेतली आहे. त्याप्रमाणें मजला आपले दुकानांतील हिस्सेदार गोविंद विठ्ठल देशमुख कामरगांवकर हे मयत याची वारस बायको भीमाबाई जवजे गोविंदराव हिर्णे २१० रुपयांचा आपला शेर ता० ३१-१०-०८-ला मजला विकला आहे. ते रुपये तुह्मास मागीतले असतां देतों ह्मणता परंतु दिले नाहींत. करिता नोटीस पावले पासून १९ दिवसांचे आंत रुपये देऊन माझी पावती घ्यावी तसें न केल्यास रीतीप्रमाणें खर्चा सुद्धां रुपये घेतले जातील. कळावें ता० २-८-११.

सही
बाजीराव आकाजी देशमुख कामरगांवकर द० खु०
नो. नं. ३३४

---

### जाहिर नोटीस

सर्वत्र शेटसावकार व इतर लोकांस कळविण्यांत येतें कीं पळसो बुजरुख ता० व जि० आकोला येथील मी राहणारा असून माझी स्वसंपादित खालीं लिहिलेली इस्टेट मौजे पळसो बु० २, मौजे रामगांव २, व मौजे मजरे महमदपूर २ ता० व जि० आकोला अशीं शेतें ६ व हीं माझे नांवें आहेत. मौजे पळसो बुजरुख येथील घरें २ व कोठे ३. १ घर १ कवेलुचें नाटा ४ आढे ३ ओसरीसह दर्शनी भाग पूर्व व पश्चिम, घराचा वापर उत्तरेस; याचे लगत उत्तरेस धाब्याचा खांब ८ चा दिवाणखाना व वर टीनची माडी नाटा ४ आढे ३ घराचे पश्चिमेस कोठा १ नाटा ११ व त्यावर कवेलू.

२ घर १ नाटा ४ आढे ३ कवेलुचें समोर ओसरी टीनची दर्शनी भाग पूर्वेस.

३ कोठा टीनचा गायवाडा नाटा ६ आढे ० दर्शनी भाग पश्चिमेस.

१ मौजे माहादालपूर येथील गायवाडा कवेलुचा, नाटा ९ आढे ७ चा. शिवाय धाबली तीन नाटांची खांब ६ दर्शनी भाग पूर्वेस.

मौजे महादालपूर येथील पेव ज्वारी दोन शरी पायलीची खंड्या १०. ४३ बैल १०. हाशी २ वगार १ गाई, कालवडी व गोरे वगैरे ३० एकूण लहान मोठीं जनावरें ४३.

येणें प्रमाणें स्थावरजंगम इस्टेट असून ती माझे ताब्यांत आहे. सदर्हू स्थावरजंगम इस्टेटी पैकीं कोणतीहि इस्टेट माझा पुतण्या नारायण यांजकडून कोणी गहाण, खरेदी किंवा पट्ट्यानें घेऊं नये. व त्याच्याशीं माझे नांवें अगर माझे इस्टेटीसंबंधानें कोणी व्यवहार करूं नये. केल्यास तो रद्द समजला जाईल व कोणत्याच प्रकारें मी त्याचा जबाबदार राहणार नाहीं. कळावें ता० ८-८-११ इ.

लक्ष्मण पांडुरंग भट द० खु०
नो. नं. ३३५

---

### नोटीस

नारायण बिन रामभट रा० पळसो बु० यांसः—

मी लक्ष्मण पांडुरंग नोटीस देतों कीं तुमचे आईबाप वारल्यापासून मींच आजपावेतों तुह्मी अज्ञान असल्यामुळें पालन केलें. हल्लीं तुह्मी सज्ञान झाले असून दुःसंगतीनें माझे इस्टेटीची अफरातफर होण्याचा संभव दिसल्यावरून तुह्मास कळवितों कीं तुह्मी आमचे इस्टेटीसंबंधानें व माझ्या नांवावर कोणत्याच प्रकारें कोणाशीं गहाण, खरेदी, पट्टा, भाड्यानें वगैरे व्यवहार करूं नये. केल्यास त्याबद्दल तुह्मी स्वतःच फक्त जबाबदार राहाल कळावें. ता० ८-८-११ इ.

सही
लक्ष्मण पांडुरंग द० खु०
नो. नं. ३३६

सुधासिंधु सुधासिंधु

सुख संचारक कंपनी मथुरा यांची तयार
केलेलीं व सरकारांतून रजिस्टर
झालेलीं औषधें, जीं वीस
वर्षांपासून लोकांत
अनुभविलीं
आहेत.

**सुधासिंधु**

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहर्णी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळ जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादींवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ०८ आणे.

**दद्रुगज केसरी**

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ०४ आणे १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलीं जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मामालक,
न. १९९  सुख संचारक कंपनी, मथुरा.

सुधासिंधु सुधासिंधु


## विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार— खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ०६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग.

## जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचे फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ०= जन्मकाल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता— भा० गो० पंडित,
र.- व पो० लेणखेड  प. खानदेश.

## *Notice*

under section 150 (I) of the Berar M. Law. 1886.

It is hereby published for general informat on that the Municipal Committee of Akola have at their Special Meetings held on 7 th June I911 and on 25-5-1910, proposed the following draft rules and byelaws under section 116 (I) (e) (j) and (2) of the B. M. Law 1886, for the levy of Bazar—cess etc. and for the inspect on and regulation of slaughter houses and meat r spectively within the limits of the Akola Municipality. Persons int-rested should send in their objections or suggestions if any, to the rules, within one month from the date of publication of the notice to the undersigned. After the expiry of the above period, the said draft rules will be finally considered and submitted to the higher Authorities for sanction.

Akola. } R. V. Mahajani
15-7-1911 } Vice Chairman.
M. C. Akola

The following rules will apply to contractors provided that all sums due from such contractors whether as instalment or by way of fine or otherwise shall be realizable as if they were arrears of land revenue due from such contractors.

1. No contractor shall be allowed to recover bazar cess from:—

(a) Traders to whom stalls have been let or are sublet by them.

(b) Persons bringing in head loads of any kind of commodity for sale as per remark column of the schedule.

(c) Persons having private shops or graineries or other such places of trade business on the skirts of the bazar premises.

(d) Persons who have bought the right to erect shops in bazar premises.

2. No contractor shall be allowed to snb sell any bazar.

3. Every contractor shall keep, with the Municipality, deposit to th extent of onefourth of the sanctioned sale mo ey without any inter st on the lst. of April viz the lst. day of the ye r of lease, failing which the bazar shall be resold and the deficit if any, shall be recovered from him.

4. Every controctor shall have to furni h a solvent surety in addition to the deposit money.

5 Every contractor shall pay in ful on the lst. of every month an instalment equal to one twelth of the sancti ned salemoney failure to pay which shal entail forfeiture of future contract and the resale of the bazar for the remaining instalments shall be. eff cted, and deficit if any, shall be recoverable from the first contractor 20 days of grace are allowed under this section.

6. A notice of 10 days for resale shall be given to the contractor in case of such defaults.

7. Part payment of instalments or of deposits shall be deemed a default.

8. The deposit money shall be r mitted to the contractor in form of short recovery by that amount towards the close of the year.

9. Interest at one per cent per mouth shall be charged on overdue instalments and shall be recovered with the amounts of such instalments when paid by the contractors.

10. The contractor shall have no claims to the excess money, if any, recovered by resale of contracts.

11. No contractor shall quarrel with or detain a trader or hold back any of his commodities brought for sale as an earnest money for bazar dues, nor shall he receive an article in stead or file a civil suit aga sn him.

12. Help of the Municipal Secretary shall be sought by the contractOr and the Secretary of the Municipality shall recover and pay the dues to the contractor or shall take such steps as are allowed by the rules.

13. The change in bazar day shall rest with the Deputy Commissioner on representation by the Municipal Committee. who shall not be held responsible for any loss caused to the contractor owing to such change or cessation of bazar caused by epidemics & prevailing in the surroundings or in the bazar town itself.

14. Failure to fulfil the terms of the bazar contract by the contractor or his agents or servants shall not only make him liable to the cancellation of his license but also to prosecution or punishment prescribed under these rules.

P. S. Agnihotri
Chairman
Mpl Committee, Akola.

TRUE COPY.
P. D. Sontake.
Secretary,
Municipal Committee,
Akola.


अशी संधी पुन्हां येणार नाहीं.



सहा घड्याळें घेणारांस एक घड्याळ बक्षीस.
पोष्टखर्च माफ  दर एकाची किंमत ३।

**जटलमन इमिटेशन रास्कोप सिस्टिम** नांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळासोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ताः—खोजा वल्लीभाई इस्माल
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ४

चिरकालचा खरा लाभ कोणता ?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो !
महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

वार्षिक वर्गणी ट.ख.स रु.१॥ **)कलाशिक्षण(** नमुन अंकास ०=आ

नांवाच्या विविध हुन्नर, शास्त्रीय ज्ञान, व्यापार शेतकी, व इतर शेंकडो विषयांची माहिती शिकविणाऱ्यास वर्गणीदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालू मार्च अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [ Hypnotism] ऊर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रा मोहन, आरोग्यहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु. २९ फीची तूर्त रु. ११ न शिकवूं. पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा. बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या. औषधी. मंत्रतंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं. सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो.

व्यवस्थापक—कलाशिक्षण, कार्यालय
नो. नं. ९  बडोदें.

**विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.**

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रम, शैघ्यातिय, कामस्थान सोलासगारें, बत्तीसोआभूषण, वस्त्रअदिविभदान पुत्रस्त्रीकर्म, नपुंसकक्रिया, उपदंश प्रमेह आदे अनेक रोगोकी चिकित्सा औषधे, पशुभाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुद्धां विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा
नो० नं० ७७  अलीगड सिटी.

## थिऑसफीची परिषद

( मा० अं० पु० चा० )

सातवे वर्षापासून चवदावे वर्षापावेतों मुलास स्वयंपाक करणें, इतर घरगुती कामें, बगीच्यांतील कामें वगैरे माहिती करून द्यावी. तसेंच घरगुती नडीचें सुतार, लोहारकाम (जसें भिंतीस खिळे ठोकणें वगैरे दोरीस वगैरे गाठी मारणें, चांगलें व सुबक पॅकेट बांधणें, गाठोडें बांधणें, कपड्यांच्या घड्या करणें, धुणीं वाळत घालणें, शिवणें, विणणें, चित्रें काढणें, कातरणें, कापणें वगैरे कामें जेणेंकरून त्याचे हातास व बोटास चांगलें वळण लागेल अशीं कामें करण्यास सांगावें. दुसऱ्यास मदत करण्यांत व दुसऱ्याची निष्काम बुध्दीनें चाकरी करण्यांत आनंद आहे हें त्याचे निदर्शनास आणीत जावें. जर चवदा वर्षापावेतों कुटुंबांत अथवा अनेक कुटूंबें मिळून एकत्र शिक्षण देण्याची सोय असेल तर मुलास सार्वजनिक शाळेंत पाठविण्याची गरज नाहीं. घरगुती शिक्षणांत मुलगे व मुली एकत्र खेळूं शकतात व अशा तऱ्हेनें शिक्षण दिल्यानें त्यांचे मनावर कुटूंबप्रेमाचा परिणाम सारखा होत असतो. याच वयांत मुलास पोहणें, वल्हिवणें, सायकलवर बसणें, घोड्यावर बसणें, चेंडूदांडू, लगोऱ्या, आट्यापाट्या, खोखो, क्रिकेट, लॉंटेनिस वगैरे मुलाचे पारिस्थित्यनुरूप खेळ आले पाहिजेत. याचेच बरोबर लिहिणें, वाचणें, गणीत, इतिहास, व भुगोल शिकवावे. अकरा वर्षापुढें त्यास थोडथोडी भौतिक शास्त्रांचीही माहिती द्यावी व त्याजकडून लहानलहान शास्त्रीय प्रयोग करून घ्यावे; जेणेंकरून या सृष्टींतील कधीं न बदलणारे असे सृष्टनियम त्यास माहित होतील. चवदा वर्षापुढें त्यास काय करावयाचें याचा पक्का निश्चय झाला पाहिजे व तो निश्चय मुलाचे संमतीनें केला जावा. अशा रीतीनें पाहिलीं सात वर्षें मुलांची शरीरप्रकृति व स्वभावसुधारण्याकडे लावावीं व ज्यांचा परिणाम त्याचे सर्व भावी आयुष्यावर होणार आहे अशा उच्च धार्मिक व नीतितत्वांचें बीज त्याचे अंतःकरणांत रुजवावें. मुलांचें हें वय अत्यंत कोमल असतें व या वेळेस त्याचे मनावर जो परिणाम होतो तो कायमचा होतो. पुढें सात पासून चवदा पावेतों शरीरसुदृढ व बुध्दीविकासाकडे लावावें, तसेंच सुशिक्षित मनुष्यास अवश्य लागणाऱ्या सर्वसाधारण ज्ञानाचें प्राथमिक शिक्षण या वयांत द्यावें, ज्याचा उपयोग पुढील अभ्यासक्रमास होईल. चवदा वर्षा पुढें मुलानें विशिष्ट विषय होतीं घेतले पाहिजेत.

जर मुलांचे आईबाप व शिक्षक हे आपली पूर्ण जबाबदारी ओळखणारे असे असतील तर मुलाचे गुणांचा व बुद्धीचा विकास कसकसा होत गेला व त्याचें अभ्यासाकडे व खेळामध्यें लक्ष कितपत होतें हें त्यांनीं ध्यानांत आणलें असलेंच पाहिजे, तसेंच मुलास लहानपणीं निर्भयपणानें स्वतास काय पाहिजे वगैरे बोलण्याची संवय लावलीच असेल व त्याप्रमाणें मुलास पुढें कोणच्या धंद्यांत घालावें याचा निश्चय केलाच असला पाहिजे. मुलगा चवदा वर्षांचा झाला ह्मणजे त्याचे विचार स्वातंत्र्याविरुद्ध न जाता मोठ्या युक्तीनें त्याजबरोबर त्याचे पुढील आयुष्यक्रमाबद्दल तो पुढें ज्या धंद्यांत शिरणार त्या धंद्याचे नफानुकसानीबद्दल, अथवा बरेवाईटपणाबद्दल त्याचे विचारास मदत होईल अशा रीतीनें त्याजबरोबर भाषण करावें. मुलाचा कल व त्याची हुषारी चांगली लक्षांत आणून आईबाप मुलास आपलें मत देतील तर मुलें सहसा आईबापांचें मोडणार नाहींत. तीं त्याचे मर्जीनुरूप चालतील परंतु क्वचित हुशार व बुद्धिवान मुलें अशीं ही आढळून येतात कीं तीं इतक्या लहान वयांत ही आपणांस पुढें काय करावयाचें याबद्दल स्पष्ट मत देतात अशा स्थितींत वडील मनुष्याचें कर्तव्य हें आहे कीं त्यांनीं मुलाचे इष्ट साध्यास सर्व तऱ्हेनें उत्तेजन व मदत दिली पाहिजे. एक वेळ साध्य अथवा ध्येय निश्चित झालें म्हणजे मग मुलाचे शिक्षणक्रमाची ही दिशा निश्चित केली जावी. ध्येय निश्चित होण्याचे अगोदर जो काळ व श्रम व्यर्थ जात असेल तो एकदम बंद होऊन त्याचा व्यय एकदम शिक्षणाकडे सुव्यवस्थितपणानें होईल अशी तजवीज केली पाहिजे. मुलास विशिष्ट तऱ्हेचें घरगुती शिक्षण देण्याची अनुकूलता फार थोड्या लोकांस असते. कारितां त्यांनीं मुलास सार्वजनिक शाळेंत पाठविण्याचीच तजवीज केली पाहिजे.

---

वऱ्हाडसमाचार

श्रावण वद्य ... शके १८३३ दुंदुभिनाम संवत्सरे

## हिंदुस्थानचें बजेट.

हिंदुस्थानच्या बजेटावर पार्लमेंटमध्यें जी चर्चा यंदा झाली ती फारशी महत्त्वाची नव्हती. तथापि अंडर सेक्रेटरी मि० मॉंटेग्यु यांचें भाषण अनेक दृष्टींनीं विचार करण्यासारखें होतें. यंदाच्या बजेटांत दिल्ली दरबारचा खर्च हें सदर विशेष होतें, आणि खुद्द बादशहांची इच्छा या संबंधांत अन्य रीतीनें व्यक्त झाली असल्यामुळें यंदाचा दरबारचा खर्च उधळपट्टीचा होणार नाहीं अशी खात्री होतीच; पण कंजुषपणानें होईल कीं काय अशी भीती होती, पण मि० मॉंटेग्यु यांनीं दोन्ही टोकें सोडून मध्यम मार्ग स्वीकारला आहे आणि त्यामुळें त्यांचें बजेट लोकप्रिय झालें आहे. त्याचप्रमाणें शिक्षण व आरोग्य या विषयांवर ज्यास्त खर्च करण्याचा हेतु ही त्यांनीं बोलून दाखविला आहे. खर्चांत काटकसर करतांना लष्करी खर्चाला कातर न लावण्याची आजपर्यंतची रूढी लवकरच बदलेल अशीं सुचिन्हें दिसत आहेत. लॉर्ड मोर्ले यांनीं ज्यास्त उदार तत्वावर घालून दिलेल्या राज्यपद्धतीवर कित्येक आंग्लोइंडियन लेखक जे आक्षेप घेतात त्यांस मि० मॉंटेग्यु यांनीं उत्कृष्ट जबाब दिला आहे. राज्यकारभारांतील धोरणांत होणारा बदल हा एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या लहरीनें होत नसतो तर परिस्थितीमुळें त्याची अवश्यकताच उत्पन्न झालेली असते व ह्मणून योग्य वेळीं तो करणें यांतच मुत्सद्दीपणा आहे. मि० मॉंटेग्यु यांचें वक्तृत्व मर्यादित टीकाकारांनीं लक्षांत घेण्याजोगें आहे. तसेंच जे कोणी राजकीय चळवळ हल्लीं रोगाच्या प्रवृत्तीचा आत्मा-तेंच जन्माचें ध्येय समजत असतील त्यांना मि० मॉंटेग्यु ह्मणतात कीं 'बाबांनो, तुम्ही चुकत आहां. राजकीय सुधारणा हें सुधारणेचें एक अंग आहे. पण तेंच कांहीं सर्वस्व नाहीं. औद्योगिक सुधारणा, व समाजसुधारणा याही करावयास पाहिजेत आहेत', मि० मॉंटेग्यु यांचें भाषण अगदीं व्यापक होतें. हिंदुस्थानांतल्या कोणत्याही दखलपात्र चळवळीचा उल्लेख, व निरनिराळ्या संस्थानें कशा प्रकारचें धोरण लोकांनीं व सरकारनें ठेवणें पाहिजे आहे यांविषयींचें स्पष्ट दिग्दर्शन त्यांचे भाषणांत आहे. ब्रिटिश गव्हर्नमेंटचा दरारा असावयास पाहिजे असें आंग्लोइंडियनांचें नेहमीं ओरडणें असतें. या दराऱ्यावर मि० मॉंटेग्यु मोठीशी भिस्त ठेवीत नाहींत ही संतोषाची गोष्ट आहे. कारण राज्यकारभारांत लोकांचें मन निष्कारण दुखविण्याचे प्रसंग सरकारास पडत असतील तर ते या दराऱ्याविषयींच्या चुकीच्या समजुतीमुळें होत असतात असें आमचें समजूत आहे. हिंदुस्थानच्या गरीब रयतेवर दरारा तो आणखी काय बसवावयाचा आहे? लोकांना आज दराऱ्याची जरूर नाहीं, प्रेमाची व सहानुभूतीची आहे. मि० मॉंटेग्यु यांचे या बाबतींतले विचार फार शहाणपणाचे आहेत.

एकंदरींत मि० मॉंटेग्यु हे फार उदार विचाराचे, धोरणी व कळकळीचे आफिसर आहेत असा जो त्यांचे विषयींचा लौकिक आहे त्याला शोभेलसेंच त्यांचें बजेट संबंधाचें भाषण होतें यांत संशय नाहीं.

---

## हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें वास्तविक कारण.

ब्रिटिश अमलाखालीं हिंदुस्थानदेश दरिद्री होत चालला आहे कीं श्रीमंत होत आहे या प्रश्नाचा ऊहापोह आतां पर्यंत इतका झाला आहे कीं एखादी अलौकिक बुद्धिमत्ता किंवा आंकडेशास्त्रांतील विलक्षण निपुणता अंगीं असल्याशिवाय या विषयावर नवीन असें कांहीं आतां कोणाला सांगतां येईल असें वाटत नाहीं. इतकी चर्चा झाली असतां ही सदर प्रश्नाच्या अखेरच्या निर्णयापाशीं आपण जाऊन पोंचलों आहों अशी उभयपक्षांच्या मनाची खात्री नाहीं ती नाहींच. हिंदुस्थानचें दारिद्र्य हा विषय जितका जुना आहे तितकाच व्यापकही आहे. तेव्हां या विषयाची चर्चा सर्व बाजूंनीं केल्याशिवाय समाधानकारक निकाल लागणें शक्य ही नाहीं अद्यापर्यंत झालेली चर्चा केवळ राजकीय बाजूनें झाली. सरकारी रिपोर्टावरून देशांतल्या दरमाणशीं दरसाल किती रुपये उत्पन्न हिंदुस्थानांत पडतें व तें इतर देशांतल्या लोकांच्या उत्पन्नाचे मानानें कमी किंवा ज्यास्त आहे; अथवा याच देशांत पन्नाससाठ वर्षांपूर्वीं सरकारी दरमाणशीं उत्पन्न किती होतें व आतां किती आहे या एका गोष्टीवरच बहुधा आतापर्यंत बहुतेक चर्चा झाली आहे. पण या प्रश्नाला सामाजिक बाजूही आहे ही गोष्ट या प्रश्नाचा विचार करणारांनीं अद्यापर्यंत लक्षांत घेतलेली दिसत नाहीं ही आश्चर्याची गोष्ट आहे. आमचा देश श्रीमंत झाला आहे कीं दरिद्री झाला आहे हें उत्पन्नाच्या बाजूनें जितकें दिसण्यासारखें आहे तितकेंच खर्चाच्या बाजूवरून ही दिसेल. जितकें राजकीय दृष्ट्या विचार करून कळेल तितकेंच सामाजिक दृष्टीनें विचार केल्यावरूनही कळून येईल. या दृष्टीनें या प्रश्नाचा विचार कोणी फारसा केलेला दिसत नाहीं. गेल्या पंचवीसतीस वर्षांत आमच्या लोकांच्या राहणींत किती फरक पडला आहे. पूर्वींच्या साधेपणाच्या राहणींत केवढें परिवर्तन घडलें आहे! आमचीं घरें, घरांतलें सामानसुमान, पोशाख, खाण्यापिण्याचे जिन्नस, आमच्या संवयी व व्यसनें, आमचे करमणुकीचे प्रकार, इत्यादि हरएक गोष्टींत समाजाचें जें स्थित्यंतर झालें आहे त्याचा आमच्या सांपत्तिक स्थितीवर कांहींच परिणाम घडला नाहीं काय? पूर्वींचे आमचे टोलेजंग वाडे गेले, आणि त्यांच्या जागीं नुसतें चाळीसारखें हादरणारीं तकलादी घरें आलीं, पूर्वीं आमच्या घरांत एखाददुसरें जाजम, व सतरंजी किंवा फार झालें तर लहानसा गालिचा आणि एखाददुसरी हंडी याहून दिवाणखान्याला अन्य शृंगार माहित नव्हता. त्या जागीं आतां निरनिराळ्या प्रकारच्या खुर्च्या, टेबलें मोठाले आरसे, नक्षीच्या वस्तु, तसबिरी, फोटोग्राफ, मण्यांचे पडदे, शोभेचीं कांचसामान वगैरे वस्तु अवश्य झाल्या आहेत. पोशाखांतही काय परिवर्तन झालें आहे असें नाहीं. पूर्वीं हातमागावर धोतरें निघत तीं ज्यास्त टिकाऊ असत. वर्षाचे कामीं एक धोतरजोडा, दोन बारबंड्या, दोन अंगरखे, व तीनचार वर्षांनीं एक पागोटें येवढे जिन्नस घेतले ह्मणजे साधारणतः मध्यम स्थितींतल्या माणसाचा पोशाख होत असे. या सर्वांना मिळून बारा रुपयांपेक्षां अधिक किंमत केव्हांही पडत नसे. आतां त्याच स्थितींतल्या माणसाचा पोशाख पहा. वर्षाचे कमींतकमी चार शर्ट, दोन जाकिटें, तीन धोतरजोडे, एक उपरणें जोडी, चार कोट, एक गरम कोट, एक डझन हात रुमाल, अर्धा डझन पायमोजे, एखादुसरी विजार, एक रुमाल व एक पगडी अथवा दोन रुमाल, शिवाय एक टोपी, शर्ट चांदीचे बटन, खिशांतलें घड्याळ, इ० जिनसा अवश्य होऊन बसल्या आहेत. अगदीं साध्या राहणीचा हा मध्याचा पोषाख आहे, आणि कमींतकमी पन्नास रुपये लागतात! हिंदु बायका ह्मणजे कट्ट्या पुराण चालीरितीच्या अभिमानी, पण त्यांच्या सुद्धां पोषाखांत फरक पडत चालला आहे. पण सुदैवानें तो अद्याप पोलकीं आणि वेण्या, सोन्याचीं गुलाबाचीं फुलें किंवा मार्कस कंपनीच्या इअर रिंग यांच्या पलीकडे गेला नाहीं. खाण्यापिण्याच्या जिनसांत बिस्किटें, पेपरमिंटच्या वड्या, सोडावॉटर वगैरे पेयें, बर्फ, सरबतें, वगैरे नवीं शिरलीं आहेत. मद्यपान करणारे सगळेच नसतात ह्मणून त्याचा उल्लेख करीत नाहीं, पण सिगारेट व विड्या, यांनीं एकीचें ही सेवन न करणें हें

सभ्यतेचें लक्षण नव्हे असें मानण्यापर्यंत पाळी गेली आहे. चहापानाची बंदर ( त्याला व्यसन कोणीं ह्मणावें ? तसें ह्मणणारास बहिष्कार घातला जाईल ही जबरदस्त भीति आहे! ) तर खेड्यापाड्यांतून मुद्दां इतकी पसरली आहे कीं रोज चार आणे मिळविणारा मजूर मुद्दां दिडकीचा चहा घेतल्यावांचून कामावर जात नाहीं. सोंवळ्या स्वयंपाकिणीमुद्दां चहाचा नैवेद्य शालिग्रामाला किंवा बाळकृष्णाला दाखवून मग प्रसाद ह्मणून त्याचें सेवन करतात. कारण तो घेतल्यावांचून घरांतलें काम सुचेनासें झालें आहे व सुचलें तरी तें करण्यास अंगांत तरतरी नसते. आमचे पूर्वींचे करमणुकीचे प्रकार ह्मणजे सोंगट्या, बुदबळें, दशावतारी गंजिफा, कथापुराणें, कुस्त्या, पतंग उडाविणें, गायन हे होते. हे सगळे बहुतेक बिनखर्चाचे होते आतां बेझिकचे डाव, ब्याडमिंटन, बिलियर्ड, संगीत नाटकें बायास्कोप, फोनोग्राफ वगैरें आहेत, आणि यापैकीं एकेक प्रकार असा आहे कीं त्या एकट्याच्या खर्चांत पूर्वींच्या सगळ्या करमणुकीचे प्रकार सहज करतां येतील. या सर्व तऱ्हेनें वाढत्या खर्चाकडे पाहिलें ह्मणजे आमचा देश दरिद्री होत चालला आहे असें कोणाला तरी ह्मणतां येईल काय ? किंवा ह्मटलें तर खरें वाटेल काय ? पण वस्तुस्थिति कशी आहे तें प्रत्येक जण अंतर्यामीं जाणत आहे. आह्मी श्रीमंत होत नाहीं उलट या सगळ्या प्रकारांच्या पायीं भिकेला लागत आहों हें प्रत्येकाला दिसत आहे पूर्वींचे चौसोपी वाडे जाऊन पक्ष्यांच्या घरट्यासारख्या घरट्यांत राहावें लागून भाडें मात्र शक्तीच्या बाहेर द्यावें लागत आहे; घरांत अनवश्यक सामान भरण्याची हाव लागल्यामुळें दिवाणखान ह्मणजे दुकान दिसूं लागलें आहे, मात्र परगांवीं बदली झाली कीं लिलावांत या सामानाची चतुर्थांश किंमत येत नाहीं; चहासारख्या संवयी शरीराचे हाल करीत आहेत, आणि डाक्तराचीं बिलें खिसे हलके करीत आहेत; बायकांना पूर्वींच्यासारखे डागदागिने अंगावर घालण्यास मिळत नाहींत, आणि मुलीबरोबर हजारांनीं मोजण्यासारखा हुंडा दिल्याशिवाय तिला सुस्थळ मिळत नाहीं हीं सारीं लक्षणें कशाचीं आहेत ? वाढत्या श्रीमंतीचीं कीं वाढत्या दारिद्र्याचीं ? आमच्या मतें हीं दारिद्र्याचीं लक्षणें आहेत. मात्र या दारिद्र्यांबद्दल सरकारास दोष देण्यास आह्मी बिलकुल तयार नाहीं. आह्मी पाश्चात्यांचें अनुकरण करण्याची दुष्ट हाव धरली तिचा हा परिणाम आहे. हा आमचा दोष आहे, सरकारचा नाहीं. हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें हें वास्तविक कारण लपवून सरकारचे कर, किंवा परदेशी व्यापार, वगैरे भलभलतीं कारणें पुढें करण्यांत अर्थ नाहीं. आह्मी आत्मपरीक्षण करीत नाहीं ह्मणून ही भूल होत आहे.

## कौंसिलरांचे दोन वर्ग.

मुंबईचे गव्हर्नर ना० सर जॉर्ज क्लार्क यांच्याशीं जितका जितका ज्यास्त परिचय होत जातो तितकी तितकी त्यांच्या विषयींची सद्बुद्धि वाढत जाते व इतर आंग्लो इंडियन अधिकाऱ्यांहून यांचा स्वभाव कांहीं निराळ्या प्रकारचा आहे असें वाटूं लागतें. गेल्या पंधरवड्यात झालेल्या पुण्याच्या कौंसिलाचे बैठकीचे वेळीं कौंसिलांतले सरकारी मेंबर व सरकारविरुद्ध असलेले मेंबर असा जो भेद कित्येक लोक करतात त्या संबंधानें ना० गव्हर्नरसाहेबांनीं आपली पूर्ण नापसंती प्रदर्शित केली. सरकारविरुद्ध वस्तुतः कोणीच नाहीं—निदान असा मनुष्य कौन्सिलांत मेंबर ह्मणून लोकांनीं निवडून दिला नाहीं व सरकारनेंही नेमिला नाहीं. सरकारविरुद्ध जाणाराचा सन्मान सरकार निराळ्या रीतीनें करीत असतें ही गोष्ट आतां हिंदुस्थानांतलें एखादें शेंबडें मूल देखील जाणतें. मग 'सरकारविरुद्ध मेंबर' ह्मणजे काय ? इंग्रजींत ज्याला अपोझिशन ह्मणतात असा पक्ष पार्लमेंटांत आहे आणि तो वाजवी आहे. आमच्याइकडे अपोझिशनपक्षच नाहीं. कारण सरकारतर्फें पुढें आलेल्या बिलावर मतें घेतलीं तर सरकारच्या बाजूनें बहुमत नेहमीं राहील अशी तजवीज अगोदर कायद्यानेंच करून ठेविली आहे. बरें, यदाकदाचित् त्यांचें बहुमत न झालें तरी सरकारला वाटल्यास तो कायदा वरिष्ठ सरकार मंजूर करील, नाहीं तर नाहीं ही सोडवणूक आहेच. शिवाय सरकारी अधिकाऱ्यांना आपल्या हातचा अधिकार जाण्याची ही भीती नाहीं. ते आपापल्या जागीं ध्रुवासारखे अढळ आहेत. अशा स्थितींत सरकारी अधिकाऱ्यांच्या मताविरुद्ध मत देणारांना 'सरकारविरुद्ध' समजण्याचें वस्तुतः कांहीं कारण नाहीं. ना. गव्हर्नरसाहेबांची कांहीं तरी गैरसमजूत झाली असावी असें वाटतें. तरी पण कौन्सिलांत ज्यानें त्यानें आपल्या विवेकास धरून मत द्यावें, पक्ष करूं नये, हें त्यांचें सांगणें कोणासही पटण्यासारखें आहे. सरकारनें नेमिलेल्या कौंसिलरांना सरकारतर्फेचे मेंबर समजणें हें ही तात्विक दृष्ट्या चुकीचें आहे हें सांगावयास नकोच. तात्विक दृष्ट्या ह्मणण्याचें कारण कौंसिलाच्या कामाची एकंदर फाईल जर कोणी चाळून पाहील तर त्यांनीं दिलेल्या मतावरून पाहतां सरकारतर्फेचे व इतर ( सरकारविरुद्ध नव्हे ) मेंबर असें जें वर्गीकरण कित्येक करीत असतात त्याला कांहीं आधार आहे असें आढळून येईल.

--+*+--

## काउंट टॉलस्टॉयचा अखेरचा निरोप.

परलोकगत महात्मा कौंट टॉलस्टॉय यांनीं लिहून ठेविलेला एक ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे. यांत जीवन आणि मृत्यु यांच्या रहस्याचा शोध करण्याचा लेखकानें यत्न केला आहे. 'कस्त्वं, कुत आयातः,' इ० प्रश्नांचीं उत्तरें श्रीशंकराचार्यांनीं जशीं दिलीं आहेत तशींच कौंटसाहेबांनीं ही दिलीं आहेत. ज्या परमेश्वराच्या इच्छाशक्तीनें आपणांस या सृष्टींत आणून घातलें त्याच्या इच्छेप्रमाणें वागणें हें आपलें कर्तव्य आहे. स्वतःच्या इच्छे प्रमाणें वागणें हें नव्हे आणि परमेश्वराची इच्छा 'परोपकार' या एका शब्दांत उत्तम प्रकारें व्यक्त होते. वेदांची शिकवणी हीच आहे; बुद्धानें हेंच सांगितलें; तुकाराम, नामदेव, ज्ञानेश्वर इ० साधुसंत हेंच सांगत आहे, आणि आतां कौंट टॉलस्टॉय सारखे आधुनिक ऋषि हेंच शिकवीत आहेत. जीवन कष्टप्रद आहे असें पुष्कळ लोक ह्मणतात. पण कोणाला? ईश्वराच्या इच्छेविरुद्ध जाणाराला. पण त्याच्या इच्छेप्रमाणें वागणाराला तर त्याच्या इतकें आनंदपर्यवसायी असें दुसरें कांहींच नाहीं असा पूर्ण आशावाद कौंटसाहेबांचा होता. 'जीवन हें आनंदमय आहे, मरतांनासुद्धां आनंद आहे, आणि मरणोत्तर सुद्धा अशा माणसाला आनंद हेंच बक्षीस ईश्वर देत असतो, हा कौंटसाहेबांचा अखेरचा निरोप सर्वांनीं लक्षात ठेवावा.

## नवीन शिक्षणपद्धति.

मुलांना शिकविण्याची सुलभ व उत्कृष्ट पद्धति शोधून काढण्यासाठीं पाश्चात्यांचे जे प्रयत्न चालले आहेत ते पाहिले ह्मणजे मन थक्क होतें. बालोद्यानशिक्षणपद्धति इंग्लंडात आज कित्येक वर्षें प्रचलित आहे. तिच्यापासून शिक्षणाला निःसंशय फायदा होतो; तथापि अपेक्षेइतका तो कमी आहे असें अनुभवाला आलें आहे. त्यानंतर उघड्या हवेंतल्या शाळा, आणि स्वतःच्या प्रयत्नानें शिक्षण मिळविण्याची अर्थात् स्वावलंबनपद्धति यांनीं कांहीं दिवस पाश्चात्यांना वेड लाविलें. आतां नाटकाच्या द्वारें सर्व विषय शिकविण्याची पद्धति एका बाईनें काढली आहे. गणित, इतिहास, भूगोल, व्याकरण कोणताही विषय शिकविणें झालें तरी वर्गांतल्या मुलाकडून त्या त्या विषयाच्या परिभाषेचे पार्ट करविल्यानें मुलांचें मन त्या विषयांत पूर्णपणें रमतें व प्रत्यक्ष पाहिलेल्या किंवा स्वतः केलेल्या गोष्टी निवळ ऐकलेल्या किंवा वाचलेल्या गोष्टीपेक्षां ध्यानांत राहण्यास ही सुलभ जातात असें मिस जॉनसन बाईचें ह्मणणें आहे. या पद्धतीनें तिनें स्वतः एक शाळाही चालविली आहे. आमच्या इकडे शिक्षक विद्याखात्याच्या नियमांनीं इतके जखडले गेले आहेत कीं त्यांना ठराविक पद्धतीपासून रेसभरसुद्धां ढळतां येत नाहीं. अशा स्थितींत परदेशीं होत असलेले शिक्षणविषयक शोधांची माहिती वाचूनच आह्मी डोलत राहावें किंवा फार झालें तर मनातल्या मनांत तळमळावें यापेक्षां ज्यास्त कांहीं करतां येऊं नये ही केवढी शोचनीय गोष्ट आहे!

## समर्थसांप्रदायाचें लक्षण.

वि० वि० अलिकडे राजकीय गोष्टींत मनमोकळ संचार करतां येत नसल्यामुळें बरेच लेखकांचें मन सामाजिक, औद्योगिक व विशेषेंकरून धार्मिक गोष्टींकडे वळलें आहे. व अशा लेखांस वर्तमानपत्रांत ही मोठ्या आनंदानें जागा दिली जाते. दुसऱ्याची निंदा करीत असतां आपला कोणचा नाजूक भाग उघडा पडत आहे, आणि आपण आपलें, आपल्या समाजाचें, व देशाचें किती नुकसान करित आहों हें त्यांचे लक्षांत येत नाहीं. आपल्या सर्व सुखास तिलांजुळी देऊन जे अहोरात्र परोपकारार्थ आपणांस झिजवीत आहेत त्यांचा गौरव करण्याचे ऐवजीं कृतघ्नपणानें त्यांजवर नसते आरोप करणें किती वेडेपणाचें आहे; जगांत कोणी कांहीं करीतच नाहीं! असो, आज हे विचार सुचण्याचें कारण अलीकडे थिऑसोफिकल सोसायटीवर, तसेंच इतर मठवांप्रदायिकांवर जो भडिमार होत आहे हें होय. अशा तऱ्हेच्या भडिमारांत सांपडलेली व जिच्यावर बरेच क्षणिक वैराग्यानें प्रेरित असे मुमुक्षु तोंडसुख घेत आहेत अशी वर्धा येथील एक संस्था 'हनुमानगडावरील श्रीरामदाससंप्रदाय सूर्यदेवमठ' ही होय. या संस्थेचे विद्वान व होतकरू पदवीधर जे आपणास दासानुदास ह्मणवून घेण्यांत भूषण मानतात ते थोड्या दिवसांपूर्वी आकोलें येथें आले होते. नवीन उपस्थित वादास तोंड देणें ह्मणजे व्यर्थ कालाचा व बुद्धीचा व्यय होय, असे ते समजतात. व तदनुरूप त्यांचें वर्तन आहे. जाणण्यास जाणें काय करावयाचें ? "मेरे मुरगीकी × + +" जे ह्मणतील ते खुशाल ह्मणोत. शेजारणीनें कोंबडी दडविल्यानें उजेडावयाचें राहत नाहीं. त्याप्रमाणें राष्ट्रविचाराची प्रगति यदृच्छेनुरूप झालीच पाहिजे. त्या प्रगतीस आड येणारे लोक आमचे शत्रू नसून ते आमचे मित्रच आहेत, असें ते समजतात. कांहीं मंडळीचे आग्रहावरून त्यांजवर होणाऱ्या आरोपाबद्दल एका खासगी बैठकींत त्यांनीं आपले विचार प्रकट केले. त्याचें तात्पर्य त्यांचे सांप्रदायी व मुमुक्षु जनांकरितां देत आहे—त्यांनीं सांगितलें: आह्मीं सर्व संतमंडळी सोडून रामदासी पंथाचेंच अवलंबन काय सबबीवर केलें ? असा पुष्कळ लोकांचा प्रश्न आहे. त्यांस माझें मुख्य व सर्वांत महत्वाचें असें एकच उत्तर आहे कीं, माझा त्या सांप्रदायाशीं "ऋणानुबंध." याशिवाय जीं कारणें आहेत त्याबद्दल त्यांनीं खालीं लिहिले प्रमाणें सांगितलें.

श्रीरामदासस्वामी यांचें धोरण प्रगतीपर असून हल्लीं आपण सामाजिक सुधारणेंत ज्या विशिष्ट गोष्टीकडे लक्ष देत आहोंत त्यांचें बीजारोपण त्यांच वेळीं झालें होतें. श्रीरामदास यांनीं स्त्रियांच्या संबंधानें जें जें औदार्य दाखविलें आहे, तें औदार्य इतर संतमंडळीचे विवेचनांत दिसत नाहीं. इतरत्र जेथें जेथें स्त्रियांचे संबंधानें उल्लेख आले आहेत, तेथें तेथें कांहींसे अनुदारतेचे उल्लेख आले आहेत समर्थांनीं पुरुषाप्रमाणें स्त्रियांस मोठेपणा देऊन त्यास कित्येक ठिकाणीं मठाधिपति केलें होतें. स्त्रियांनीं आपणाकडे गुरुत्व घेऊन शिष्यशाखेचा विस्तार केल्याचीं ही अनेक उदाहरणें आहेत. त्यांच्या मुख्य स्त्रियाः—

सतीबाई, वेणाबाई, अंबिकाबाई, द्वारकाबाई, नवाबाई, मनाबाई, अक्काबाई, अन्नपूर्णाबाई, सखाबाई, गंगाबाई, गोदाबाई, अंबाबाई, कृष्णाबाई, वेणाबाई वगैरे. सर्वांच्या शिष्यवर्गानेंहि हाच पाठ ठेविला होता व त्याप्रमाणें त्यांनींही स्त्रियास उपदेश दिले आहेत. त्यांनीं स्त्रियाप्रमाणें शूद्र, अतिशूद्रासही उपदेश देऊन रामदासास याति, कूळ वगैरे आड येत नाहींत हें दाखविलें आहे. त्यांचे शिष्यांत इतिहास उत्तर

वर्णांचे ब्राह्मण, क्षत्रियादि ज्याप्रमाणें होतीं त्याचप्रमाणें क्वचित् महार वगैरे अतिशूद्रही होते. ब्राह्मणदेहच वेदश्रुतीस अधिकारी आहे ही भ्रामक कल्पना काढून टाकण्याकरितांच जणू कांहीं पंडिताचे सभेंत महाराकडून वेदमंत्र ह्मणविले होते. त्यांनीं हिंदूंचे कट्टेद्वेष्टे मुसलमानांसही उपदेश दिल्याचीं उदाहरणें आहेत. श्रीराम हा एका महाराष्ट्राचा नसून तो विश्वंभर आहे. त्याचें दास्य करण्याचा अधिकार सर्व जगावरील लोकांस आहे.

समर्थांनीं प्रपंच आणि परमार्थाचें सर्मीकरण जसें सोडविलें आहे तसें कोणीही सोडविलें नाहीं. प्रपंच आणि परमार्थ हीं दोन वेगवेगळीं आहेत, हा समज चुकीचा असून एक दुसऱ्याच्या तयारी करितां आहे असें जागजागीं आपले ग्रंथांत सांगितलें आहे. ते स्वतः ब्रह्मचारी राहण्याचें कारण त्यांचा प्रापंचिकाबद्दल तिटकारा नसून त्यास धर्मस्थापनेचें विशिष्ट कृत्य कर्तव्य होतें हें होय. त्यांनीं त्या वेळचे अत्यंत बिकट अशा स्थितींत पायीं परिभ्रमण करून मठस्थापना केली. ते विवाहीत असते तर त्यांचे हातून हें कृत्य झालें नसतें.

समर्थ प्रयत्नवादी होते, व हल्लींचे काळीं आमचे ठिकाणीं दिसत असलेली उदासीनता, आळस, कर्तव्यपराङ्मुखता घालविण्याकरितां त्यांचे उपदेशाप्रमाणें दुसरे कोणाची जालिम मात्रा नाहीं. श्रीरामचंद्रास वशिष्टांनीं उपदेश करीत असतां ज्या पुरुषप्रयत्नाबद्दल महति गाइली आहे तिचाच अनुवाद समर्थांचे उपदेशांत, ग्रंथांत व त्यांचे चरित्रांत दिसून येतो.

श्रीरामदासी श्रीधर बोवांचें ह्मणणें समर्थ सतराव्या शतकांत होऊन गेले. त्यावेळचे परिस्थित्यनुरूप त्यांनीं उपदेश केला. आपण विसाव्या शतकांत आहों. त्यांचे उपदेशाचें मुख्य धोरण लक्षांत ठेऊन आपलें आचरण पाहिजे. जगाचे प्रगतीकडे लक्ष दिलें पाहिजे. देश, कालवर्तमानरूप उपदेश ठेवणें हें सवमान्य तत्व आहे. सूक्ष्म विचारा अंतीं त्रिकालाबाधित तत्त्व काणाचीं आहेत व काल व देश भेदानें कोणत्या गोष्टींत बदल होत जातो हें सहज समजेल. सृष्टीच्या सुधारणे बरोबर ज्या गोष्टी घडून यावयाच्या त्या घडून येतीलच परंतु सृष्टीनियमास अनुसरून आपण आपलें धोरण ठेवल्यास तीच सुधारणा सुाक व सखकर होईल. असो अशा तऱ्हेनें त्यांनीं थोडक्यांत आपल विचार प्रगट केले.

ता० २३—७—११ प्रवासी

## सहकारी गोपालमंडळ

नागपुरास एक सहकारी पतपेढी तेथील पुढारी गोपालमंडळींनीं काढली आहे. ही पतपेढी नमुनेदार आहे आणि अशा संस्था इतरत्र स्थापित व्हाव्या या हेतूनें आह्मी हें नागपुराचें उदाहरण लोकांपुढें मांडीत आहों. सहकारी लर्य फार लवकर भरभराटीस येतात आणि या गोष्टीकडे सामान्य जनसमूहांतील निरनिराळ्या धंदेवाल्या जातींनीं अवश्य लक्ष्य पुरवावें. गवळी बंधुवर्ग आपापल्यों गांवीं एक एक पतपेढी काढण्याचा संकल्प करितील तर सरकार त्यांस मदत करून चांगला आश्रय देतील अशी आह्मांस उमेद आहे. गोपालमंडळ स्थापित झाल्या पासून लोकांचा हा मोठा फायदा होण्याचा संभव आहे. गवळी लोक एका जुटीनें व्यापार करण्यास शिकतील आणि लोकाश्रयाच्या धोरणानें ते चांगल्या प्रतीचें दूधदुभतें लोकांस विकण्यास सुरुवात करितील. गवळ्यांच्या गोरसविक्रया संबंधानें जो अप्रमाणिकपणा प्रचलित आहे तो सर्व आपोआप लयास जाईल. सहकारी पद्धीला नागरपेढी भांडवल पुरविण्याला पुढें आली पाहिजे. हा भांडवलाचा पुरवठा कमी व्याजानें मिळूं लागल्यामुळें हरएक गवळ्याला जें शेंकडा २४ रुपये व्याज पडतें तें या सहकारी तत्वानें पडणार नाहीं. चांगलीं जनावरें विकत घेण्याला पैसा मुबलक मिळूं लागेल. गोपाल–मंडळीचा कारभार नीट सुयंत्र चालूं लागेल तर भांडवलाच्या सवडीप्रमाणें विलायती धर्तीवर एखादा गोरसाचा कारखाना काढण्याला मार्गेपुढें सवलत होईल. नागपुरास असा कारखाना काढण्याचा उद्योग चालूं आहे आणि लवकरच तो अस्तित्वांत येईल. तसेंच जनावरासाठीं बंदी जंगल राखून ठेवण्यासाठीं एकवट प्रयत्न करण्याला देखील अशा पतपेढीनें चांगली सोय होते आणि अलिकडे चाऱ्यासंबंधानें पुष्कळदा औरड होते आणि जनावरें दुबळीं, सत्वहीन व दुखणाईत होतात तेव्हां असा प्रकार बंद करण्यासाठीं कांहीं शेतें मुद्दाम चारा उत्पन्न करण्याच्या हेतूनें स्वतंत्र ठेवण्याची गोष्ट गोपाल–मंडळाला मनावर घेतां येण्यासारखी आहे.

नागपुरास तर अशा पतपेढ्यांस भांडवल पुरवणारी एक ही नगरपेढी आहे ही मोठीच उणीव आहे. जबलपुरास ३ नगरपेढ्या आहेत आणि आकोल्यास १ नगरपेढी आहे. निदान आकोल्यास गोपाल–मंडळ स्थापण्यासारखी सुस्थिती आहे आणि आमच्या येथील रावबहादूर देवराव विनायक, आण्णासाहेब महाजनी, केशवराव दामले इत्यादि अग्रणी गृहस्थ पतपेढ्यांच्या संस्था लोकप्रिय करण्यासंबंधानें नेहमीं प्रयत्न करीत असतात तेव्हां त्यांनीं गोपाल–मंडळीला हातीं घेण्यास एक चांगलें सत्कार्य होऊन वऱ्हाडांत एक उत्तम अनुकरणीय संस्था निघेल असा आह्मांस भरंवसा आहे.

## लोकांचें आरोग्य व दवाखाने.

मध्यप्रांत आणि वऱ्हाड यांतल्या दवाखान्यांच्या त्रैवर्षिक रिपोर्टांत सरकारानें व लोकांनीं विचार करण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. पाहिली आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही आहे कीं दिवसेंदिवस सरकार दवाखान्यांची संख्या वाढवीत अहे व डाक्तर लोकांना बढती देत आहे, खाजगी धंदा करणाऱ्या डाक्तराच्या पाठ्यांची ही संख्या वाढती आहे तरी रोगांचे पाऊल मागें न पडतां उलटें पुढें पुढेंच पडत आहे! आमच्या मतें याला अनेक कारणें असलीं तरी मुख्य कारणें दोन आहेत. एक आमच्या बदललेल्या संवयी आणि दुसरें आमच्या लोकांतून जात चाललेलें औषाधिज्ञान. हल्लीं खेड्यापाड्यांतून मुद्दां वाढत चाललेलें चहापानाचें व्यसन, कचेऱ्या व शाळा यांच्या वेळा, व व्यायामाचा अभाव, स्त्रियांमध्यें कामें करण्याविषयीं दिसून येणारी अनिच्छा वगैरे गोष्टी पहिल्यांत मोडतात, आणि काथ्यामेथ्यांचीं औषधें व काढे वगैरेंची माहिती असणाऱ्या वृद्ध बाया व पुरुष यांचा सपाट्यानें होत असलेला अभाव हें दुसरें कारण. शिवाय आमच्या लोकांच्या प्रकृति, चाली व हवापाणी एक प्रकारचें आणि डॉक्टर लोकांची पद्धति व उपचार निराळ्या प्रकारचे! अशा स्थितींत रोग बलवत्तर कां होणार नाहींत? हीं कारणें दूर करण्याचे प्रयत्न सरकारानें व लोकांनीं ही केले पाहिजेत. खेड्यापाड्यांसाठीं फिरते डॉक्टर ठेवण्याचा प्रयोग करून पाहण्याची सरकारची इच्छा आहे. या फिरत्या डॉक्टरापेक्षां फिरते वैद्य खेड्यांतल्या लोकांना ज्यास्त पसंत होतील, आणि वैद्यांचीं औषधें हवीं त्या ठिकाणीं मिळण्यासारखीं असल्यामुळें त्याचा उपयोगही लोकांना अधिक होईल. अलीकडे सरकारान दवाखान्यांतून सुखवस्तु लोकाजवळून औषधाबद्दल पैसे घेण्याचा क्रम सुरु केला आहे. याला तिकिटसिस्टिम ह्मणतात. आज पन्नास वर्षें दवाखान्यांतून फुकट औषधें घेण्याची संवय झालेल्या लोकांना दवाखान्यांत औषधाबद्दल पैसे मागितले ह्मणजे प्रथम चमत्कारिक वाटणारच. त्याबद्दल लोकांना दोष देण्यांत अर्थ नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांविषयीं या एका गोष्टीवरून अनुदार ग्रह कोणी बनवून घेऊं नये अशी आमची विनंति आहे. 'दया धरमका मूल है' या साधूक्तीचा जप करणार लोक स्वतःच्या फायद्यासाठीं पदरचे पैसे खर्च न करतां धर्मार्थावरच सर्वदा अवलंबून राहतील असें मनांत आणूं नये. धर्मार्थ दवाखान्यांची स्थिति सुधारली ह्मणजे खाजगी धंदा करणाऱ्या डाक्तरांप्रमाणें सरकारी दवाखान्यांतही पैसे देऊन येणारांची झिमड लागेल

## हें काम कोणाचें आहे?

या दवाखान्यांच्या संबंधाच्या त्रैवार्षिक रिपोर्टावरील सरकारी ठरावांत एक लहानसे पण मोठें मुद्याचें वाक्य आहे. सगळ्या लोकांना औषधें पुरविण्याचें काम आमचें नाहीं असें सरकारी अधिकारी ह्मणत आहेत. थोड्यां दिवसांपूर्वीं शिक्षणासंबंधानेंही असेंच उद्गार दुसऱ्या एका इलाख्यांतल्या सरकारच्या तोंडून निघाले होते. आतां प्रश्न हा आहे कीं लोक अज्ञानांत मग्न आहेत. त्यांच्या अज्ञानामुळें त्यांचे हातून आरोग्य नीट राहत नाहीं, व त्यामुळें रोग उद्भवतात हें अज्ञान घालविल्याशिवाय रोगांचा प्रतिबंध व्हावयाचा नाहीं हें ठरलेलें आहे. मग आतां काय करावयाचें? लोकांचें अज्ञान कोणीं घालवावयाचें? अज्ञान प्रजेला शिक्षण देण्याची जबाबदारी आमच्यावर नाहीं असें ह्मणून धोतर झाडून मोकळें होणें सुशिक्षित सरकाराला शोभेल काय? आरोग्याच्या नियमांच्या अज्ञानामुळें लोक पटापट मरताहेत, अशा वेळीं त्यांना औषधपाणी करण्याचें किंवा वैद्यकीची सामान्य पद्धति करून देण्याचें काम आमचें नाहीं असें ह्मटल्यानें सरकार नैतिक जबाबदारींतून सुटेल काय? या प्रश्नाचा विचार आह्मांला वाटतें हल्लींहून निराळ्या रीतीनें व ज्यास्त खोल करावयास पाहिजे आहे. लोक अज्ञान आहेत व त्यांना आपलीं कर्तव्यें व जबाबदारी अद्याप कळूं लागली नाहीं तोंपर्यंत सगळीच जबाबदारी मायबाप सरकार वर आहे. ती पेनाच्या फटकाऱ्यासरशी झुगारून देतां येणार नाहीं. सरकारच्या औदार्याची किंमत अद्याप लोकांना कळू लागली नसेल; ते त्या औदार्याचा दुरुपयोग ही कदाचित करीत असतील, पण हा सगळा त्यांच्या अज्ञानाचा प्रभाव आहे, आणि ह्मणूनच त्यांना सहाय्य करण्याची जबाबदारी विशेष रीतीनें सरकारावर पडत आहे हें कृपा करून सरकारी अधिकारी ध्यानांत ठेवतील अशी आह्मी आशा करतों.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**– आकाश मधूनमधून अभ्राच्छादित असतें. पण किरकोळ सरींपुढें पावसाची गती नाहीं. एकंदर पर्जन्य १९॥ इंच झाला.

रा. रा. सदाशिव गणपत सुभेदार, जज्ज स्माल काज कोर्ट उमरावती हे पुनः आजारी झाल्यामुळें त्यांच्या जागीं भंडारा येथील सबजज्ज रा. रा. त्रिम्बक तात्याजी कोरके यांस नेमण्यांत आलें.

रा. रा. एफ. जी. स्लाय साहेब कमिशनर हे गेल्या ८ वे तारखेपासून आकोल्यास वार्षिक तपासणीच्या कामानिमित्त आले असून अधिकारी मंडळी व दरबारी मंडळी यांच्यामध्यें रोज गर्दी उडालेली असते.

रा रा. इव्हान्स एजुकेशनल इनस्पेक्टर वऱ्हाड यांचा मुक्काम या आठवड्यांत आकोल्यास होता. ते लवकरच पेनशन घेणार आहेत.

शाळाखात्याची 'टेक्स बुक कामिटी'ची पुनर्रचना झाली असून त्यामध्यें पुष्कळविद्यासंपन्न नवीन नवीन गृहस्थ घातले आहेत; आणि पुस्तकें मंजूर करण्याचे नियमहि निराळे केले आहेत.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं आकोल्याचे व्यापारी रा. रा. खटाव हेमराज भाटे यांत गेल्या मंगळवारीं देवाज्ञा झाली. अलिकडे त्यांची प्रकृति अधिकाधिक थकत चालली होती. हे गृहस्थ स्वभावानें चांगले असून व्यापारी मंडळींत त्यांस चांगला मानपान असे.

महमदी युनिव्हरसिटीसाठीं फंड गोळा करण्या करितां खान बहादूर एम. एम. मलक मीर जाफर हुसेन, शौकत अल्ली इत्यादि सद्गृहस्थ उमरावतीला जाहिरसभा भरविणार असून येथेंही येत्या गुरुवारीं सभा भरविण्याच्या विचारांत अहेत.

हिंदुस्थानचे मुख्य मौलवी जनाब फूलबारी साहेब हेहि वरील मंडळीबरोबर आहेत. यांच्या धर्मोपदेशाला अनुसरून आमची नागरिक मुसलमान मंडळी उदार मनानें आश्रय देतील असा आह्मांस भरंवसा आहे.

NOTICE.

The following extract from Government of India, Home Department, Resolution No. 2831-42, dated the 8th. December 1899, is published for general information.

E. A. deBrett,
Chief Secretary to the Chief Commissioner
Central Provinces.

NAGPUR:
The 9th August 1911

---

RESOLUTION.

The Secretary of State for India has brought to the notice of the Government of India that it not infrequently happens that natives of India, — — students or others, who have proceeded to England, desire to obtain passport to enable them to travel to foreign countries in which the possession of a passport is necessary or desirable, and that difficulty often arises from want of evidence to show that the applicant is a British subject and therefore - - entitled to a passport. Appeals for assistance are also frequently addressed to his Lordship by destitute Indians who desire to return to their country and by students who, owing to embarrassed circumstances, are unable to complete their course of education.

2. In order to enable the Secretary of State to deal with such cases satisfactorily, the Governor-General in Council has decided that it is necessary to press upon Indian students and others visiting England the desirability of providing themselves, before their departure from India, with an — — — authoritative certificate of identity, in the form appended to this Resolution, signed by the head of the district (in a Presidency Town, the — — — Commissioner of Police) in the case of residents of British India and by the Political Officer in that of residents of Native States. For a student the certificate should be signed by the head of his last school or college and countersigned by the District Officer (in a Presidency Town, the - - - - - - - Commissioner of Police) or Political Officer, as the case may be:-

FORM OF CERTIFICATE OF IDENTITY.

1. Name of applicant ——————
2. Father's name and caste ——————
3. Residence ——————
4. Age of applicant ——————
5. Nationality of applicant* ——————
6. Social and pecuniary status of father (or guardian) ——————
7. Date of probable departure of applicant from India ——————
8. Object of applicant's visit to England (Europe) ——————

Signature of District Officer (in a Presidency Town, the Commissioner of Police), or Political Officer, or head of school or college.

No N. 342

Date ——————

*i. e., whether a British subject by birth or by naturalization (or a subject of a Native state).

†Countersignature of the District or Political Officer should be obtained on — - - certificates signed by heads of schools or colleges.

---

## नोटीस

रा. रा. वासुदेव भट बिन आंबादास भट जोशी रा० कसबे अडगांव ता० आकोट व तानी मर्द महतापसींग यांसः—

खालीं सही करणार, रा. नेहोरी बुजरुख ता० आकोट, याजकडून नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं, आमचें शेत मौजे मजकूर येथील सर्वे नंबर २१ चें तुह्मी साल मजकुरीं बटाईनें वाहण्यास कबूल करून बटाईखत लिहून दिलें परंतु शेत वाहण्यास आलें नाहीं सबब आह्मीं तुह्मास नोटीस देऊन जबाब मागीतला होता त्यानंतर तुह्मी आह्मास ता० १९-६-११ रोजीं भेटले व लागवडीस रु० मागूं लागले. तुमचे दस्तैवजांत आह्मी रु० देण्याचे कबूल केले नसून ही तुमची भलमनसाइ जाणून आह्मी तुह्मास ता० २६ रोजीं अडगांवांतून रु० २०० लागवडाकरितां काढून दिले. तेथें रु० सावकारांनीं माझे नांवें मांडले तुह्मी २।३ दिवसांनीं येऊन रुपयांचा दस्तैवज करून देण्याचें कबूल केलें. पुढें शेताची किस्तकारीही केली नाहीं व रुपयाचा दस्तैवजही करून दिला नाहीं. तुमचे मनांत बेमानकी येऊन आह्मांस उलट नोटिशीचा जबाब शेत सोडल्याबद्दल देऊन त्यांत आमचे रु० १०० घेणें आहेत अशी खोटी नोटीस दिली या करितां विश्वासघात केल्याबद्दल तुमचेवर मी फिर्याद करीत आहे कारण माझी इज्जत तुमचे पेक्षां कमी आहे असें नाहीं व तुमची इतकी इज्जतही नाहीं कीं तुह्मी मला रुपये १०० द्याल. याकरितां नोटीस देतों कीं हल्लीं किस्तकारीचे दिवस असून आह्मी शेतास लागवड लावणें सुरू केलें. तुमचे मनांत रुपये बुडविणें आहे. करितां उलट आह्मास खोटी नोटीस दिली तुमचे जवळ पैसे असते तर आमचे पासून लागवडीस रुपये तुह्मी मागितले नसते. यावरून उघड दिसतें कीं तुमचे मनांत बेमानकी येऊन रुपये बुडवावे असें आहे. तरी हा नोटीस पावल्या दिवसांपासून शेतीस लावलेला लागवडीबद्दल व तुह्मी नेलेले रुपये २०० हे ८ दिवसांत दाखल करावे. नाहीं तर तुमचेवर फौजदारींत फिर्याद केली जाईल व शिवाय लागवड व दिलेले रुपये २०० कोर्टखर्चासुद्धां व नोटिशीचे खर्चासुद्धां भरून घेतले जातील. कळावें. तारीख ४-७-११ इ०

सही
रामराव आनंदराव याचे हातचे
अक्षरांची निशाणी
नो. नं. ३४१ असे.

---

## नोटीस

भिवसन्या वा भोन्या महार राहणार (मुठ्याचें) शिरसगांव ता० खामगांव

यांसः—

मी सोनी मर्द भिवसन्या महार रा० सागद ता० बाळापूर जि० आकोला नोटीस देते कीं मी तुह्मी गंधर्वाची स्त्री असून मजला वयांत येण्यास ९ वर्षें झालीं आहेत. व तुमचें माझें गंधर्व होण्यास ४॥। वर्षें झालीं आहेत. मी तुमचे घरीं गंधर्व झाल्यावर १ वर्ष राहिले; परंतु स्त्रीपुरुषाचा जो संयेग त्या कामाला तुह्मी योग्य नसून ह्मणजे तुह्मी नपुंसक असून मला ह्मणता तूं परद्वार कर व माझे नांवावर रहा. परंतु माझे आईबाप इज्जतदार असून त्यांची इज्जत मी कमी करणार नाहीं. बल्जबरीनें तुह्मा मला परद्वार करण्यास लावणार होता ह्मणून मी माझे भावास निरोप पाठवून माझे आईबापाचे घरीं गेले. माझे आईबाप नादार असल्यामुळें मी आज ४ वर्षांपासून दुसऱ्याचें कर्ज काढून निर्वाह करिते. परंतु तुह्मी मी गेले तेव्हांपासून माझे आईबापाचे गांवीं मला नेण्याकारितां एक दिवस सुद्धां आला नाहीं; आतां मी किती दिवस तरी कर्ज काढून खावें? व तुमच्या दोन्ही लक्ष्म्या माझ्या अगोदरच्या, एक लग्नाची व एक गंधर्वाची तुह्मी नपुंसक असल्यामुळें दुसरा नवरा करून गेल्या. मी इज्जतदाराची असल्यामुळें आज ४॥। वर्षांपासून राहिले. माझे भाऊ तुमचे गांवीं फारकती मागण्याकारितां आले असतां तुह्मी त्यांना १०० रुपये मागता व तुमचे गांवचे पाटील २९ रु० मागतो. २९ रु० दिले तर मी माझे महारास फारकती देण्याचें सांगतों. नाहीं तर फारकती देऊं देणार नाहीं असें ह्मणतो. परंतु माझे आईबाप फार दरिद्री असल्यामुळें त्यांच्याजवळ ९ रुपये सुद्धां नाहींत ह्मणून विनंती करण्यांत येते कीं, जर तुह्मी स्त्रीपुरुषाचा जो संयोग त्या कामाला योग्य झाले असाल तर मे० सिविल सर्जन साहेबांचें सर्टीफिकेट घेऊन व माझ्या खावटी वगैरे बद्दल दरमहा ९ रुपयांप्रमाणें ४॥। वर्षांचे २८९ रुपये देऊन नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत मला घेऊन जावें. वर लिहिल्याप्रमाणें कोणतीच तजवीज न झाली तर मी हीच फारकती समजून दुसरा गंधर्वाचा नवरा करीन मग नवरेपणाचा हक्क तुमचा बिलकूल राहणार नाहीं. कळावें ता. ९-८-११ इ.

सही
सोनी मर्द भिवसन्या महारीण
नि० बांगडी
दस्तुर होन्या वा जिवन्या याचा
आंगठा आज मु० आकोला.
नो. न. ३४०

---

## नोटीस

रा० शंकर दामोधर उमेदवार रा० मूर्तिजापूर

यासः--

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे सांज्यापूर येथील सर्वे नंबर ३७ एकर २४ गुंठे ८३९ आकार ४४ याचें खातें पार्वतीबाई मर्द नारायणराव हिचे नांवें असून तिनें आपला मालकीचा हिस्सा एकद्वितीयांश हा तुह्मास विकत घेण्याविषयीं सांगीतलें. तुह्मी तिचा हिस्सा घेण्याचें नाकारलें ह्मणून सदरील पार्वती हिनें आपला हिस्सा मजला ता० २१-३-११ रोजीं विकत दिला असून त्याचें खरेदीखत मी करून घेतल्यानंतर तुह्मी सदरील शेतांतील हिस्सा रुपये ९०० शांस मजपासून घेण्याचें कबुल केलें. त्याप्रमाणें तुमचें मानस घेण्याचें असल्यास नोटिसीचे तारखेपासून ८ दिवसांत रक्कम देऊन खरेदीखत करून घ्यावें. याप्रमाणें न केल्यास पुढें तुमची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. हें तुह्मांस कळावें ता० २-८-११. सही

बाजीराव आक्काजी देशमुख द० खु०
नो. नं. ३३९

---

## जाहिरात.

**टेक्स्ट बुक कमिटींत** पसंत होऊन मे. **डैरेक्टर** सा. व. **मध्यप्रांत** व वऱ्हाड यांनीं व्हि. आणि अ. व्हि. शाळांतील बक्षिस व लायब्ररीसाठीं मंजूर केलेले प्रसिद्ध **धनुर्धारी** कृत;-

**१ व्यापारी वाचनपाठ.** किं० ॥.
त्याच प्रमाणें २ **पिराजी पाटील** किं०. ॥।
**३ उपाशी महाराष्ट्रास उद्योग** किं०. ।=
४ धर्मावरील मार्मिक निबंध अंक १ ते १४; १०० बुकांस ।=रु० (पुर्वी १॥ किं० होती) १००० अगर ज्यास्त एकदम घेतल्यास ।– व त्याहून ज्यास्त घेतल्यास वरील प्रमाणें देऊं. निदान १०० तरी घेतलीं पाहिजेत.

नंबर १, २ व ३ यांच्या प्रती एकदम १० घेतल्यास अनुक्रमें ॥= व । व ज्यास्त घेतल्यास ॥– व ।. किंमतीस देऊं.

टपाल खर्च निराळा—व्ही. पी. नें मागविल्यास निदान एक त्रितीयांश तरी किं० आगाऊ आली पाहिजे.

ल. वें. मांजरेकर आणि कंपनी
बेळगांव

---

## Notice.

D. Y. Phatak oil-engine expert for ielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq
Pleader
Amraoti.

No N. 3

## आर्यवनौषधालय मुर्डी.

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधे बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आम्हास दिलें आहे. हे अवश्य लक्ष ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादे औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, बीयस्तंभक,
रक्तशोधक, मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पाहिजे या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उष्हाळें इंद्रियशिथिलता, कडकी. गर्मीसंबंधीं मुरलेले विकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, मठ पाय त्रमांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडूरोग मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जूनाट परमा, मुष्ठीमैथूननें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातू रक्त याची शुद्ध वृद्धी, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतीचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सार्टिफिकीटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपानखर्डे सोबत दिला व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील.

दरः—एकदम ३५ गो० १ रु०, ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १२५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें वडस. साहर, फुल, खुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नपता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु० २

३ दंतबळवर्धक पूडः—दंत संबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें मुळ्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्णः—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधानें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा ठेवून याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं, औषधांत अपाय कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सार्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी नें पाठवूं प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकित्सा कळवूं.

## अत्यंत अगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतुन औषधांच्या अनेक जाहिराती सुरू असुन प्रत्येक जाहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पाहात आहे.

आपला समाज निरुद्योगी आळशी बनल्यामुळें एकदा जो धंदा सुरू केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून वाटेल त्यानें करावी आमच जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिले वगैरे गावांतुन तो पुणावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आम्हास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्याप ज्याची तो स्वतंत्र आहे आम्हास ग्राहकांस सुचविणें हच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १५।२० वर्षें अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कल्याणवची ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असले। व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटाटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकळ आर्यबंधूंस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होणाप आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरवी, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें ती खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून त्वरित आरोग्य येईल-

नं. १

नो. नं. २४

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**

र

---

## Oriental Govrnment security
## LIFE ASSURANCE COMPANY
## Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Brown, Manager,

HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Exceed $3\frac{3}{4}$ crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act to creating their clients with the utmost liberality.

UNQUESIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowmenpt policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may ave money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENT WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT, Nagpr

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिव आश्रमांत छापून प्रसिद्ध केलं.

अशी संधी पुन्हां येणार नाहीं.



एक घड्याळ बक्षीस.

दर एकाची किंमत ३।

टलमन् इमिटेशन रास्कोप सिस्टिम

खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत रेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा- कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां देणार व्ही. पी. नें मागवा.

ाचा पत्ता:— **खोजा वल्लीभाई इस्माल** मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.

नो. नं. ४

---

र आनन्दका सागर रंगीन तसवीरे हित चारो भाग तथा पांचो अंग

**सचित्र कोख शास्त्र.**

सकी हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री के जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ यका, कुमारी प्रकृती, सत्व दुती ा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिको ान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय ास स्थान क्रया, शैय्यातिथ, कामस्थान ासर्गोर, वतींसोआमूशण, वस्त्रतअर्दिवमधान टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि क रोगोंकी चिकित्सा औषधि, पशु- जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशी मुद्रां विद्या आदि अमुल्य विषयका र किंमत रु०

**पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा**

नं० ७७ **अलीगड सिटी**

---

**लक्षण नयन रुक्कुठार.**

**विलक्षण नयन रुक्कुठार** – ह्या अप्रातिम धापासून डोळ्याचे साधारण विकार– **ऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, भूरी, फुल** इ० जोरदार व जुनाट रोग त बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत ; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें तापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, नें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ी हें अप्रातिम गुणकारी असून लहान ही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत ानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस येऊन मस्तकासही शांतता येते. सदर चे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच थेंब घालणें. साधारण विकारास एक रेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास कुप्या लागतील; सोबत औषध घालणे ां कांचेची नळी फुकट मिळेल, एक ची किं. १ एक रुपया. तीन कुप्य दम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ दम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न. तां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनचा उत्तम निळिकाळी शाई आण्याची घेणारास पुढील सालची डायरी सीस मिळेल. आमचेकडे शालेपयोगी मराठी इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी ल फारच माफक दरानें मिळेल. विशेष ाहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग

## नोटीस

रा० रा० उमाजी वल्लद एसाजी तेली राहणार सोनाटी ता. मेहकर जि० बुलडाणे यांस—

नोटीस देणार रंगू मर्द उमाजी तेली राहणार लोणी ता० वाशीम जि० आकोला नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असतां मजला मुळींच वागवित नाहींस. मी आपले बापाचे येथें दोनतीन वर्षेपर्यंत निर्वाह केला पुढें त्यांच्याही गरीबीसबबीमुळें मला पोट भरण्याकरितां सावकाराचें कर्ज आज तेरा वर्षांपासून दरसाल २५० रुपयेप्रमाणें झालें आहे मोलमजूरी करून सावकाराचें व्याज भरतें आहे.आतां सावकारी कर्ज मला मुळींच मिळूं शकत नाहीं ह्मणून ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचें आंत सावकाराचें कर्ज देऊन टाकून मला तुह्मी घेऊन जावें. न दिल्यास व १५ दिवसचे आंत उत्तर व कर्ज न आल्यास तुह्मी मला वागविण्यास खुष नाहीं असें समजून दुसर घरठाव करीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर मुळींच चालणार नाहीं. पण कर्जाचा बोजा तुमचेवरच राहिल या नोटिशीस लागलेला खर्च तह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख ९-९-११ इ. द० चिंतामण अनंत दं० खु०

सही

रंगु मर्द उमाजी तेली इचे हातची निशानी बांगडी.

नो० नं० ४१६

---

## नोटीस.

भाऊ वा॥ चंद्रभान पाटील राहणार सोगड ता० जळगांव यांस—

मी खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं माझें वडिलोपार्जीत माझें मालकीचें शेत मौजे बोरखेड येथील शेत स० नंबर १ व २ या उभयता शेतांतील ६ व्या हिश्यांतील निम्मे हिस्सा तुह्मी वाहतां. परंतु आजपावेतों वरील शेताचें पीक आह्मी घेत आलो. व चालू सालांत दोन्ही वरील शेतांतील निम्मे हिशांतील निम्मे हिस्सा पेरला असतां हरकत केली. हरकत कां करितां असें ह्मटलें असतां तुह्मी ह्मटलें कीं दोन्ही शेतांतील हिस्से शेतीं गहाण आहे. ह्मणून हरकत करितो व या शेतांसंबंधानें तुह्मांपाशीं जें कांहीं कागदपत्र असतील ते चार चे. घांसमक्ष दाखवावे ह्मणजे त्याप्रमाणें व्यवस्था करण्यांत येईल व नोटिसाप्रमाणें तुह्मी आठ दिवसाचे आंत व्यवस्था न केल्यास तुह्मास शेत वाहूं देणार नाहीं व पीक ही घेऊन जाऊं देणार नाहीं व नुकसानीबद्दल कोर्टीत रितीप्रमाणें व्यवस्था करून कोर्टखर्च व नोटिशीचा खर्च तुह्मापासून घेतला जाईल हें लक्षांत ठेवावें. कळावे तारीख १८-९-१९११

सही

रामचद्र वल्लद तुकाराम कुणबी राहणार बोरखेड मु० खामगांव द० खुद

नो० नं० ४१७

# Oriental Govrnment securit

# LIFE ASSURANCE COMPANY

## Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Brown, Manager,

HEAD OFFICE—BOMBAY

## FUNDSE xcede 3 crores 34

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in co with Life Assurance, it is when claims arise, that the amount due un policy be paid to the Claimants at the earliest possible date. Th Directors of the 'Oriental' keep well before them and act to treating clients with the utmost liberality.

UNQUESTIONBALE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to sum, but it is essential to know how such Funds are invested miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Se and lodged with the Government Official Trustee of Bombay in ter the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by empl portion of their annual income or profits in effecting life policies, a create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although h save money yet, if he dies early before he had time to save muc wife and family may be in distress. Life Assurance is a means by his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man up his mind to assure his life the better. Once satisfied of the propr the step, do not delay. There are numerous instances in the records o , Oriental' where the delay of a month or less, has left the family w athe intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained picationpl to—

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nag

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

---

# Notice.

Notice under section 44 of the Berar Municipal Law of 1886

The Municipal Committee of Khamgaon have at their Special Mee held on the 28th. August 1911 passed a resolution proposing the imposi of tax under section 41 (I) (A) (b) as set forth below:-

Any inhabitant objecting to the proposal should submit his obje in writing, within 30 days from the publication of this notice.

1 Class of persons or description of property to be taxed:-

Every person who practises within the limits of the Khamgaon M cipal Committee, the trade of ginning cotton and pressing the same bales by means of steam or mechanical process shall be assessable t tax.

2 nd Amount or rate of tax.

The tax shall be levied at the following rates:-

| | Rs. | As. | Pies |
|---|---|---|---|
| Per every boja of 10 Maunds ginned | 0 | 0 | 8 |
| Per every bale of 14 Maunds pressed | 0 | 0 | 10 |

3 rd. System of assessment.

(1) The tax shall be assessed in the first place by a Sub—Comm appointed for the purpose subject to the sanction of the General Committee.

(2) When the list of assessment is ready, a notice by tom—tom be given to the public and the list shall be open to every one for inspect at the Municipal office.

(3) Objections to the assessment shall be received and considered the Sub-Committee aforesaid if presented in writing within one month fro the publication of the list of assessment.

(4) The tax shall be payable in one instalment on the 1 st. Augus every year.

(5) The tax will be collected through the managers of the factorie when the bojas are ginned and bales are pressed.

K. S. Jatar
Chairman
Municipal Committee
Khamgaon.

## नोटीस

वासुदेव देवराव दिगंबर वस्ती अकोले यांचकडून मि० मालेखा वा महमदखा मुसलमान वकील राहणार अकोले यांस नोटीस देण्यांत येते कीं तुह्मा आमचे पासून आमचा बंगला दरमहा भाडे ३९ रुपये देण्याचें कबूल करून भाड्यानें घेतला. त्याप्रमाणें तुह्मी आह्मास ता० २९ माहे जून सन १९११ अखेर पावेतों भाड्याचे रुपये चुकते केले आहेत. परंतु ता० २९ जूनपासून पुढें व माहे जुलई, आगष्ट व सप्तेंबर सन १९११ या महिन्याचें भाडें तुह्मी आह्मास दिलें नाहीं. करितां तुह्मास या नोटिशीनें कळविलें जातें कीं तुह्मी ही नोटीस पावल्यापासून २४ तासाचे आंत सर्व भाडें आह्मास आणून देऊन आमची पावती घ्यावी व त्याचप्रमाणें तुह्मी आमचा बंगला ही नोटीस मिळाल्यापासून ४८ तासाचें आंत आह्मास खालीं करून द्यावा. तुह्मी बंगल्याच्या खिडक्या, व दारें यांची मोडातोड केली आहे व तुमचे लोक आणि जनावरें बागेच्या झाडांचीही खराबी करित असतात. सबब या बद्दल नुकसानीचे रुपये १०० शंभर तुह्मी ही नोटीस पावल्यापासून २४ तासाचे आंत आह्मास आणून द्यावे, व आमची पावती घ्यावा. आतां यापुढें तुह्मास बंगला भाड्यानें देणें नाहीं कारण तुह्मी भाडें वेळच्या वेळीं देत नाहीं. व बंगल्याच्या इमारतीची व त्यांतील सामानाची मोडतोड करित आहां व बागेचें नुकसान करित आहां व तुह्मास ह्मटलें असतां तंटे करतां व बेआब्रूची बोलणीं बोलतां. एकंदरीत तुह्मास बंगला भाड्यानें दिल्यापासून आह्मास व आमचे मिळकतीस तुमचा फार त्रास आहे. सबब तुह्मास या नोटिशींत कळविल्याप्रमाणें तुह्मी भाडें दिलें नाहीं व नुकसानीचे रुपये दिले नाहींत आणि बंगला खालीं करून दिला नाहीं तर येत्या सोमवारीं तुमचेवर दिवाणी कोर्टीत फिर्याद करून भाडें नुकसानी आणि कबजा मागावा लागेल. करितां आह्मी तुह्मास या नोटिशीनें सर्व मजकूर अगाऊ कळविला आहे. या नोटिशीची एकप्रत आह्मी वर्तमानपत्रांतून ही छापित आहों. कळावें

ता० ३०-९-१९११ इ०

S. M. Moholkar; Pleader for Vasudeo Deorao Digambar Akola.

नो. नं. ४३१

## नोटीस

सर्वत्र लोक वझर, भुमराळ, कीनगांव जट्टू, कासारी वगैरे प्रगणें लोनार जि० बुलडाणें यांनाः —

जाहीर करण्यांत येतें कीं पांडु वा पुंजाजी आघाव वंजारी रा० वझर प्र. लोणार हा पाच महीने जाहले मयत जाहला आहे त्याजला बायका दोन आहेत व मयतास सखा भाऊ लोभा वा पुंजाजी आघाव हा धाकटा भाऊ आहे. सबब मयत पांडु याच्या बायकांनीं स्थावर जिनगी विकण्याकारितां काढली आहे ह्मणून ऐकीलें आहे. तरी त्यांना हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें विक्री करण्याचा अधीकार नाहीं. त्यानीं जिवंत आहे तोंपावेतों किंवा दुसरा घरठाव करिपावेतो फक्त वाहुन पोटभर ण्याचा अधीकार आहे. याशिवाय त्यांना कांहीं करितां येत नाहीं व हल्लीं मयत पांडु वा पुंजाजी यांजला मुलगा नसून कोणाचें त्याजला कर्जही नाहीं आतां त्याच्या बायकांना कोणी कर्ज देऊं नये व स्थावर जिनगी गहाणखरेदी घेऊं नये. घेतल्यास त्याजबद्दल स्थावर जिनगी जबाबदार राहणार नाहीं. करितां या जाहिरनाम्यानें वरीलप्रमाणें कळविलें आहे कीं कोणी त्यांना पैसा देऊन फसूं नये करितां जाहिर केले आहे त्या स्थावर जिनगीचा वारस खालीं सही करणार आहे व कोणास घेण्याचे असल्यास मयत पांडु वा पुंजाजी याचा धाकटा भाऊ नामे लोभा वा पुंजाजी आघाव याची मान्यता घ्यावी कळवें ता० २१-९-११ इ.

सही

लोभा वा पुंजाजी आघाव मु०
वझर प्र० लोणार ता० मेहेकर नि० हातची रेघ
असे

नो० नं० ४३२

## नोटीस

नोटीस— बेशमी सिताराम नारायण गुरव असनाथे राहाणार आकोट

यांसः–

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझा चुलता परशराम यानें तुह्मांस रुपये ९० चें गहाणखत लिहून दिलें होतें. त्याचे फेडीसाठीं माझे मालकीचे शेत पर्वे नंबर ३९३ आकोट येथील पांच वर्षाकरितां तुमचे ताब्यांत दिलें होतें. ती मुदत पुरी होऊन एक वर्ष झालें मी चार लोकांसह गहाणखत परत मागण्याकारितां आपणांकडे दोनतीन वेळां आलों असतां दिलें नाहीं व गहाणाची रक्कम पावल्याची पावती दिली नाहीं. करितां ही नोटीस पावल्यापासून गहाणखत आठ दिवसांचे आंत आणून द्यावें न दिल्यास तें बातल असे व गहाणाचे रक्कमेबद्दल दावा केल्यास त्याची जबाबदारी माझेवर नाहीं ही नोटीस दिली सही तारीख २७-माहे ९ सन १९११ इसवी.

सही

रामा मारोती गुरव राहाणार शाहापूर
दस्तुर खुद०

नो० नं० ४३३

## नोटीस

नोटीस बेशमी तानी मर्द नरमू जात कुंभार रा० जमकेश्वर हल्लीं मुक्काम लाखपुरी ता० मुर्तिजापूर

इस—

खालीं सही करणार यांजकडून नोटीशीचा जबाब देण्यांत येतो कीं तूं ता० २३ माहे जुलई सन १९११ च्या सुदर्शनपत्रांत नोटीस दिली ती पावली नोटिशींत लिहिलेला मजकूर सर्व खोटा आहे लग्न झाल्यापासून बरेच वेळ घेण्यास आलों असतां फक्त तूं एकदोन वेळच आलीस व काहीं दिवस राहून आईबापाचे फुसलावणीनें किंवा आपले मनानें मला न विचारतां

निदून गेलांस तरी मी जे जे वेळेस तुला नेण्यास येत गलों ते ते वेळेस कांहींतरी बहाणा सांगून आज येईन उद्या येईन असें ह्मणून मजपासूनच खर्चास रुपये घेत असे. आईबापाचें घरीं राहून कर्ज होण्याचा कांहीं संबंध नाहीं. तझे मनांत मी फारकत द्यावी ह्मणून कर्ज झालें असे दाखवून पंचाचें हीं नांव दाखवीत आहेस मी पंचासमक्ष कांहींच वाटाघाट केली नाहीं. मी तुला वागविण्यास कबूल आहे तरी ही नोटीस पावतांच आठ दिवसाचे आंत घरीं येऊन रीतीप्रमाणें वर्तणूक ठेववीं तसें न केल्यास तूं मी खोटी नोटीस दिली त्याजबद्दल मला काम चालविणें भाग पडेल व कोर्टमार्फत तुला दाव्यांतही वेणें भाग पडेल. अशाबद्दल मी कोणतेंच तर्‍हेचा जबाबदार नाहीं ही नोटीस दिली सही ता० २७-९ १९११ इ० द० लक्ष्मण भिकाजी पी० रा० आकोला

सही

नरसू वा राघोजी कुंभार रा० जमकेश्वर ता० आकोला निशानी खु० हातची रेघ असे.

नो० नं० ४३४

---

## जाहिरात

सर्व लोकांस जाहिर करण्यांत येते कीं डालुराम शंकरराम मारवाडी रा० ताजनापेठ आकोला यांनीं विद्यमान डिस्ट्रिक्टज्यज्ज साहेब आकोला याचे कोर्टांत जाहीर होणें बद्दल अर्ज दिला होता. आणि कोर्टानीं त्याजला ता० १८।९। ११ रोजीं नादार ठरविला आहे. आणि विद्यमान डि० ज्यज्ज साहेब आकोला यानीं सदरहू डालुराम शंकररामची खालीं लिहिलेली स्थावर जंगम मिळकत हरास करण्याचा हुकूम दिला आहे. त्याचा तपशील

१ ताजनापेठ आकोला येथील डालुरामचे रहातें घर माळोदी खण ३ वर माडी कवलूची असून दोन्ही बाजूस गच्ची आहे. दरवाज्याचा दर्शनीभाग दक्षीणेस आहे. घरांचे उत्तर बाजूस सायवानीखपरेल असून पूर्व बाजूस स्वयंपाकाची खोली खपरली आहे व घरचे पश्चीम बाजूस टीनच्या पत्राच्या खोल्या तीन आहेत सदर्हू इमारतीच्या भोवताल आवाराच्या भिंती मातीच्या व गोट्याच्या असून दरजबंदी चुन्याची आहे. अजमास लांबी ६७ फूट व रुंदी ३४ फूट आहे चतुःसिमा पू. नन्नेखा चुनेवाला जमादार याचे घर प. गल्ली व आबासखा मास्तर यांचे घर द. सरकारी सडक उ. बाबन शामराव याचा कोठा व पडीत जागा सदर्हू घर चार दिवालीच्या आंतील जागेसुद्धां दगडमाती इमल्यासुद्धां (२) जंगम माल.

पलंग १ लांकडी, सतरंजी १ व अलमारी १ टेबल १ सागवानी, खुर्च्या २, पेटी १ लाकडी, येणेंप्रमाणें वर लिहिलेली ज्या स्थावर जंगम मिळकतीचा जाहीर लिलाव करण्याची ता. १९ माहे आक्टोबर सन १९११ रोजीं रवीवारीं सकाळी १० वाजतां ज्या ठिकाणीं त्याची मिळकत आहे त्या ठिकाणी हरास होईल कळावें.

रिसिव्हर कामा वकील

नो० नं० ४३९

---


अशी संधी पुन्हां येणार नाहीं.



दहा घड्याळें घेणारास एक घड्याळ बक्षीस.

पोष्टखर्च माफ

दर एकाची किंमत ३।

**सर इमिटेशन रास्कोप सिस्टिम**

[illegible] शांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार [illegible] आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळासोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ता:—**खोजा वल्लीभाई इस्माल**
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो. नं. ४

---

**विहार आनन्दका सागर रंगीन तसबीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.**

अगली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुषोंके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पतिव्रता, व्यभिचारणी आदिको पहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार मय सहवास स्थान क्रया, शैय्यातिथ, कामस्थान सालासगीर, वतीसोआमूषण, वस्त्रतअीर्दवमधान पुत्रस्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोंकी चिकित्सा औषधि, पशुभाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण मुद्रां विद्या आदि अमुल्य विषयका भेडार किंमत रु०

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा
नो० नं० ७७ अलीगड सि टी

## विलक्षण नयन रुक्कुठार.

**विलक्षण नयन रुक्कुठार** – ह्या अप्रातिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार– **खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूरी, फुल** इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रातिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे कारितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीचा उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग

म्युनि

| अनुक्रम नंबर. | दुकानें. | वर्ग १ ला छावणीचे चबुत्रे. कायम-वर्ग १ दररोजचे. ८ फूट लांब व ८ फूट रुंद असे दुकान — तीमही. | सहामाही. | वार्षिक. | कायम-वर्ग ४ आठवड्या… ६ फूट लांब व ६ फूट रुं… — तीमाही | सहा माही. | वार्षि… |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. |
| १ | धान्याचे व्यापारी. | ७ .... .... | १२ .... | २० .... | १ ४ .... | २ ८ .... | ५ .... ... |
| २ | ( ठोक विक्रीचे ) वाणी. | " | " | " | " | " | " |
| ३ | कापड दुकानदार. | " | " | " | " | " | " |
| ४ | धातूंचीं भांडीं विकणारे. | ४ .... .... | ७ .... .... | १२ .... | .... १२ .... | १ ८ .... | ३ .... ... |
| ५ | खाटीक ( मास विकणारे ) | " | " | " | " | " | " |
| ६ | स्टेशनरी दुकानदार. | " | " | " | " | " | " |
| ७ | लोखंडाचे व्यापारी ( विन्नाडी ) | " | " | " | | | |
| ८ | गुळ विकणारे. | " | " | " | " | " | " |
| ९ | हलवाई. | ३ .... .... | ५ .... .... | ९ .... .... | .... ६ .... | .... १२ .... | १ ८ ... |
| १० | सरकी विकणारे. | " | " | " | " | " | " |
| ११ | फळफळावळ विकणारे. | " | " | " | " | " | " |
| १२ | बांगड्याचे विकणारे. | " | " | " | " | " | " |
| १३ | शिंपी | " | " | " | " | " | " |
| १४ | तंबाखु विकणारे. | " | " | " | " | " | " |
| १५ | डाळ्या फुटाणे विकणारे ( काहार किंवा भरडभुंजे ) | " | " | " | | | |
| १६ | रेशमी, सुती, लोंकरी चिजा विकणारे. | " | " | " | | | |
| १७ | भाजीपाला विकणारे. | | | | | | |
| १८ | सोने, चांदी विकणारे. | | | | .... १२ .... | १ ८ .... | ३ .... ... |
| १९ | सराफ ( खुर्दा विकणारे ) | | | | | | |
| २० | तुपाचे ठोक विक्री करणारे. | | | | | | |
| २१ | रंगारी ( चिटें वगैरे विक्री करणारे. | | | | | | |
| २२ | तेली व पेंड वगैरेचीही विक्री करणारे | | | | | | |
| २३ | कातडीं विकणारे. | | | | | | |
| २४ | दोर विकणारे. | | | | | | |
| २५ | भटयारे [ रोटी विकणारे ] | | | | | | |
| २६ | चिल्लर मीठ व धान्य विकणारे. | | | | | | |
| २७ | चांभार ( जोडे विकणारे व करणारे ) | | | | | | |
| २८ | बारी [ विड्याचीं पानें विकणार. ] | | | | | | |
| २९ | तपकीर विकणारे. | | | | | | |
| ३० | कुंभार. [ मडकीं विकणारे ] | | | | | | |
| ३१ | कांबळी विकणारे [ धनगर ] | | | | | | |
| ३२ | टोपल्या सुपें विकणारे ( बुरूड ) | | | | | | |
| ३३ | गवत विकणारे. | | | | | | |
| ३४ | कडबा विकणारे. | | | | | | |
| ३५ | हातेसरडे कापड विकणारे मोमीन. | | | | | | |
| ३६ | जनाड दर्पण विकणारे. | | | | | | |
| ३७ | मोहाचीं फुलें विकणारे. | | | | | | |
| ३८ | आंबाडी, ताग, शिंदी वगैरे ताडपटीचें विक्री करणारे. | | | | | | |
| ३९ | हिंग जिरे बेजवार विकणारे | | | | | | |
| ४० | शिसे, कासे, जस्त [ चिल्लर विकणारे ] | | | | | | |
| ४१ | शेंदूर, कुंकु विकणारे. | | | | | | |
| ४२ | गांधी आतार. | | | | | | |
| ४३ | तुपाचे चिल्लर विकणारे. | | | | | | |
| ४४ | पागोटीं फडक्या वगैरे विकणारे महार | | | | | | |
| ४५ | आतषबाजी विकणारा बारुदवाला. | | | | | | |
| ४६ | खोगीर जीन विकणारे. | | | | | | |
| ४७ | घोडे तट्टु विकणारे. | | | | | | |
| ४८ | हशी विकणारे. | | | | | | |
| ४९ | गाई व बैल विकणारे. | | | | | | |
| ५० | गाढवे विकणारे. | | | | | | |
| ५१ | बकऱ्या मेंढ्या विकणारे. | | | | | | |

नं० १७ ते ५१ पावेतोंचे व्यापारी यांना छावणीचे चबुतऱ्याखालीं दुकानास जागा मिळणार नाहीं.

नं० ७।१५।१६।१७ आणि नं० १९ ते ५१ पावेतोंच्या व्यापाऱ्यांस छावणी असलेलें चबुतऱ्यांत दुकानास जागा मिळणार नाहीं.

दिली. त्या नोटीसांची उत्तरेंही मी तुझांस दिली आहेत. इतकेंही असून पुन्हां तुह्मी ही खोटी नोटीस दिली. मी माझे सर्वीचे नोटीशींत तुमचें माझे शराकतींत कोणतांच व्यवहार नाहीं अशी नोटीस दिली असून आपण मला विनाकारण गोवूं पाहतां हे बरोबर नाहीं. आपण आपले दुकानचें पूर्ण मालक असून मी तुमचें दुकानचें तीजोरीस शील केली नाहीं. व आपली तिजोरी कोठें असतें हेंही मला माहित नाहीं. आपण आपले तिजोरीचें पूर्ण मालक आहांत, आपणास वाटेल तेव्हां ती उघडण्यास आपण पूर्ण मालक आहांत. तीजोरी संबंधानें किंवा आपले दुकानचें व्यवहारा संबंधानें मी कोणतेंच प्रकारें जबाबदार नाहीं. हें मी आपणास पुर्वींच कळविलें आहे व आतांही तेंच कळविते. तुमची नोटीस मजला मुळींच कबूल नाहीं. ता० २७. २-१९१२ इ०

सही

गोपीसा बाळसा द० खु०

नो० नं० १२७

## जाहिरनामा.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं श्रीशंभ महादेव शिखर शिंगणापूर ता० माण जि० सातारा येथें दरसाल चैत्र मासीं यात्रा भरत असतें, त्याप्रमाणें चालूं साली चैत्र शु० ९ शके १८३४ तें चैत्र शुद्ध १५ शके मजकूर पावेतों ह्मणजे तारीख २३ माहे मार्च सन १९१२ तें तारीख १ माहे एप्रिल सन १९१२ पावेतों दोनही दिवस धरून यात्रा भरणार आहे; यात्रेकरूं लोकांस येण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाहीं; कारण यात्रेस पाणी विपुल आहे व हवा स्वच्छ आहे. कळावें, तारीख १०-२-१२

म. ग. भिडे, सेक्रेटरी, पो. फंड शिंगणापूर.

[SD.] S. G. BHADBHADE, मामलतदार ता० माण.

नो० नं० १२८

## नोटीस

वि० सबजज साहेबबहादूर अकोला यांचे कोर्टः--

सक्सेशन सर्टिफिकेट नं० ३ सन १९१२

सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याचा अर्ज—

अर्जदार

मारजी मर्द महेमाजी पाटील कुणबी वस्ती नकाशी ता० बाळापूर.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल दिलेला अर्ज आमचे कोर्टांत तारीख ६-४-१२ रोजीं नेमिला आहे. त्या तारखेस यांची काहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचें कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता० २-२-१२ इसवी.

सही

JANKIPRSAD.

सबजज आकोला.

नो० नं० १२९

## नोटीस

मी खालीं सही करणार जात शीक रा० कजबे मेहेकर प्र० व ता० मेहेकर जि० बुलडाणें ईजकडून:—

चतुरसींग वल्द खुशालसींग सिंद हैद्राबादकर जात शीक हल्लीं मुक्काम मेहेकर प्र० व ता० मेहेकर जि० बुलढाणें यांस या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं; मी तुमची लग्नाची बायको असून मजला त्यांत येण्यास सुमारें दोन वर्षे झालीं त्या मुदतींत मी व तुह्मी एकत्र असतां मजला असें समजलें कीं, तुमचें मस्तक फिरलेलें असून तुह्मी देहभानावर नाहीं व शिवाय अलीकडे तुह्मी जातीभ्रष्टही झालें आहांत मी तुमचे जवळ राहिल्यानें माझें जिवाचा एखादे वेळेस घात व तुमच्यानें माझा संसारही होणार नाहीं अशी माझी पक्की खात्री झाली आहे त्यामुळें मी तुमचे पाशीं नांदण्यास राहूं शकत नाहीं, तरणी असून मजला नवऱ्या वांचून राहवत नाहीं. करितां ही नोटीस पावल्या दिवसां पासून आठ दिवसांचे आंत तुह्मी मजला आपसांत फारकती यात्री न दिल्यास ही तुह्मांस दिलेली नोटीस हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव अगर माझें मनास वाटेल ते करीन मग तुमचा मजवर व माझेशी गंधर्व वगैरे करणारावर कोणतेंच प्रकारचा दावाही चालणार नाहीं. करितां अगाऊ या नोटीशीनें कळविले आहे. ता० २९-२-१२ इ०

सही

कुंदन मर्द चतुरशींग मुक्काम मेहेकर द० खु०

नो० नं० १३०

## नोटीस

आह्मी खालीं सही करणार पंच—

लक्ष्मण सिताराम जात गोवारी राहाणार आकोला यांसः—

नोटीस देण्यांत येतें कीं ता० १९-२-१९१२ इ० चे अंकांत नोटीस दिली त्याचे उत्तर इलाई मर्द धन्या जात गोवारी इचे लग्न झाले किंवा नाहीं. हे आह्मास मुळींच माहीत नाहीं व आह्मी त्यामध्यें पंचही नव्हतो व आह्मी भांडगडची मुलगी अमुक जातीची आहे हे सुद्धां आह्मांस माहीत नाहीं या संबंधानें आह्मास कोणत्याच तऱ्हेची भांडगड माहीत नाहीं. या संबंधानें जो खर्च येईल तो तुह्मास द्यावा लागेल. कळावें. ता. २४-२-१२ इ.

सह्या

१ तुकाराम वल्द काशीराम जात गोवारी रा. आकोला नि. आंगठा.

२ सिताराम वल्द दागो रा. आकोला नि० आंगठा.

३ सोमा वल्द लोडाजी रा० आकोला नि० आंगठा.

नो० नं० १३१ द० श्रीधर कृष्ण वैदर

## जाहीरात

खरे गारेचे चष्मे. व खात्रीलायक घड्याळें आमचें येथें मिळतील. एकदा अनुभव घेऊन पाहवा खात्री न पटल्यास पैसे परत.

पत्ता एम. एम. आणि सन्स
पुलाजवळ आकोला

8 The deposit money shall be remitted to the contractor in the form of short recovery by the amount towords the close of the year.

9 Interest at one percent permonth shall be charged on overdue instolments and shall be recovered with the amounts of such instolments when paid by the contractor.

10 The contractor shall have no claim to the excess money, if any recovered by resale of contracts.

11 No contractor shall quarrel with or detain a trader or hold back any of his commodities brought for sale as an earast money for Bazar dues, not sha'l he receive an article instead of file a civil sait against him.

12 Help from the Mul Secretary shall be sought by the contractor and the Secretary of the Municipalty shall recover and pay the dues to the contractor or shall take such steps as are allowed by the rules.

13 The change in Bazar day shall rest with the Deputy Commissioner or representation by the Municipal Committee who shall not be held responsible for any loss cansed to the contracor owing to such charge or cessation of Bazar cansed by epidemics etc. prevailing in the surroundings or in the Bazar town itself.

14 Failare to fulfil the terms of the Bazar contract by the contractor or his agents or servants shall not only make him liable to the collection of his license but also to prosecution or punitionment prescribed under those rules.

G. K. Agarwale

Chairman Sub—Committee.
True copy
Mahamad Basheer Secretary

Akote Municipality

Draft rules for the levy of fees for the Akote Timber wood weekly Market Carts or animals bringing timber wood or bamboos except fire wood for sale into the Akote Municipality shall not stand in any public or private place other than the Timber wood Market.

2 The following shall be the boundories of the wood Market survey No 5 of Kemlapur viz,

North— bounded by survey No 58 of Kemlapur

South— do Argaon road

East— do Akote boundary

West— to survey No 8 of Kemlapur

II No cart or animal shall quite the wood Market unless & untill the Market dues leviable in respect of any timber wood or bamboos sold there in have been paid to the Mohorir in charge of the Market.

The following shall be the fees leviable under the above rule.

1 For cart load one anna (0-1-0)
2 For an animal load half anna (0-0-6)
3 A receipt shall be granted by the Mohorir in charge, for all Market dues paid.
4 If the owner or person in charge of any cart or animal so desires, the Mohorirs incharge shall enter in the receipt, the details of all sales effected

5 If the owner or per
timber, wood or bamboo cart
desires to keep his unsol
or bamboos on the
until the following
he will be allowed
of fees of 6 pies ad
dues per cart o
days or untill su
takes charge of h
6 pies per week i
has been deposites.

6 The committee ca
collections of the Market
contractor who shall have t
shall have to abide by the r
and also the rules framed
weekly Market with regar
duties for payment and
of fees &

7 Any person committing
of any of the foregoing r
on conviction before Magis
punishable with fine which m
to ten Rupees

8 None shall sell or buy a
wood or bamdoos out side t
of the wood Market.

N. G. Deshp
Chairman Akote Mu
( True Copy )

Mahamad Ba
Secretary akote Mu
No 125

## नोटीस

रा० रा: रावो वल्द चहादू
राहण्याचें गांव पळसीमूपो नोटीस दे
मर्द रावो मानकर रा० पळसीमूपे
देण्यांत येतें कीं मी तुझी लग्नाची
असून तू मजला ५-६ वर्षांपासू
गेलास तूं कोठें आहे याचाही पत्त
नाहीं, तरी आतां अशा स्थितींत
पर्यंत राहावें. तुझे मागें मी सावक
रु० १५० पोटगी खर्चाबद्दल व
मुलीचे लग्नाबद्दल रु० १५० ए
तीनशें कर्ज काढलें आहे तरी
जाहीर झाल्यापासून १५ दिवसां
सावकाराचे कर्ज देऊन वाग विण्यास
जावें. याप्रमाणें तुजकडून तजवीज न
ही नोटीस फारकती समजून मी
ठाव करीन व नंतर झालेल्या कर्जा
तुलाच करावा लागेल व तुझा न
हक्क बिलकूल राहणार नाहीं. कळा
२२-२-१९१२ इ.

सही

पुतां मर्द रावो मानकर नि
हातची

नो० नं० १२६

## नोटीशीचें उत्तर

मे० खाजाशरफुद्दीन वल्द
उर्फ सुबानसाहेब रा० अकोला
खालीं सही करणार यांनक
विण्यांत येतें कीं, आपण ता
फेब्रुवारी सन १९१२ इ०
समाचार पत्राचें अंकांत नोटीस
वाचली. आपण या पूर्वी अ

आकोट येथील म्युनिसिपल हद्दीतील आठवडे बा[जार]

भाडेपट्यानें दिलेले,

| वर्ग २ रा छावणी नसलेल. | | | | वर्ग ३रा म्युनिसिपल हद्द ( आवार ) | | | | वर्ग १ ला छ[ावणी] | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| [का]यम-वर्ग २ दररोजचे. | | | कायम-वर्ग ४ आठवड्याचे. | कायम-वर्ग ३ दररोजचे. | | | कायम-वर्ग ४ आठवड्याचे. | कायम वर्ग १ ला दररोजचे | | |
| [८ फूट लां]ब व ८ फूट रुंद | | | ६ फूट लांब ६ फूट रुंद. | ८ फूट लांब ८ फूट रुंद | | | ६ फूट लांब ६ फूट रुंद. | ८ फूट लांब व ८ फूट रुंद | | |
| | सहा माही. | वार्षिक. | | तीमाही. | सहा माही. | वार्षिक. | | तीमाही. | सहामाही. | वार्षिक. |
| पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. | | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. | | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. |
| .... | ६ .... | १० .... | या वर्गांतील दुकानांच्या जागा म्युनिसिपालिटीनें कोणालें देतां कामा नये. | १ ८ .... | ३ .... | ६ .... | पायवाटेंतील दुकानांच्या जागा म्युनिसिपालिटी मालकांनें देणारच नाहीं. | ८ .... | १४ .... | २४ .... |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | ” |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | ” |
| .... | ३ ८ .... | ६ .... | | १ .... | २ .... | ३ .... | | ५ .... | ९ .... | १६ .... |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | ” |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | ” |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | ” |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | ” |
| .... | २ ८ .... | ८ .... | | ८ | १ .... | २ .... | | ४ .... | ७ .... | १२ |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | ” |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | ” |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | ” |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | ” |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | ” |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | ” |
| | ” | ” | | ” | ” | ” | | ” | ” | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| .... | १ १२ .... | ३ .... | | ४ | ८ .... | १ .... | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | ” | ” | | ” | ” | ” | | | | |
| | | | | ” | ” | ” | | | | |
| | | | | ” | ” | ” | | | | |
| | | | | ५ .... | ९ .... | .... | | | | |

[व]र्गांत देणाऱ्या दुकानांच्या जागा नं० १ ते १९ चेत व्यापार करणाराशिवाय कोणास मिळूं शकणार नाहींत.

नंबर २५ ते ५१ चे दुकानदारांस या वर्गांत मोडणाऱ्या दुकानांच्या जागा मिळणार नाहींत.

नंबर ३२ ते ५१ चे व्यापाऱ्यांस छावणी नसलेल्या चबुतऱ्यावर दुकान लावण्यास जागा मिळणार नाहीं.

+मुर्ता, लोकरीचें, रेशमी करदो[री]

Registere[illegible]

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

[ वर्ष ४५ आकोला—सोमवार तारीख २८ माहे आगष्ट सन १९११ इ० अंक ३४ ]

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक }
आकोला ९।९।०९ } G. A. Phillips.
एजंट
नं. १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ २/३ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक }
आकोला २१-९-१० } G. A. Phillips.
एजंट.
नो० न० २

## चांदीचीं भांडीं.

### खरें सचोटीचें दुकान.

आमचे दुकानीं शुद्ध चिनई चांदीचीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं विक्रीस तयार असतात. माल काळजीपूर्वक वक्तशीर व्ही. पी. नें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल जोखिमदार राहूं. एकवार अनुभव घ्यावा.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन.
नो. नं. ३३१ आदितवारपेठ, नासिक.

## सुधारलेलीं शेतकीचीं आउत.

आह्मी आमच्या कारखान्यांत तयार केलेल्या कांहीं यंत्रांचीं नांवें व किंमती.

| | | |
|---|---|---|
| लोखंडी नागर नंबर ९ | किंमत रु. | ४०॥ |
| ” ” ” १० | ” ” | ३८ |
| ” ” ” १२ | ” ” | १०।– |
| ” ” ” १३ | ” ” | ८॥ |
| कडबाकापण्याचें यंत्र | ” ” | १०।– |
| मोटेचें लोखंडी चाक (गडगडा) | | ८॥ |

आह्मी तयार केलेलीं ४००० हून अधिक आउतें आज सर्वत्र उपयोगांत आहेत येत्या हंगामाकरितां आह्मीं आमच्या आउतांत गुदस्त सालापेक्षां विशेष सुधारणा केल्या आहेत. सबब आमचींच आउतें मागवा

किर्लोस्कर बंधु,
पोस्टः—किर्लोस्कर वाडी,
( औंध संस्थान, जि० सातारा ]
नो. नं. ३९३

### नोटीस

वि॥ सबजज्ज सा॥ बहादुर आकोला यांचे कोर्टांत.

सक्सेशन सर्टिफिकेट नंबर १६/१९११

अनंत रामचंद्र देशपांडे वस्ती अमडापूर ता० चिखली. जि० बुलडाणें
अर्जदार

सक्सेशन सर्टीफिकेट मिळविण्याचा अर्ज

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल दिलेला अर्ज आमचे कोर्टांत ता. ६।९।११ इ॥ रोजीं नेमिला आहे. त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० दहा वाजतां आमचे कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें ता० २१।८।११

ता० २१ माहे आगष्ट सन १९११
R. V. Atray.
सबजज्ज आकोला.
नो० नं० ३९७

### जाहिर नोटीस.

सर्वत्र शेटकावकार व इतर लोक यांसः--

मी आनंदा वल्लद दावल वानखेडे तेली नबाबपुरा, मुसलमानपुरा शेखचांदच्या घराजवळ आकोला शहर. नोटीस देतों कीं माझा चुलता तुकाराम वल्लद हरी तेली वानखेडे याचे आकोला शहरांतील पाटील चावडी जवळील घर १ कवेलूचें अजमासें किंमत रुपये १००० चें त्याच्या मालकीचें हें मला कोणी विचारल्या शिवाय भाड्यानें खरेदी, गहाण, बक्षीस किंवा इतर प्रकारानें घेऊं नये. घेतल्यास तो सर्व व्यवहार रद्द समजला जाईल. त्याची जबाबदारी ज्याची त्याच्यावर राहून मयताची स्थावरजंगम जिंदगी त्याबद्दल जोखिमदार नाहीं. त्या घरावर सदरचा चुलता त्यास माझ्या शिवाय कोणी वारस नसल्यानें व तो नुकताच मयत झाल्यानें माझा हक्कवारसा आहे. चुलत्याची उत्तरक्रिया म्यां स्वतः केली असून त्याच्या दुखण्याबाहण्यांत मी स्वतः उपयोगी पडलों आहे. त्याला एक सून विधवा आहे. तिला मुलगा नाहीं मुलगी आहे. तिचें लग्न झालें आहे. सून ( सावित्री मर्द यशवंत ही ) तरणी असून तिचा विचार दुसरा पाटाचा नवरा करण्याचा दिसतो. ती या घराण्यांत आहे तों पावेतों तिला खाण्यापिण्यास, मुलीची ने आण वगैरे करण्यास खर्चण्यास मी देण्यास तयार आहे. ती फक्त अन्न वस्त्राची मालकीण आहे. कोणी फसूं नये सबब जाहिर केलें आहे. कळावें. ता० २४-८-११ इ०

सही
आनंदा वल्लद दावल तेली
द० खु०

नो० न० ३९८

### नोटीस

नोटीस चेतराम शिवकरण खेरडेकर रा० खेर्डे ता० खामगांव व बिजराज सुरजमल रा० शेगांव ता० खामगांव यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमची लिहिलेली हुंडी नग २ रुपये ४०० मित्ती चैत्र वद्य ९ संमत १९६४ मार्फ पैकीं २०० ची मुदत २१० व दुसरी २०० ची मुदत २४१ दिवस पिठ्ठ राखे बिजराज सुरजमल सेगांववाला पासे ती हुंडी बिजराज सुरजमल पासून आह्मी विकत घेतल्यामुळें नोटीस देण्यांत येतें कीं नोटीस पावल्यापासून ४८ तासांचे आंत व्याजासहीत आमचे रुपये शेगांव दुकानीं भरून द्यावीं. असें न केल्यास कायदेशीर तजवीज केली जाईल व फिर्यादखर्च व नोटीसखर्च व इतर नुकसानी जी होईल ती तुमचेवर पडेल व याबद्दल तुमची कांहीं एक तक्रार चालणार नाही. कळावें. तारीख २४।८।११ इसवी

सही मारवाडींत
ताराचंद हणमतराम मालक
लक्ष्मीनारायण हरीबक्ष द० खुद
नो० नं० ३९९

### नोटीस

नोटीस गुनी मर्द मनाजी माळी झाडे रा० वडाळी ता० अकोट इस० खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मास १८० रुपयांचे रोखे लिहून दिले होते. मागाहून त्यांत शेत देऊळगांव रस्त्याचें एकर ७ गुंठे २०- चें तीन वर्षे ४२५ रुपयांस वहितीस दिलें. तमचे रुपये १८० वजा जातां आमचे रुपये तुह्माकडेस २४० रुपये मुद्दल राहिलें. शिवाय व्याज दोनचार वेळा मागितलें तुमचा मुलगा यानें हंगामावर करार केला होता तो मरण पावला. तुह्मी रुपये दिले नाहींत. नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसांचे आंत कागद व राहिलेलें रुपये देऊन आमची पावती घ्यावी. असें न केल्यास तुह्मवर दिवाणींत फिर्याद करून खर्चासह व नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें ता० २१-८-११

सही
गणु वा॥ लक्ष्मण हुसे माळी
रा० वडाळी नि० खुद्द.
द० मोतीराम गणाजी हुसे-
नो० नं० ३९९

### नोटीस

बुलाखी वल्लद शिवराम कापसे जात कुणबी वस्ती कसबे मलकापूर यांस विष्णुसा बाळकृष्णासा सावजी दुकान मलकापूर यांजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुम्ही आमचे मालकीची जागा कसबे मलकापूर येथील बाराद्वारींतील दरमाहा एक रुपया प्रमाणें भाडें देण्याचें कबूल करून अकरा महिनें राहण्यासाठी संवत १९६२ माघ वद्य १ रोजीं घेउन भाडेचिठ्ठी संवत १९६२ फाल्गुन शुद्ध ४ तारीख २७-२-[illegible] रोजीं लिहून दिली. त्या प्रमाणें तुह्मी भाड्याचे रुपये व जागा कराराप्रमाणें खालीं करून दिली. नाही करितां भाडें चिठ्ठी प्रमाणें भाड्याचे रुपये मित्ती माघ वद्य १ संवत १९६२ पासून आजपर्यंतचे रुपये ६६ आणि त्याचें व्याज असे आमचे दुकानीं ही नोटीस पोहचल्यापासून पंधरा दिवसांचे आंत आणून देऊन जागाही खालीं करून द्यावी. या प्रमाणें न केल्यास रितीप्रमाणें फिर्याद करून भाड्याचे रुपये व्याजासुद्धां व या नोटिशीचा खर्च व जागा खालीं करून घेतली जाईल. कळावें. तारीख १८-८-१९११

सही
विष्णुसा बाळकृष्णासा द. रामभाउ
नो. नं. ३९६

## पतपेढी.

**पद–राजा हूं मै कौमका इ०**
या चालीवर.

वऱ्हाड आहे मुलूख बहुधा अथवा शेतीचा
किफायतीचा धंदा परि तो नाहीं बहुतांचा
॥ धृ० ॥

शेतकरी कर्जानें गिळिले बोजा खर्चाचा
कस जमिनीचा कमती होय न पाउस बेताचा
॥ १ ॥

भांडवलाच्या कमताईनें यत्न न नेटाचा
असुनी पत ही बोजा बसतो दिढी सवाईचा
॥ २ ॥

ह्मणुनि परस्पर–साह्य व्हावया शोध सुमार्गाचा
करितां करितां उपाय दिसला नव पतपेढीचा
॥ ३ ॥

२

दहा त्याहुनी अथवा अधिकांमिळुनी कर्जाला
काढावें जामीन होउनी एकामेकाला ॥ धृ० ॥
असे सारखा बोजा अवघ्यां तैसा एकाला
व्याज शेंभरां एक रुपाया खर्च न स्टांपाला
॥ १ ॥

रजिस्टराचा पैसा वांचे बचाव हा पहिला
कोर्टखर्च ही कमती कर्जा वसूल करण्याला
॥ २ ॥

सरकारांनीं दिल्या सवलती दया करुनि सकला
करा करारा पुरे सहज ये यश पत–पेढीला
॥ ३ ॥

३

'सावकार दुसरा न करूं' या पाळा शर्तीला
रुपया मागें आणा पैसा ठेवा बचतीला
॥ धृ० ॥

कांट---कसर हळुहळूं शिकोनी लग्नांकार्याला
उधळुं नये बहु पैसा, सहजींची सुधरा स्वतःला
॥ १ ॥

पत वाढे जशि दर व्याजाचा कमी पडे सकलां
इभ्रत मिळवूं नका वर्तनें साधा स्वहिताला
॥ २ ॥

भांडवलाला जमवुनि सुधरा अपुल्या शेतीला
तरणोपाय न त्यावांचोनी लहान मोठ्यांला
॥ ३ ॥

४

खतें नवनवीं टाका, बींवड निवडा जातीचा
अवलादीचीं ढोरें घ्यावीं, धंदा दगदागिचा
॥ धृ० ॥

फेरपाळिनें कापुस पेरा, नवीन शोधांचा
लाभ करुनि घ्या, मार्ग दिसे मग सहजीं
लाभाचा ॥ १ ॥

पतपेढीनें धडा शिकावा सहकारित्वाचा
सर्वहि जाती घेऊं अनुभव बंधु–प्रेमाचा
॥ २ ॥

ऐका प्रेमें राग न माना या दों गोष्टींचा
'वऱ्हाड होवो सुखी' हेतु हा आहे सर्वांचा
॥ वऱ्हाड० ॥ धृ० ॥

"त्र्यंबक"

## जपानचेंच उदाहरण पहा!

अलीकडे धर्म व नीति यांच्या शिक्षणाची अवश्यकता कोणी प्रतिपादन करूं लागला ह्मणजे कित्येक चांगली सुशिक्षित मंडळी जपानकडे बोट दाखवून ह्मणते कीं ' अहो, देशोन्नतीचा धर्माशीं व नीतीशीं य संबंध आहे? जपानचा अभ्युदय कोठें अडून बसला आहे? तेथें धड बौद्धधर्म प्रचलित नाहीं, शिंटोधर्म ही नाहीं कांहीं नाहीं. जपानी लोक धर्माची मुळींच परवा करीत नाहींत; पण शास्त्रीय शोधांच्या आणि स्वराज्याच्या जोरावर त्यांची भरभराट कशी झपाट्यानें होत आहे बघा. धर्म हा देशोन्नतीला पोषक नसून प्रतिबंधक मात्र होतो.' ही या लोकांची दृष्टि अगदीं कोती– पंचवीसतीस वर्षांच्या अनुभवापुरती आहे हें सांगावयास नकोच. यांना वाटतें कीं जपानची उन्नति पी हळद आणि हो गोरी या न्यायानें साऱ्या पंचवीस वर्षांत –जपानी लोक धर्माला लाथाडूं लागल्यापासूनच झाली आहे. राष्ट्रोदयाच्या भव्य इमारतीचा पाया इतक्या अल्प अवकाशांत घातला जात नसतो, व खुद्द जपानचा ही तो लवकर घातला गेला नाहीं. जपानची सुधारणा हें आज कित्येक शतकें त्या देशांत रूढ झालेल्या लोकांच्या धर्मश्रद्धेचा व अढळ राजनिष्ठेचा परिणाम आहे. आज त्या राष्ट्रांत बौद्धधर्म किंवा शिंटो धर्म शुद्ध स्वरूपांत दिसला नाहीं तरी पूर्वींच्या धर्मसंस्कारांचा ठसा लोकांच्या मनांतून पूर्णपणें पुसला गेला नाहीं, पुर्वींची संस्कृति हल्लींच्या उत्कर्षाच्या रूपानें फलवती दिसत आहे. पाश्चात्य राष्ट्रांच्या सहवासानें जें अश्रद्धेचें खूळ अलीकडे त्या देशांत माजूं लागलें आहे त्याचे परिणाम पूर्णपणें दिसूं लागण्यास अद्याप बराच कालावधि पाहिजे आहे. ते परिणाम आतां नुकते कोठें अराजकता, अस्वस्थता, बंडें, वगैरेच्या रूपानें दृष्टीस पडूं लागले आहेत. जपान सरकारच्या व मुत्सद्यांच्या लक्षांत ही गोष्ट येऊं लागली आहे आणि प्रचलित अश्रद्धेचें मूळ खणून काढण्यासाठीं उपायांची योजना सत्वर करण्याचा विचार तेथें चालला आहे. हें जपानचें उदाहरण पाहून हिंदुस्थानानें जागृत होऊं नये काय? जपानची नुसती सुधारणा पाहून चकित व्हावें, पण तिच्या मुळाशीं असलेल्या कारणाकडे --लुप्त होत चाललेल्या धर्मश्रद्धेकडे डोळेझाक करावी हें आह्मांस शोभतें काय?

वऱ्हाडसमाचार

भाद्रपद शुद्ध ४ शके १८३३ दुंदुभिनाम संवत्सरे

## लॉर्ड विरुद्ध कॉमन्स.

अलीकडे पार्लमेंट सभेंत लॉर्ड आणि कॉमन्स यांचे मधील तंटा विकोपाला जाऊन एखाद्या सिनेमाटोग्राफ मधल्या चित्राप्रमाणें दोन्ही पक्षांच्या हालचाली इतक्या झपाट्यानें होऊं लागल्या होत्या कीं आपण इंग्लंडच्या इतिहासांतली एक मोठी क्रांति पाहण्यास जगलों आहों असा अभिमान ब्रिटिश साम्राज्यांतील प्रत्येक विचारी माणसास साहजिकपणें वाटत होता. व्हेटोबिलानें उठविलेलें वादळ आतां शांत झालें आहे. तापलेलीं डोकीं शांतपणें विचार करण्या इतकीं आतां थंड झालीं आहेत. अशा वेळीं लॉर्ड आणि कामन्स यांच्या मधील तंट्याच्या आजपर्यंतच्या इतिहासाचें सिंहावलोकन थोडक्यांत केलें असतां त्यापासून पुढील मार्ग कळण्याम बरेंच साह्य होईल ह्मणून त्या दिशेनें थोडासा यत्न आज करीत आहों.

कॉमन्स सभेनें एखादें बिल पास केल्यानंतर वाटेल तर लॉर्डस सभेनें तें नामंजूर करावें असा अधिकार या वड्या सभेला कायद्यानें दिलेला होता. ज्यावेळीं कॉमन्स सभेंत सार्वजनिक हिताच्या प्रश्नाचा दक्षतेनें विचार करण्या सारखे विद्वत्तेचे आणि कळकळीचे पुढारी नव्हते तोंपर्यंत लॉर्डस सभेला दिलेला हा अधिकार लोकांना गैरवाजवी वाटला नाहीं. कारण कॉमन्स सभेंत कोणी तरी उपरी लोक भरावयाचे, व त्यांनीं मागचें पुढचें धोरण न ठेवतां एखादा कायदा करावयाचा त्यापेक्षां ज्याची इस्टेट वगैरे देशांत आहे अशा वरंदाज माणसांच्या मताला देशाच्या हिताच्या दृष्टीनें त्याकाळीं साहजिकच अधिक किंमत देण्यांत येत असे. पण अलीकडे दीडशें वर्षांत कॉमन्स सभेंत वरिष्ठ दर्जाचे लोक येऊं लागले, व त्यांना कामन्स सभेंत राहून आपली कर्तृत्वशक्ति लोकांच्या नजरेस आणण्याची महत्त्वाकांक्षाही उत्पन्न झाली. त्यामुळें लॉर्ड सभेचें वजन पूर्वींच्या सारखें राही ना. हें वैषम्य लॉर्डांना वाटूं लागलें. हा तंट्याचा प्रारंभ होय. पुढें आयर्लंडचे लोक स्वराज्य मागूं लागले व लॉर्डांची सभा तें देण्यास कबूल नव्हती या गोष्टीनें लार्डांच्या विरुद्ध असलेल्या लोकांच्या मनांतलें शैल्य उपटून न काढतां उलट तें ज्यास्तच पक्कें केलें. १८८६ सालीं मि० ग्ल्याडस्टन यांनीं आणिलेलें आयरिश होमरूल बिल कामन्स सभेनें पास केलें असतां लॉर्डांनीं तें कसें फेटाळून लाविलें ते सर्वांस श्रुत आहेच. त्या नंतर पार्नेल साहेबांचे लज्जास्पद प्रकरण उपस्थित झालें लॉर्डांनीं त्याला नसतें महत्व देऊन होमरूल न देण्याला ती सबब पुढें केली. पण एका माणसाच्या दुष्कृत्याचें खापर सबंध राष्ट्रावर फोडणें हा अन्याय वाटून मि० ग्ल्याडस्टन यांनीं १८९२ सालीं होमरूल बिल पुनः आणिलें. याही वेळीं तें कामन्समध्यें पास होऊन लॉर्डसमध्यें नामंजूर झालें. तेव्हांपासून लॉर्डससभा आपल्या हिताच्या आड येणारी आहे अशी आयरिश नॅशनॅलिस्टांची खात्री होऊन चुकली आणि ते त्या सभेच्या अस्तित्वावर तिलांजलि घालण्यास सिद्ध झाले. पुढें मि० ग्ल्याडस्टन यांनीं राजकारणांतून मन काढलें, लॉर्ड रोजबरीची कारकीर्द झाली. त्यानंतर १९०५ पर्यंत कान्सर्वेटिव्हपक्षाची सरशी होती, तों पर्यंत कांहीं एक करतां येई ना. पण हा वीस वर्षांचा अंधराचा काळ निघून गेला व उदार मताच्या विजयाचा उषःकाल झाला. त्याबरोबर इंग्लंडच्या राजकीय वातावरणांतले काळे कान्सर्वेटिव्ह ढग लिबरल सूर्यापुढें पार मावळले. याच वेळीं लिबरलपक्षही हळू हळू जोरानें पुढें येऊं लागला. या पक्षाचें पाठबळ व आयरिश पाठबळ मिळून लिबरलपक्ष पुनः प्रबळ झाला. १९०८ मध्यें सर हेनरी कँपबेल बॅनरमन ( लिबरलपक्षाचे अध्वर्यु) मरण पावले व मि. ॲस्किथ यांच्या हातांत राजसूत्रें आलीं. सुदैवानें त्यांनीं मि. लाईड जार्ज सारख्या सोशिआलिस्ट पण कर्तव्यतत्पर चान्सेलर मिळाला. त्यानें लोकांना आवडेल पण लॉर्डस नाकें मुरडतील असें बजेट तयार केलें. लॉर्डसनीं तें नामंजूर केलें ह्मणजे लोक लॉर्डसच्या विरुद्ध आयतेच चवताळतील हा मि. जॉर्ज यांचा अदमास बिलकूल चुकला नाहीं. या वेळेस लॉर्डसना सल्ला देणारा एखादा शहाणा माणूस असतां तर त्यानें पुढचें संकट ओळखून बजेट मंजूर करण्याची सल्ला दिली असती. पण लॉर्डससभेचें अध्वर्युत्व लॉर्ड ल्यान्सडौन यांचेकडे होतें. त्यांनीं बजेट नामंजूर करण्याची सल्ला देतांच पार्लमेंट बरखास्त झालें.

सन १९१० साल आलें. अजुन आपली सरशी होईल अशी कान्सर्वेटिव्हपक्षाला मोठी आशा वाटत होती. पण नव्या निवडणुकींत त्यांना अपयश आलें. लिबरलपक्षानें पुनः बजेट लॉर्डसकडे पाठविलें. आतांमात्र लॉर्डांना आपली चूक कळून आली आणि त्यांनीं शहाणपणानें तें मंजूर केलें. १९१० सालीं लिबरलांची सरशी झाली तिला कारण पुष्कळअंशीं आयरिशलोकांचें साह्य होतें. हें जाणून आयरिशलोकांनीं लॉर्डस विषयींचा सूड उगविण्याचा आपला विचार लिबरलांपुढें मांडला. लिबरलपक्षाला ही कृतघ्नता दाखवितां येई ना. त्यांनीं होमरूल बिल तर पुढें केलेंच, पण त्याबरोबर आणखी लॉर्डसभेचा बिल नामंजूर करण्याचा अधिकार काढून घेण्याची तजवीज लवकर केली पाहिजे असा आग्रह धरला. लिबरलपक्ष सर्वथा आयरिशांच्या तंत्राधीन झाल्यामुळें आयरिशलोकांस पाहिजे होतें तसें आश्वासन देणें प्रधानमंडळाला भाग पडलें.

हा सगळा प्रकार माजी सतम एडवर्ड बादशहांचे वेळीं झाला. पार्लमेंटच्या रचनेंत मोठीच क्रांति होऊं पाहत आहे हें पाहून सर्व गोष्टींचा बारीक विचार करून लॉर्डांचा व्हेटोचा (नामंजूर करण्याचा) अधिकार मर्यादित करण्याचें बिल लॉर्डांनीं नामंजूर केल्यास आणीबाणीच्या प्रसंगीं नवे लॉर्ड निर्माण करण्याचा जो अधिकार राजाला आहे त्याचा उपयोग करण्याचें आश्वासन त्यावेळच्या प्रधानानें राजापासून घेऊन ठेविलें. इतकें होत आहे तों राष्ट्राच्या दुर्दैवानें सर्वांमध्यें शांतता व प्रेम स्थापित करणारे आपले सतम एडवर्ड बादशहा परलोकवासी झाल्यामुळें त्या राष्ट्रीय दुःखांत कांहीं काळपर्यंत दोन्ही पक्ष आपलें भांडणें विसरले होते. पुढें कांहीं शहाण्या लोकांच्या मध्यस्थीनें त्यांत आपले प्रिय बादशहा पांचवे जॉर्ज हे एक होते दोहो पक्षांमध्यें समेट करण्याच्या उद्देशानें एक संयुक्त परिषद भरली, पण तिच्या प्रयत्नाला यश आलें नाहीं तेव्हां या प्रश्नासंबंधानें लोकमत तरी काय आहे हें पाहण्यासाठींच मुद्दाम पार्लमेंट बरखास्त होऊन या वर्षाच्या प्रारंभाला नवी निवडणूक झाली. तींत पुनः लिबरलपक्षाची सरशी झाली. तेव्हां अधिकारारूढ होतांनाच मि० ॲस्किथ यांनीं नवे लॉर्ड निर्माण करण्याविषयींचें वचन बादशहापासून मिळविलें, आणि एकदम कॉमन्स सभे पुढें व्हेटोबिल मांडलें. तें तेथें पासही झालें. इतक्यांत राज्याभिषेकाच्या गडबडीमुळें पुनः कांहीं वेळ शांतता झाली, आणि नंतर लॉर्डांनीं तें बिल चर्चेकरितां हातीं घेतलें. आतां बिल